# महाभारत

## खंड९ : वनपर्व १

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड नववा : वनपर्व भाग पहिला

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन : १० ऑक्टोंबर २०१८

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत साधारणपणे पंचवीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे

जाईल अशी अपेक्षा आहे. त्यात मूळ महाभारताचे खंड केले आहेत, त्यातील हा नववा खंड आपण आता वाचणार अहात. हा वनपर्वाचा पहिला खंड आहे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई–मेल – ashokkothare@gmail.com

ह्या वरुन आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

माझे विचार व संशोधन कांहीं ब्लॉग मधून प्रसिद्ध करत असतो ते असें –

You are invited to visit my other blogs

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/

for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

You may visit blog, Ideas and tips on any subject,

http://kotharay.blogspot.in/

for intelligent discussions.

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते
Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/



# – महाभारत वनपर्व खंड पहिला –

ह्या खंडातील प्रकरणे खालील प्रमाणे आहे

वनपर्वातील भाग – पहिले अरण्यक पर्व, किरमीरा वध पर्व, अर्जुन अभिगमन पर्व,

## वनपर्व भाग पहिला

(पहिले अरण्यक पर्व सुरु)

वैशंपायन प्रार्थना करतात, ओम बोलून नारायण व नर ह्यांच्या पवित्र स्मृतीस स्मरून व मातादेवता सरस्वतीचे स्मरण करून त्यानंतर जय असा घोष करून पुढील भागाचे वाचन करणार आहोत.

जनमेजय बोलतात, सर्वश्रेष्ठ असे अंशावतारी असूनही, तरीसुद्धा त्यांच्याच काकाच्या मुलांनी, धृतराष्ट्राच्या पुत्रांनी त्यांच्या दोस्ताच्या मदतीने, खोट्या द्युतात फसवले गेल्यामुळें कौरवाशी त्यांचे उभे वैर झाले होते, त्या विकृत प्रवृत्तीच्या चुलत भावांची अपशब्दाने भरलेली मुक्ताफळं ऐकून संतापलेले माझे पणजोबा पुढे काय करतात ते सविस्तरपणे मला सांगा. माझे पणजोबा इंद्रासारखे हिम्मतवान, धाडशी असूनही, त्यांचे दैव फिरले होते. ते त्या काळात त्यांचे दिवस कसें कंठत होते, त्या दुर्दैवी परिस्थितीत असलेल्या पांडवाच्या पावलावर पाऊल टाकून कोण गेले, त्यांनी त्या कठीण प्रसंगी आपले जीवन कसे घडवले, ते कोठे रहात होते, त्यांची ती वनवासातील बारा वर्षे कशी गेली. सर्वश्रेष्ठ विरक्त प्रवृत्तीचे, ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ असे माझे पणजोबा जे मोठे शत्रुघ्न म्हणून ख्यातनाम होते त्यांच्या पत्नीबरोबर कसे रहात होते. त्यांचे वैराग्यपूर्ण जीवन आणि तिचे पातिव्रत्य कसे सांभाळले गेले होते. नेहमी सत्य बोलणारे, जंगलातील आपत्तींना धैर्याने सामोरी जाणारे, वैराग्य हिंच संपत्ती असणारे, अशा माझ्या पणजोबांची माहिती मला सांगा. त्यांचा उज्वल इतिहास मला तुमच्या मुखातून ऐकावयाचा आहे. खरोखरच ते ऐकण्यासाठी मी अतिउत्सुक झालो आहे.

वैशंपायन सांगतात, नुकतेच शकुनी ह्या कौरवांच्या मामाने खोट्या द्युतात फसवल्यानंतर मनस्तापकारक प्रसंगातून गेलेले ते पराक्रमी पांडव, धृतराष्ट्राच्या नतदृष्ट मुलांकडून विनाकारण चिडवलेले, विशेषकरून त्यांच्या पत्नीचा अपमान झाल्यामुळें व्यथित झालेले

असें हस्तिनापुराच्या वर्धमान नांवाच्या महाद्वारातून बाहेर पडले. क्षत्रियांच्या परंपरेनुसार ते आपापली शस्त्रे घेऊनच निघाले होते. त्यांच्या बरोबर त्यांची पत्नी कृष्णा होती. ते उत्तरेकडे निघाले. इंद्रसेन आणि त्यांचे सेवक त्यांच्या परिवारासह त्याच्या रथांतून त्यांच्या मागून निघाले होते. एकंदर सगळे चौदाजण होते. नगरातून ते जात आहेत हे समजल्यावर नगरवासी मोठ्या दुःखी अंतःकरणाने त्यांना निरोप देण्यासाठी रस्त्यावर आले होते. त्या गर्दीने ते रस्ते फुलून गेले होते. ते प्रजाजन भिष्म, विदूर, द्रोण आणि गौतम असा मातबर लोकांना त्या बद्दल दुषण देत होते. ते प्रजाजन एकमेकांना सांगत होते, "आता आपण सगळे पोरके झालो आहोत. हे काय विपरीत होत आहे. न्याय देव कोठे गेला. खोटा द्युत प्रशस्त कधीपासून झाला कीं, आमचे राजपुत्र त्याकारणांने असें देशोधडीस जात आहेत? ते उघडपणे दुर्योधनाला व धृतराष्ट्राला त्यासाठी जबाबदार धरत होते. त्या बरोबर कर्ण, सुवल पुत्र शकुनी आणि दुःशासन ह्यांनासुद्धा दोष देत होते. ते विचारत होते, कोठे गेली आपली परंपरा, कोठे गेली नितितत्त्वें, ते बोलत होते, अशाने आपले राज्य फारकाळ टिकणार नाही. अशा राज्यात आम्ही सुरक्षित असणार नाही, जेथे राणीची भर सभेत निर्भत्सना होते तेथे आमच्या लेकीसुनांचे कोण संरक्षण करणार? हे राज्य पापाच्या आधीन झाले आहे कां? ब्राह्मण बोलत होते, परिस्थिती आणखीन बिघडण्या आधी ह्या राज्यातून निघून गेले पाहिजे. जेथे आर्य संस्कृती, शिष्टाचार, मर्यादा काटेकोरपणे पाळल्या जात तेथे असें कसे झाले. जर राजाच गुन्हेगार झाला तर प्रजेने काय करावयाचे? अशा राज्यात आपण आनंदी, सुखी, समाधानी राहू शकणार नाही. दुर्योधन जर राजा झाला तर अराजक सर्व राज्यात पसरेल. पुढे ते लोक एक वाक्यात सांगत होते, चला आपणसुद्धा पंडुपुत्रांबरोबर हे राज्य सोडून जाऊ. त्यांच्या कामात संस्कृती, निति, न्याय, मर्यादा, शिष्टाचार आणि माणूसकी असेल. हे सगळे आता हस्तिनापुरात असंभव होणार". अशारितीने, ते प्रजाजन पांडवांची वाखाणणी आणि कौरवांची नालास्ति करत होते.

वैशंपायन सांगत असतात, असें उद्‌गार निघत होते व ती प्रजा पांडवांच्या मागोमाग चालू लागली. त्यातील ज्येष्ठ नागरवासी पांडवांना व त्यांच्या पत्नीला त्यांच्या शुभेच्छा देत होते. होत जोडून नमस्कार करत होते. कित्येकांना अश्रू अनावर झाले होते. कांहीं वाटेत

ठाण मांडून मोठ्या मोठ्याने रडत होते. कित्येक स्त्रियां कुंती व माद्रीच्या आठवणीने शोकाकूल झाल्या होत्या. मोठ्यांचे पाहून त्याच्या सह असलेले लहानगेसुद्धा रडू लागले होते. संपूर्ण आसमंत दुःखमय झाला होता व अशात पांडव त्याच्या रथाच्या मागून सावकाशपणे चालत प्रत्येक नगरवासींना अभिवादनं करत पुढे नगराच्या सीमेच्या दिशेने सरकत होते. कांहीं पुनः पुन्हा विनंती करत असतात कीं, त्यांनी वनवासात जाऊ नये. कांही त्यांना इंद्रप्रस्थात जाऊन रहावे व त्यांच्या बरोबर तेसुद्धा येण्याच्या गोष्टी ते प्रजाजन करत होते. पांडवांच्या सुशील राज्यकारभाराची कित्येक वाखाणणी करत होते व त्याविरुद्ध दुर्योधनाच्या वाईट कारभाराची निर्भत्सना ते करत होते. कांहीं कौरवांच्या गैरवर्तुणूकीबद्दल बोलत असतांना त्यांच्या वाईट संगतीला दोष देत होते. राजा चांगला होण्यासाठी त्यावर चांगले संस्कार असावे लागतात परंतु, कौरवांवर सुरुवाती पासून चांगले संस्कार झालेच नाहीत असे कांहीं बोलत होते. पांडवाची वैराग्य वृत्ती आणि कौरवांची वासनिक वृत्ती ह्यांची तुलना ब्राह्मण करत होते. कांहीं ब्राह्मण बोलत होते, कौरवांनी ऋषीगृही वेद अभ्यासले ते त्यातून खोट काढण्यासाठी, पांडवांनी वेद अभ्यासले ते त्यातील ज्ञान संपादन करण्यासाठी अशी तुलना होत होती. वेदाच्या अभ्यासाने माणसात चांगुलपणा वाढत जातो परंतु, कौरवांच्यात वाईटपणाच वाढत आहे अशी टीका होत होती. कौरव दुर्जनांच्या संगतीत असल्यामुळें त्यांची मति भ्रष्ट झाली आहे असें कांहीं सांगतात.

ते हस्तिनापुरातील रहीवाशांचे प्रशंसा करणारे बोलणे ऐकून युधिष्ठीर त्याना बोलतो, तुमच्या कृपाशिर्वादाने आम्ही धन्य झालो आहोत. तुमच्या प्रेमाने आम्ही कृतार्थ झालो आहोत. त्या जमलेल्या लोकांतील ब्राह्मणांकडे पाहून पांडव त्यांच्या आशिर्वादाने आपण पुनीत झालो आहोत असे नम्रतापूर्वक सांगतात. पांडव त्या लोकांना सागतात, असें पहा, आमची जास्त स्तुती करू नका कारण, त्यामुळें आमचे आप्त जे अजून त्यांच्या ताब्यात आहेत, जसें वृद्ध भिष्म, कुंतीमता , विदूर ह्यांच्या जीवाला धोका होऊ शकतो. आपण जाणताच किं, आमच्यासह तुम्ही वानवासात येऊ शकणार नाही व येथेच तुम्हाला रहावयाचे आहे तेव्हां त्यांना न दुखवता आणखीन चौदा वर्षे काढा, त्यानंतर आम्ही येणार आहोत तेव्हां तुमच्या सहयोगाची आवश्यकता असेल तेव्हां तुम्ही आम्हाला सहाय्य करा.

तो पर्यंत कळ काढा. आमचे जे आप्त येथे आहेत त्यांना तुमच्या आधाराची गरज आहे तो द्या. आमच्या जाण्याने त्यांना फार दुःख झाले आहे त्यांची काळजी घ्या.

वैशंपायन पुढे सांगतात, ती पांडवांची विनंती ऐकून त्या जमावांने मोठ्यानी आकांत केला. पांडवांच्या परत येण्याची उत्कंठेने वाट पहाण्याचे ठरवून तो प्रजाजन पांडवांच्या मागे जाण्याचे थांबवतात. पांडव आपल्या उत्तर दिशेने जातात आणि तो समुह त्यांच्या निवासस्थानी परत जातो. नागरीक परत फिरल्यावर पांडव त्यांच्या रथांत चढतात. पुढे जातांना एका प्रचंड आकाराच्या वडाच्या झाडाकडे येतात. त्या वडाच्या झाडाचे नांव प्रमाण होते. तो गंगा किनारी होता. तेथे रात्री मुक्काम करण्याचे ठरवून ते त्यांचे शौंच, मुखमार्जनादी विधी आटोपतात. त्यांच्यावर आलेल्या आपत्तिमुळें व्यथित झालेले असल्यामुळें फक्त पाणी पिऊन रहाण्याचे ठरवतात. गंगेच्या पवित्र जलांचे प्राशन करूनच ते रात्र तेथे काढतात. त्यांच्या बरोबर असलेले दोनही प्रकारचे ब्राह्मण, ज्यांत कांही अग्निहोत्री होते व दुसरे नव्हते तेसुद्धा त्यांच्या विधी उरकून घेतात. कांहीं पांडवांबरोबर थांबतात व कांहीं परत फिरतात. ते सगळे आपापल्या शिष्यगणां बरोबर होते. जे थांबतात ते तेथे पांडवांसह रहातात. अग्निहोत्री त्यांचा अग्नी चेतवून वेदांचे पठण मोठ्याने सुरु करतात. त्यामुळें तेथे दिव्य तेजाचा अनुभव सगळ्यांना येतो. त्या ब्राह्मणांमध्ये पांडव विशेष तेजस्वी दिसत होते. त्या "प्रमाण" वृक्षाखाली वेद पठणांमुळें पवित्र वातावरण उत्पन्न झालेले होते. वेदाचे साम गाण्याच्या भेंड्या तेथे त्या ब्राह्मणात सुरु होतात. वातावरणाचा प्रसन्नपणा त्यामुळें वाढतो. त्यामुळें पांडवांच्या मनावरील प्राप्त झालेल्या परिस्थितीमुळें आलेले दडपण कमी होते व ते शांत होतात. त्या साम गायनात तेसुद्धा सामील होतात. अशारितीने ती वनवासातील पहिली रात्र कशी गेली ते त्यांना समजत नाही.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा पहिला भाग संपला.

# वनपर्व भाग दुसरा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, दुसरा दिवस उगवला तसें ते तपस्या करणारे ब्राह्मण पांडवांपुढे उभे राहिले. त्यांना उद्देशून युधिष्ठीर बोलला, "आमचे धन, वैभव अधिकार आम्ही घालवले आहेत अशा परिस्थितीत आम्ही आता वनात प्रवेश करणार आहोत. तेथे आम्ही कंदमुळं, फळें खाऊन व शिकार करून जगणार आहोत. हे वन अनेक प्रकारच्या संकटाने भरलेले आहे. तेथे हिंस्र प्राणी आणि साप फिरत असतात. जर तुम्ही आमच्या बरोबर आलात तर तुम्हाला बराच त्रास सहन करावा लागेल. तुमचे संरक्षण करण्याची व्यवस्था नाही. म्हणून मी तुम्हाला परत फिरण्याची आज्ञा करतो".

ते ऐकून ते जमलेले ब्राह्मण म्हणाले, "अहो राजन, आमचा मार्ग आपणच निश्चित करणार अहात. म्हणून कृपया आम्हाला आपली साथ सोडण्यास सांगू नका. देवसुद्धा त्यांच्या भक्तांबद्दल दयाबुद्धी दाखवतात. विशेष करून ब्राह्मणांबद्दल जे सत्त्वशिल आहेत". ते ऐकून युधिष्ठर त्यांना बोलतो, "अहो ज्ञानीजन, मी सुद्धा तुमचा चाहता आहे पण आज माझी मनस्थिती त्या परिस्थितीत नाही कीं मी आपली जबाबदारी घेऊ शकेन. माझी भावंड व आमची पत्नी असे सगळे अजून त्या मनस्थितीतून बाहेर आलेलो नाही. क्षत्रियांना ब्राह्मणांचे एकाद्या स्त्री अथवा मुलांसारखे संरक्षण करावे लागते, ते ह्या वनातील श्वापदांच्या परिस्थितीत शक्य होणार नाही. त्याशिवाय आम्हाला आमच्या उपजिवीकेचासुद्धा विचार करावा लागणार आहे. म्हणून आपण सगळे परत जावे.

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून युधिष्ठीर भावूक होतो व जमिनीवर ठाण मांडून बसतो. त्याला ब्राह्मणांना जाण्यास सांगणे फार त्रासाचे होते परंतु, त्याला पर्याय नव्हता. तेव्हां त्या ब्राह्मणांतील एक सांख्य प्रणालिचे ज्ञानी ऋषी शौनक त्याला बोलतात, "दुःखाची शेकडो कारणे आणि भितीची हजारो कारणे अज्ञानी माणसास हवालदिल करतात परंतु, ज्ञानी माणसास हतबल करत नाहीत. तुमच्यासारखे समजदार अशा परिस्थितीवर मात करू शकतात. अहो राजन, तुझ्या मध्ये ती आठ लक्षणं आहेत ज्यांच्या सहाय्याने तू व तुझे बंधू ह्या प्रसंगातून सुरक्षितपणे निभावून निघाल. श्रुतीच्या अभ्यासाने तुम्ही त्यासाठी तयार व्हाल. तुमच्या सारखे विरक्त प्रवृत्तीचे, प्राप्त गरीबीने

हतबल होत नाहीत. आजच्या परिस्थितीचा तुमच्या चित्तावर जो विपरीत परिणाम झाला आहे त्याला काळ हांच इलाज आहे. जसा काळ व्यतीत होईल सगळे तुमच्या प्रमाणे जमून जाईल. तुम्हाला मी एक श्लोक सांगतो जो, जनक राजा जेव्हां अडचणीत जाई तेव्हां गात असें.

तो असा, "हे जग मानसिक आणि शारिरीक दुःखाने भरलेले आहे. आता ऐक, त्यावर काय उपाय करावयाचा. ते उपाय थोडक्यात आणि तपशिलात अशा दोनही प्रकारे सांगतो. रोग, वेदना देणार्या गोष्टींचा स्पर्श, कष्ट आणि इच्छित गोष्ट न मिळणे ह्या चारांमुळें दुःख माणसाला प्राप्त होते. त्यातील रोगांसाठी शरिराचे दुःख औषधाने बरे करता येते. इच्छित गोष्ट न मिळण्यामुळें होणारे दुःख ध्यान योग साधनेने कमी करता येते, वेदना देणार्या गोष्टींचा स्पर्श टाळणे हा त्यावर उपाय आहे. म्हणून प्रथम वैद्य मानसिक दुःखावर इलाज करतात. कारण मानसिक विकार शरीरीवर परिणाम करून त्यातून विलक्षण असे शारिरीक व्याधी उत्पन्न होत असतात. जसें थंड पाणी अग्नी विझवते त्याप्रमाणे ध्यान योगांने शरीराच्या बर्याच व्याधी विरून जातात. ध्यान योगांने मनाला शांति मिळाल्याने शरीरसुद्धा स्वस्थ होते. त्याच प्रमाणे सत्याचे ज्ञानसुद्धा मानसिक शांति मिळवून देते. मन शांत तर देह स्वस्थ असें त्यांचे संबंध असतात. कष्टामुळें होणारे दुःख आराम केल्याने संपते. अभिलाषा हे सर्व मानसिक दुःखांचे कारण असते. सर्व प्राणी ह्या अभिलाषे पायी पुनः पुन्हा दुःखात जातात. जेथे कसलीच अभिलाषा (अपेक्षा) नाही, तेथे दुःखसुद्धा नसते. अपेक्षा भंगात वेदना असतात त्यांना उपाय नसतो. म्हणून ऋषी तो, जो कोणतीही अपेक्षा करत नाही. त्यातूनच खरी अध्यात्म साधना सुरु होते. सामान्य माणूस व योगी ह्यातील भेद ह्या अपेक्षांचा असतो. एक अपेक्षा पूर्ण झाली कीं, त्यातून दुसरी उत्पन्न होते, ती पूर्ण झाली कीं, तिसरी सुरु होते असे अपेक्षांचे चक्र होते. ते थांबवणे सहज साध्य नसते. सर्व मानसिक दुःखांचे मूळ ह्या अपेक्षांत आहे. कारण, जर अपेक्षा पूर्ण झाली नाही तर त्यातून वेदना उत्पन्न होतात त्या माणसाचे जीवन अवघड करतात. तुझी अपेक्षा पूर्ण नाही झाली परंतु, दुसर्याची झाली तर त्यातून आसुया त्या माणसाबद्दल उत्पन्न होत असते व ते पापाचे कारण ठरू शकते. कौरवांचे तुमच्याशी जे वैर आहे त्या मागे ही आसुयाच कारणीभूत आहे. कारण जे दुर्योधनाला प्राप्त झाले नाही ते तुम्हाला मिळत होते

त्या आसुये मुळें तुमच्यावर ही परिस्थिती येऊन ठेपली आहे. अपेक्षाभंगाने माणूस स्वतः दुःखी होतो तर एकाच्या आसुयेमुळें दुसर्याला दुःखाला सामोरी जावे लागते. जसे तुमच्या बाबत झाले आहे. अपेक्षा पूर्ण न झाल्यास कमजोर दुःखी कष्टी होतो व बलवान क्रोधी होतो. म्हणून हा अपेक्षांचा अग्नी जो काबूत ठेवतो तो खरा सुखी होतो. जसे तुम्ही अहात. आसुयेतून पाप उत्पन्न होते. जे दुर्योधनाने केले व तुम्हाला वनवासास पाठवले. केवळ वास्तविक संपत्तीचा त्याग केल्याने त्या बद्दलच्या अपेक्षा संपत नाहीत. कारण त्या माणसाच्या अंतर मनात अजून असतात. ज्याला मनातून अपेक्षा नसतात त्याला त्या पूर्ण झाल्या काय व न झाल्या काय कांहीं फरक पडत नाही. अशा माणसास स्थितप्रज्ञ म्हणतात. अपेक्षा कशा प्रकारच्या आहेत तेसुद्धा महत्वाचे असते. जो आपल्या अपेक्षांसाठी आपल्या मित्रांना वेठीस धरतो तो पापी ठरतो. अपेक्षांची खरोखर किती गरज आहे ते अजमावून जो सदैव पहात रहातो त्याला समजते किं, त्याच्या बहुतेक अपेक्षा फाजिल (विनाकारण) आहेत व त्यांचा त्याग करणे सहज शक्य आहे. असा माणूस विरक्त समजला जातो. तो त्या अपेक्षांत असूनही त्यांपासून मुक्त असतो जसे अळूचे पान जरी पाण्यात भिजवले तरी कोरडेच असते. ज्यांने जगाचे व्यवहार जाणले आहेत त्याला क्षणिक पूर्ततेच्या आणि शाश्वत अपेक्षां ह्यांतील फरक समजतो व तो सर्व प्रकारे खरोखच मनाने शांत होत असतो. अपेक्षांतून इच्छा, त्यातून इच्छापूर्ती अथवा क्रोध किंवा दुःख त्यातून असुया, त्यातून सूडबुद्धी, त्यातून पाप असे सगळे एका मागोमाग दुष्टचक्र सुरु होते. माणसाच्या अशा सगळ्या अपेक्षांच्या मागे आपले शरीर असते हे युधिष्ठीरा लक्षात घे. सगळ्या इच्छा शरीराच्या कोणत्या ना कोणत्या अपेक्षा पूर्तीतून सुरु होत असतात. जरी असे असले तरी त्या दुष्टचक्राचा अंत त्या माणसाच्या मृत्यूने होत नाही तर ते दुष्टचक्र त्या नंतरसुद्धा अव्याहतपणे चालू रहाते. युधिष्ठीरा, अपेक्षा हांच खरा रोग आहे व त्यावर इलाच करावयाचा असतो. अशा दुःखाला अंत नसतो. ते दुःख जन्मजन्मांतरी चालू रहाते. जसे लाकडाचा ओंडका सावकाशपणे धुमसत जळत रहातो तसे हे इच्छांचे दुष्टचक्र सदैव चालू रहाते. ज्याने त्या अपेक्षांच्या दुष्टचक्राला नियंत्रित केले नाही तो सतत त्या आगीत जळत होरपळत असतो. त्याचा परिणाम होऊन त्याचे शरीरसुद्धा विविध व्याधींनी ग्रस्त होत असते. जसे सामान्य माणूस मरणाला भितो, गरीबीला भितो, तसें राजा सत्ता नाशाला

भितो, चोर पकडला जाण्याला भितो तसा इच्छांच्या दुष्टचक्रात अडकलेला त्या चक्राला भितो. मांसाचा तुकडा हवेत असेल तर पक्षी खातो, जमिनीवर असेल तर पशु खातात व पाण्यात असेल तर मासे खातात तसे ज्याला मिळेल तो त्याचे भक्षण करत असतो. संपत्तिचे तसेंच आहे. ज्याला मिळाली तो त्याचा मालक होतो. चोराला मिळाली कीं, तो चोर त्याचा मालक होतो. अशा संपत्तिच्या मोहात माणूस अडकला कीं, त्यातून त्याची सुटका नाही. माझी संपत्ति, माझी संपत्ति म्हणून त्याच्या लोभात अडकून जातो. खरे तर ती संपत्ति कोणाचीच नसते. कारण कोणीही तिला त्याच्या बरोबर मृत्यूनंतर घेऊन जाऊ शकत नाही. त्या मालमत्तेतून मद भाव (superiority complex) उत्पन्न होतो. इतराकडे किती आहे व माझ्याकडे किती ह्यावर तुलना सुरु होते व त्यातून जर इतरापेक्षा माझ्याकडे जास्त असेल तर माझ्या मनात त्यामुळें घमेंड (मदभाव) उत्पन्न होतो व कमी असेल इतरांपेक्षा तर मत्सर भाव (inferiority complex) उत्पन्न होतो. हे दोनही पापास कारणीभूत होतात. वस्तुतः ती संपत्ति कोणाचीच नसते कारण कोणीही तिला त्याच्या बरोबर घेऊन जाऊ शकत नाही. ह्या दुष्टचक्रातून आणखीन मनोभाव वाढतात ते पहा, माझ्याकडे आज जास्त आहे पण जर उद्या कमी झाली तर काय? अशा विवंचनेत तो अडकत जातो. म्हणून ती संपत्ति खर्च करण्यास सुद्धा तो कचरत असतो. कारण, ती त्यामुळें कमी होईल त्याची विवंचना सुरु होते. अशा विवंचनेने कधी तो मरून सुद्धा जातो! ती संपत्ति वाढावी म्हणून तो कांहीं करत रहातो व सतत दुसर्याच्या मालमत्तेशी स्वताच्या मालमत्तेची तुलना करत रहातो त्यातून मद व मत्सर भावांच्या द्वंद्वात तो अडकत जातो. त्या मारामारीत त्याचे खरे सुख संपुष्टात येते ते त्याच्या ध्यानतही येत नाही. वस्तुतः माणसाला किती धन जगण्यासाठी लागते त्यापेक्षा थोडे जास्त असले कीं, तो खरा ज्ञानी समाधानी होतो परंतु, अज्ञानी समाधानी कधीच होत नाही. म्हणून कोणीही गरजेपेक्षा थोडेच जास्त धन जमवावे असे जाणकार सांगतात. त्यामुळें धन नाशाची भितीसुद्धा रहात नाही. जास्त धन असलेला जास्त सुखी असें अज्ञानी समजतात, खरेतर गरजेपुरते धन असणे हेंच खरे सुखाचे कारण असले पाहिजे. गरजेपेक्षा जास्त धनाचा लोभ दुःखाचे कारण होते. जास्त धन झाल्यास त्याच्या संरक्षणासाठी कांहीं धन खर्च करावे लागते, त्यातून अनेक प्रश्न उत्पन्न होतात. माणूस त्यात गुंतून जातो. जीवनाचा मुख्य उद्देश जो

आत्म शुद्धी त्याचा त्याला विसर पडतो. त्यामुळें पुण्यक्षय होतो.

युधिष्ठीर विचारतात, "अहो ब्राह्मण, माझी संपत्ति मिळवण्याची इच्छा सत्पात्र दान करण्यासाठी असते. त्या शिवाय माणसाला त्याच्या दैनंदीन जीवनासाठी संपत्ति जमवावी लागते. तसें नाही केले तर तो त्याच्या निजी आप्तांना कसा सुखी करेल? सगळे प्राणी तसेंच करत असतात, त्यात लोभीपणा कसा पहावा"? गृहस्थाने शिजवलेले अन्न यती व ब्रह्मचार्यांना दिले तर ते अयोग्य कसे ठरते? कारण, ते लोक अन्न शिजवत नाहीत. कांहीं किमान गरजा पूर्ण केल्याच पाहिजेत गृहस्थाने. तहानलेल्याला पाणी देणे, थकलेल्याला विश्राम करण्यासाठी बिछाना, भुकेलेल्याला खाद्य, भेटलेल्या इसमाला गोड वाणीने बोलणे, उभे राहून दमलेल्याला बसण्यासाठी आसन, अतिथीचे स्वागत करणे हे सुद्धा धन समजावे कां? ते करणे, पाप कसे ठरेल"? कोणीही फक्त स्वतासाठी खाद्य बनवू नये, खाण्यासाठी प्राणी मारतांना त्याचे प्रथम देवतांना अर्पण करावे. त्याच प्रमाणे, त्या प्राण्याची पुजा करून त्याचे आभार मानावे, कारण त्याच्यामुळें आपल्याला खाद्य मिळत आहे. देवांना व पितरांना अर्पण केल्यानंतरच ते अन्न माणसांने खावे. थोडे सकाळी व संध्याकाळी सूर्य मावळण्या आधी खाद्य जमिनीवर व आकाशात फेकून द्यावे ते सभोवारच्या पिशाच्याना  मिळावे. पक्षांना दाणे द्यावे, असें केल्याने विस्वदेव यज्ञ सिद्ध होतो. प्रत्येक गृहस्थ तो यज्ञ करील अशी आपल्या येथे परंपरा आहे. जो अशारितीने त्या प्राण्याची पुजा करून त्याचे आभार मानून त्यानंतर त्याचे मांस देवाला प्रसाद म्हणून दिल्यानंतर तो प्रसाद खातो तो अमृत प्राशन करत आहे असें समजले जाते. कारण, यज्ञ केल्यानंतर जे उरते त्याला देवांचा, पितरांचा प्रसाद (विघास) समजतात. त्याच प्रमाणे, अतिथीला जेवण देणे सुद्धा विघास सारखेच समजले जाते. अतिथीला सन्मानपूर्वक वागवणे, त्याला सुरक्षित वाटावे असें वागणे, हे दक्षिणा म्हणून समजले जाते. अतिथीचे स्वागत करणे हे सुद्धा विस्वदेव यज्ञाचाच एक प्रकार समजला जातो. जर अतिथीला असुरक्षित वाटत असेल, यजमानाच्या विशिष्ट वागण्यामुळें तर ते त्याच्या विरुद्ध असें समजले जाते. थकलेल्या अभ्यागताला विश्राम करण्यास मदत करणे, त्याला खाणे देणे हेसुद्धा दक्षिणा समजले जाते. अशा वागण्याला दाक्षिण्य असे म्हणतात. थोडक्यात चांगुलपणाचे सर्व प्रकारचे वागणे ह्यात येते. दाक्षिण्य हासुद्धा गृहस्थासाठी एक यज्ञा समान

समजला जातो. हे सगळे पुण्यकर्म समजले जाते. एवढे बोलल्यानंतर युधिष्ठीर शौनकांना विचारतो, "अहो ऋषीवर्य ह्या बद्दल आपले काय मत आहे"?
शौनक बोलतात, हे सगळे उघड आहे परंतु, त्यात निरनिराळ्या दृष्टी आहेत. कांहीं समजतात, देवांचे, पितरांचे आणि पिशाच्च्यांचे शिधा वेगवेगळे द्यावे. देवांचे मुख अग्नी आहे म्हणून देवांचे यज्ञकुडात अर्पण करावयाचे असते. त्या आधी यज्ञकुंडातील अग्नीला चेतवण्यासाठी शुद्ध लोण्याचे अर्ध्य द्यावयाचे असते. पितरांचे ब्राह्मणांना द्यावयाचे असते व पिशाच्च्यांचे प्राणी मात्रांना ज्यात माणसेसुद्धा येतात, द्यावयाचे असते. कांहींच्या मते पिशाच्चांचे त्यासाठी चारही दिशांना फेकून द्यावयाचे असते परंतु, त्यातसुद्धा भेद आहेत, जर असें प्राणी ज्यात माणसेसुद्धा येतात समोर असतील तर त्यांना ते दाक्षिण्या प्रमाणे सन्मानपूर्वक वाढावे. ह्या सगळ्या क्रिया विस्वदेव यज्ञाचा भाग समजतात. असें केल्याने ब्रह्मदेव संतुष्ट होतो असें समजले जाते म्हणून त्याला विश्वदेव यज्ञ असेसुद्धा समजतात. विस्वदेव यज्ञ करणे ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णाच्या लोकांसाठी विशेष महत्वाचे असते. त्या यज्ञ करण्या बरोबर व्रतस्थता पाळणे आवश्यक असते. असा यज्ञ करतांना त्या त्या विषयांचे साम (सामवेदातील कवनं) गाईली जातात जर ते शक्य असेल तर. थोडक्यात अन्न दान करणे म्हणजे विस्वदेव यज्ञ करणे असे समजावे. इतरांना चांगुलपणाने वागवणे हासुद्धा विस्वदेव (विश्वदेव) यज्ञाचा भाग समजतात.
त्याशिवाय ब्राह्मणांना भेटवस्तू देणे हेसुद्धा गृहस्थाच्या दैनंदीन कर्तव्यात येते. देवांचे व पितरांचे विस्वदेव यज्ञ करण्यात मदत करणार्या पुरोहिताला दक्षिणा देण्याचा प्रघात आहे. पिशाच्च्यांचे विस्वदेव करण्यात ब्राह्मण पुरोहित आवश्यक नसल्याने जे भेठवस्तू दान करावयाचे ते त्या माणसाला द्यावयाचे जो शिधा स्वीकारतो. त्याला दक्षिणा असें समजले जाते.
पुढे शौनक सांगतात, "असें सगळे आपण सांगत असलो तरी त्यात विविध प्रकारचे मतभेद आहेत, ते समजून घेऊ. ज्या गोष्टी करण्यास चांगली माणसें शरमतात परंतु, वाईट माणसें निर्लज्जपणे करतात, त्यास अज्ञान कारणीभूत असते. ते स्वताच्या शरीराच्या वासनांचे गुलाम झालेले असतात. मूर्खसुद्धा (तामसी) वरकरणी दिसायला चांगली कामं करतात परंतु, त्यात त्यांचा उद्देश तसा नसतो. ते त्यांच्या वासनांच्या प्रेरणेने

ते करत असतात. त्यात पुण्य नसते. जसें रथी त्याच्या पिसाळलेल्या घोड्यांमुळें त्याचा रथ आवरू शकत नाही असें ते होत असते. अरे युधिष्ठीरा, ह्यात रथ म्हणजे आपले शरीर, घोडे म्हणजे आपल्या शरीराच्या वासना आणि स्वतः रथी म्हणजे आपला आत्मा असे ते रुपक आहे. आपल्या सहा ज्ञान इंद्रीयांना (मन, नेत्र, कान, नांक, जीभ, त्वचा) कांहीं उपभोग्य गोष्ट आढळते तेव्हां त्या बद्दल त्या शरीराला वासना उत्पन्न होण्याची शक्यता असते. ते प्राप्त व्हावे म्हणून त्याची धडपड सुरु होते. त्यातून विविध अपेक्षा सुरु होतात. त्यातून इच्छा उत्पन्न होतात. ते मिळवण्यासाठी ते शरीर त्याच्या सगळ्या कर्मेंद्रियांच्या सहाय्याने त्या इच्छा पूर्तीसाठी काम करावयास लागते. आणि मग जसें प्रकाशाच्या आकर्षणामुळें किटक त्या अग्नीत उडी घेतो व जळून जातो तसेंच आपले शरीर त्याच्या वासनापूर्तीसाठी भोगरुपी अग्नीत स्वतःला जाळून टाकते. अशारितीने त्याच्या इच्छापूर्ती करतांना तो सतत जळत रहातो. त्या इच्छा पूर्तीतून मिळणारे सुख हेंच खरे सुख अशा भ्रमात तो अज्ञानी तीच ती गोष्ट सतत करत रहातो व त्यालाच जीवनाची इतिकर्तव्यता समजू लागतो. वस्तुतः शरीराच्या वासनिक गरजा मर्यादीत असतात पण मनुष्य त्यात त्याच्या आधीन होऊन अधिकाधिक गुंतून घेत रहातो. त्यालाच अज्ञान असें म्हणतात. शरीराच्या गरजेपेक्षा जास्त भोग तो घेणे जरुरीचे असें समजून तो त्यात अडकत जातो. परंतु, जसें ज्ञानी त्याच्या शरीराच्या गरजांचे प्रमाण समजून तेवढेच त्यात गुंतले व त्या वासना वाढू दिल्या नाहीत तर तो त्या वासनांतून खर्या अर्थाने मुक्त होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागतो त्यालाच अध्यात्म साधना असें म्हणतात. अज्ञानी त्या वासनांच्या पूर्ततेसाठी पुनः पुन्हा जन्म घेऊ लागतात कारण, एका जन्मात ती पूर्ण झालेली नसते. त्या अनेक जन्मात तो ब्राह्मण जन्मापासून गवताच्या जन्मापर्यंत प्रवास करत रहातो. कधी माशाचा, कधी पक्षाचा तर कधी हिंस्त्र प्राण्याचा असें विविध जन्म त्याच्या गत जन्माच्या उरलेल्या वासनांच्या योग्यतेचे जन्म त्याला ब्रह्मदेव देत रहातो. त्या अज्ञानी आत्म्यासाठी तेंच त्याचे जन्मजन्मांतरीचे जीवन होते. परंतु, ज्याला वासनांच्या मर्यादांची कल्पना येते तो त्यात शरीराच्या गरजेपुरते रमतो व त्यांचा त्याग करण्याचेच धोरण अंगिकारतो. तसा आत्मा सावरला जातो व त्याचे जन्मसुद्धा त्या मर्यादेने निश्चित होतात. वेद सांगतात, माणसांने शरीराच्या गरजांप्रमाणें भोग घ्यावे व त्यात आत्म्याने रमू

नये. कार्य करावे पण त्यापासून अपेक्षा करू नये. कारण वेदांत सांगितल्या प्रमाणें माणसाचे काम कार्य करण्यापुरते मर्यादीत असते. त्यापासून अपेक्षा करणे त्याचे काम नसते. जसें सूर्य व चंद्र करतात. म्हणजे युधिष्ठीरा, निरपेक्ष बुद्धीने जो माणूस काम करतो तो वेदांच्या आदेशांचे पालन करत असतो. कारण शरीराच्या गरजेपेक्षा जास्त अपेक्षा माणसाच्या अहंकारातून उत्पन्न होतात असें वेदांत दिले आहे".

युधिष्ठीर विचारतो, "कोणती अशी कामं आहेत ती माणूस निरपेक्षपणे करू शकेल असें वेद सांगतात"?

शौनक सांगतात, "दानं करणे, भेटवस्तु देणे, तपश्चर्या करणे, खरे बोलणे, हित करणे, सत्पात्र क्षमा करणे, वासनांना आवर घालणे आणि वेदांचा अभ्यास (ज्ञानसाधना) करणे अशा आठ कृती माणसाला सत्याच्या दिशेने (पुण्याच्या दिशेने) नेण्यास सहाय्यभूत ठरतात. ह्यांतील पहिले चार माणसाच्या पितरांना मदत करतात. नंतरच्या चार आचरल्याने त्याची अध्यात्म साधना सुरु होते परंतु, त्या सगळ्या त्यात अहंकारी न होता करावयाच्या असतात. आधी जे सांगितले आहे कीं, काम करा परंतु, त्यापासून अपेक्षा करू नका हे ह्या आठांच्या बाबतीत लागू होते. ह्या आठ गोष्टी नुसार आचरण करणे ह्यालाच सत्त्वशिलता असें म्हणतात. त्यांचे निष्ठेने पालन करणे ह्यालाच व्रतस्थता असें समजतात. खरे ज्ञानी ह्याप्रमाणे आपले जीवन व्यतीत करत असतात. सातत्याने असें जीवन जगण्यामुळें स्वाभाविकपणे त्याच्या आत्म्याचे शरीराच्या वासनांत गुंतणे कमी होते. शरीराला त्याचे काम (शरीराची आठ कामं सांगितली आहेत अशी आहेत, खाणे, पिणे, आराम करणे, उपजिवीकेसाठी उद्योग करणे, शरीर संवर्धन, प्रजोत्पादन करणे, मनोरंजन करणे, ज्ञान साधना करणे. ह्यांनाच शरीराच्या आठ वासना असें समजतात. योगक्षेमात ह्यांची पूर्तता करावयाची असते.) करु द्यावे त्यापैकी कोणत्याही कार्यात आत्म्याने गुंतून घ्यावयाचे नसते. आत्म्याने फक्त अध्यात्मिक व्रतस्थतेत रहावे असे वेद सांगतात. माणसा आधी देवांनी हे साध्य केले म्हणून ते सदैव स्वर्गात रहात आहेत. जर माणूस ते साध्य करतो तर तोसुद्धा देवत्वाला जातो. जेव्हां देव त्या व्रतस्थतेत कमी पडतो तेव्हां तो पुन्हा माणसात जन्म घेतो. अशारितीने सत्वशिल आणि व्रतस्थ जीवन जगणे हेंच माणसासाठी प्रशस्थ समजले जाते. ह्या विवेचनात आत्म्याचे कार्य व शरीराचे कार्य सांगितले आहे ते

जो नीटपणे समजून त्याचे आचरण त्या मर्यादेत ठेवतो व सात्त्विक प्रवृत्तीने जगतो तो योगी समजला जातो.

[पुढे भगवद्गीतेत हा विषय अधिक सुत्रात कृष्ण अर्जुनाला सांगतो. हिंदू मान्यतेत ही दोन (सत्त्वशिलता आणि व्रतस्थता) मुलभूत समजली जातात]

आदित्य आणि वसु तसेंच अश्विनी कुमार हे त्याची देवता समजले जातात. अहो कुंतीपुत्रांनो , भरत वंशाचे मेरुमणी, ह्या दिलेल्या मार्गाने तुम्ही जावे असें मी तुम्हाला सांगून युधिष्ठीरा, मी तुझ्या शंकांचे समाधान करत आहे. खरेतर तुम्ही आधीपासून ह्या योगात रमलेले अहात तरी विषय निघाला म्हणून हे निरुपण केले आहे. त्यामुळें तुमचे पूर्वज समाधानी रहातील व ते तुम्हाला तुमच्या ह्या जीवनात मदत करतील. त्यात वैराग्य आचरले तर तुमच्या इच्छा (कर्तव्य पूर्तीच्या) पूर्ण करण्यासाठी ते आणि देव तुम्हाला मदत करतील व तुमचे हे वनवाशी जीवन सुखरुप होईल". एवढे सांगून शौनक ऋषी पांडवांना शुभेच्छा देतात.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा दुसरा भाग संपला.

# वनपर्व भाग तिसरा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, युधिष्ठीर, तो कुंतीपुत्र शौनकांने सांगितलेले तो बौद्धीक ऐकल्यावर आपल्या भावांसह त्यांना वंदन करतो व बोलतो, "वेदज्ञ ब्राह्मण माझ्या सह वनात येण्याचा आग्रह करत आहेत, मलासुद्धा त्यांचे आमच्या सह असणे चांगले वाटते परंतु, वास्तविक कारणांमुळें मी त्यांचे संगोपन करू शकणार नाही त्या वनात, तेव्हा मला सांगा अशा विचित्र अवस्थेत मी काय करावे"?

वैशंपायन बोलतात, शौनकांने सांगितलेल्या मुद्यांचा गोषवारा लक्षात घेऊन योगाचे भान राखून तो महान ऋषी धौम्य, युधिष्ठीराला सांगतात, "फार प्राचीन काळी जेव्हां बहुतेक प्राणी तहान व भुकेने व्याकूळ असतं. ते पाहून सवितृ (सूर्य) त्या जीवांवर दया बुद्धीने एक कृपा करावयाचे ठरवतो. तो प्रथम उत्तरेकडे आपले किरण सोडून त्या द्वारा तेथील पाणी दक्षिणेकडे आणून टाकू लागतो. वनस्पतींचा देव चंद्र, त्या सूर्याच्या उष्णतेचे पाण्याच्या बाष्पात रुपांतर करून ढगं तयार करतो. ती ढगें वरुणाच्या कृपेमुळें पुन्हा पाण्यात बदलतात व आकाशातून पाणी पृथ्वीवर येते, त्यातून पावसाची सुरुवात झाली. त्यामुळें वनस्पती वाढू लागल्या. अशारितीने सूर्याचेच एकापरीने पाण्यात रुपांतर होत होते व जीवन त्या सहा रुचींने (गोड, कडू, आंबट, तुरट, तीखट, खारट) संपन्न होत होते. त्यातून सगळ्या प्राण्यांचे खाद्य तयार होते. ह्या सर्वांपाठी सूर्यच असतो. जे कांहीं घडते ते सूर्याच्या उर्जेतूनच येत असते त्याला चंद्राची साथ असते. म्हणून सूर्याला सगळ्या जीवांचा पिता असें मानले जाते. तू सुद्धा त्याच्याच आश्रयात आहेस. सूर्य हे सगळे करतो त्याच्या बदल्यात कांहीं अपेक्षा करत नाही. सूर्याचा हा गुणविशेष लक्षात घेऊन, **सर्व प्रमुख राजघराणी त्यांचे नाते सूर्याशी जोडतात. परंतु, चंद्रामुळेंच सूर्य आपले काम करू शकतो म्हणून चंद्रसुद्धा जीवांना जगण्यासाठी मोठी मदत करत असतो, हे पहाता कांहीं दुसर्या दर्जाच्या राजघराण्यानी त्यांचे नाते चंद्राशी जोडले. म्हणून कांहीं घराणी सूर्यवंशी समजतात व कांहीं चंद्रवंशी असतात. त्यामुळें चंद्र सूर्यासारखे ते निरपेक्षपणे आपले कामं करत होते.** त्यातून अशी परंपरा सुरु झाली त्याप्रमाणें कुलिन राजे वैराग्य संपन्न जीवन जगू लागले. त्यात उदाहरणार्थ कार्तवीर्य, वैण्य, नहुष अशी ख्यातनाम क्षत्रिय घराणी

आहेत. त्यांचे सत्त्वशिल आणि व्रतस्थ जीवन सगळ्यापुढे आदर्श झाले. त्यांनी सूर्याचा आदर्श ठेवला म्हणून ते सूर्यवंशी समजले गेले. ज्यानी चंद्राचा आदर्श ठेवला त्यांना चंद्रवंशी म्हणतात. म्हणून खरे राजे आधी सांगितल्या प्रमाणे सत्त्वशिल आणि व्रतस्थ जीवन जगण्यास बांधलेले असतात. ही झाली कृतयुगातील रचना.

एवढे ऐकल्यावर राजा जनमेजय वैशंपायनांना विचारतो, "मला सांगा, ब्राह्मणांच्यासाठी युधिष्ठीर सूर्याची कशी प्रार्थना करतो"? ते ऐकल्यावर वैशंपायन सांगतात, "नीट लक्ष देऊन ऐक, स्वताला शुद्ध करून (शौंच मुखमार्जनादी विधी करून) त्यानंतर सर्वप्रकारच्या इच्छांचा त्याग करून ठरलेल्या समयी जो विधी तो करतो त्याबद्दलची माहिती मी तुला नंतर सांगेन. परंतु, त्यात एक गोष्ट महत्वाची आहे कीं, सूर्याची एकशे आठ नांवं तो जपतो. जी नांवं महर्षी धौम्यने पवित्र अशा पृथाला सांगितली होती. धौम्य ऋषीनी सूर्याची जी नांव सांगितली ती अशी, सूर्य, भग, त्वस्त्री, पुष, अर्क, सवितृ, इवी, गभस्तीमत, अज, काळ, मृत्यू, धात्री, प्रभाकर, पृथीवी, आप, तेज, ख, विवस्वात, दिपतंशू, वायू, आत्मनाम, सोम, बृहस्पति, शुक्र, बुध, अंगारक (मंगळ), इंद्र, सुची, सौर, शनैचर, ब्रह्म, विष्णू, भद्र, स्कंद, वैश्रावण, यम, विद्युतग्नी, जठराग्नी, ऐंध्न, तेजसामपति, धर्मध्वज, वेदकर्त्री, वेदांग, वेदवहन, कृत, त्रेता, द्वापार, कली, अशुद्धक, कला, कष्थ, मुहूर्त, क्षप, याम, क्षण, संवत्सर कार, अस्वत्थ, कालचक्र, विभावसु, पुरुष, शाश्वत, योगीन, व्यक्ताव्यक्त, सनातन, कालाध्यक्ष, प्रजाध्यक्ष, विश्वकर्मा, तमौंद, वरुण, सागर, अंशु, जिमुत, जीवन, अरिहन्, भूतश्रव, भूतपति, श्रस्त्री, संवर्तक, वन्ही, सर्वद, अलोलुप, अनंत, कपिल, भानु, कमद, सर्वतोमुख, जय, विशाल, वरद, मनस, शुपर्ण, भूतदी, शिध्रग, प्रंधारण, धन्वंतरी, धूमकेतु, आदिदेव, अदितीसुत, द्वादशात्मन, अरविंदाक्ष, पितृ, मातृ, पितामह, स्वर्गद्वार, प्रजाद्वार, मोक्षद्वार, तृपिस्तप, देहकर्ती, प्रसंतात्म, विश्वात्मन, विश्वतोमुख, चरचरात्म, सुखस्मतमन, मैत्रेय, अशी एकशे आठ पेक्षा जास्त नांवे त्या सूर्याची ब्रह्मदेवांनी ऋषींना सांगितली आहेत ज्याच्या तेजामुळें ही सृष्टी काम करते. त्यांच्या नित्य स्मरणाने माणसाला संमृद्धी प्राप्त होते. ती नांवें घेऊन प्रार्थना करणार्याने प्रत्येक वेळी नांव घेतल्यावर "मी तुला भास्कराला वंदन करतो, ज्याचे देव, पितर, यक्ष, असुर, निशाचर आणि सिद्ध सुद्धा नित्य स्मरण करतात", असें बोलावयाचे

असते. एकाग्र चित्ताने तो सुर्योदयाच्या वेळी हा स्मरण करण्याचा विधी करतो त्याला समृद्धी, सुस्वरुप भार्या व सगळी सुख मिळतात. त्याला मनःशांति प्राप्त होते. त्याला त्याच्या सगळ्या नित्य गरजा पूर्ण झाल्याने चिरसुख प्राप्त होते".

पुढे वैशंपायन सांगतात, असें धौम्य ऋषींकडून ऐकल्यावर युधिष्ठीर त्या प्रमाणे प्रार्थना करण्यासाठी स्वतःला शुद्ध करून सूर्याची ती प्रार्थना करण्यासाठी सिद्ध होतो. त्याची ब्राह्मणांना आधार देण्याची इच्छा तीव्र असते म्हणून तो ते करू लागतो. गंगेच्या पाण्यात उभे राहून तो कांहीं मंदार वृक्षाची फुलं सूर्याच्या दिशेने फेकतो व अर्घ्य देऊन प्राणायाम करत दिनकराची पुजा करतो. त्या मध्ये तो त्याच्या सर्व वासनांचा त्याग करून सूर्याच्या स्तुतीची कवनं गाऊ लागतो.

ती युधिष्ठीराने केलेली स्तुती अशा शब्दात होती, "अहो सूर्य, तुम्ही विश्वाचे नेत्र अहात, तुम्ही जीवन अहात, तुम्ही सगळ्या सृष्टीचे उगमस्थान अहात, तुम्ही सगळ्या सत्कृत्याचे कारण अहात, तुम्ही सांख्य तत्त्वाचे कारक अहात, तुम्ही आत्म्याचे मूळ अहात, तुम्ही योग करणार्यांचे स्फुर्तीस्थान अहात, तुम्ही ज्ञानाचे असें द्वार अहात ज्याचे दरवाजे सदैव सताड उघडे असतात, तुम्ही मोक्षमार्गींचे आशास्थान अहात, तुम्ही हे जग जगवता अहात, तुम्ही तुमच्या निस्वार्थ प्रेरणेने जगाला जगण्यासाठी मदत करता, सगळे वैदिक ब्राह्मण तुमची स्तुती करतात, वेदांत तुमची स्तुती केलेली आहे, तुम्ही ईष अहात, सिद्ध, चरण, गंधर्व, यक्ष, गुह्यक, नाग, सगळे तेहतीस प्रकारचे देव तुमची प्रार्थना करतात. त्यांचे तुम्ही कल्याण करता. उपेंद्र (विष्णू) आणि महेंद्र (महादेव) आणि सगळे वैमानिक तुमच्या कृपेमुळें यशस्वी झाले आहेत. महा श्रेष्ठ विद्याधर तुमच्या कृपेनेच त्यांच्या उच्चपदाला पोहोचले आहेत. गुह्यक (देव आणि पितर ह्यांच्या मधली अवस्था) आणि सात प्रकारचे पितर, दैवी आणि मानवी, तुमच्या कृपेनेच उच्चपदी रहात असतात, वसु, मरुत, रुद्र, साध्य, मरिचीपी, वालखिल्य आणि सिद्ध असें सगळे तुझ्या कृपेनेच त्या उच्चस्थानी बसले आहेत. ह्या सात विश्वांत तुमच्या सारखे तेजस्वी कांहींही नाही. जो प्रकाश आणि उष्णता ह्या जगात आहे ती तुझीच आहे. सर्व पंचमहाभूत, सर्व बुद्धी, सर्व ज्ञान, सर्व वैराग्य तुझ्यातूनच उत्पन्न होते. वैराग्याने प्राप्त होणार्या अणिमा व गरिमा ह्या सिद्धी, असुरांचा पराभव करणारा सारंग (विष्णूचे चक्र), ज्या चक्राने ते करतो ते चक्र

विश्वामित्रानेच तयार केले होते. ते तुझ्याच प्रेरणेने झाले होते. तुझ्यामुळें उन्हाळा येतो व त्यानंतर पावसाळा येतो त्यामुळें वनस्पती उगवतात व त्यातून प्राणी त्यांची उपजिविका करतात ते सर्व तुझ्या कृपेनेच होत असते. प्राणीमात्रांच्या शरीरातील पंचप्राण, जे अशा नांवाने ओळखले जातात, प्राण, अपान, समान, उदान, व्यांन तुझ्यामुळें काम करत असतात. हे पांच प्राण जीव म्हणून ओळखले जातात. म्हणून जोवर ते कार्यरत असतात तोवर तो प्राणी जीवंत असतो, एर्हवी मृत समजला जातो. ते शरीराच्या व्यवहारात मदत करतात. ते आत्म्यापेक्षा वेगळे असतात. *आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, प्रजापति आणि वशतकर (ह्या स्वर्गीय प्रजाती आहेत, ह्यानांच तेहतीस कोटी म्हणजे प्रकारचे देव असें म्हणतात.)* त्यासुद्धा तुझी प्रार्थना करतात, जसें कपडे थंडीपासून संरक्षण देतात तसे तुझे किरण थंडीपासून हिंवाळ्यात संरक्षण देतात. तुझे किरण पृथ्वीवरील तेरा बेटांना जीवन देत असतात. तुझ्यामुळेंच तिनही जग जीवंत असतात. तुझ्या उगवण्याने जगात चैतन्य येते. तू नाही उगवलास तर जग अंधःकारमय होईल. सगळी कामं बंद पडतील. पुण्य कमावणे, हित करणे आणि समृद्धी मिळवणे हे सगळे करण्यासाठी तुझा प्रकाश आवश्यक असतो. तू माणसांना समृद्धी देतोस पण त्यातून तू कांहीं मागत नाहीस, तो अज्ञानी मजतो त्याच्या समृद्धीचा तोंच कारक आहे, म्हणूनच त्याल अज्ञानी समजतात. तुझ्या कृपेमुळें तिनही द्विज, ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य आपापली कामं कर्तव्य (धर्म, यज्ञ) पार पाडत असतात त्यात अधन, पशुबंधन, इष्टमंत्र, यजन आणि तपक्रिया अशा विघी येतात. वेदात सांगितले आहे, ब्राह्मणाचा दिवस तुझ्या उगवण्याने सुरु होतो व तुझ्या मावळण्याने संपत असतो. तुम्ही मनुचे व त्यांच्या मुलांचे मालक अहात. तुम्ही मन्वंतराचे कारक अहात. जेव्हां हे विश्व संपणार असते तेव्हां अग्नी ज्याला समवर्तक म्हणतात, तो तुझ्यातून उत्पन्न होतो. तो अग्नी सगळे जग जाळून टाकून उरतो. विविध रंगाची ढगं ऐरावताच्या सानिध्यात प्रचंड मेघगर्जना करत महापूर आणतात. तू बारापट मोठा होतोस व सगळा समुद्र तुझ्या किरणांनी आटवून टाकतोस. तेव्हां तुलाच इंद्र असें म्हणतात. तूंच विष्णू, तूंच ब्रह्मा, तूंच प्रजापति आहेस, तूंच अग्नी व तूंच मन आहेस, तूंच अंतिम सत्य आहेस. तूंच हंस आहेस, तूंच सवितृ आहेस, तूंच भानू आहेस, तूंच अंशुमन, तूंच वृशकपी, तूंच विवस्वान, मिहीर, पुश, मित्र, धान आहेस. तूंच हजार किरण फेकणारा

आदित्य आहेस. तूंच तपन आहेस, तूंच मार्तंड आहेस, तूंच अर्क, अर्न, सूर्य, शरण्य म्हणजे दिवस उत्पन्न करणारा आहेस. म्हणून तू दिवाकर आहेस. तूंच सुप्तसप्ती, विरोचन, धुमकेशीन आहेस. तुलाच तेज म्हणतात व अंधाराचा नाशक म्हणतात. तुझ्या घोड्यांचा रंग पिवळा आहे, जे तुझी पुजा चंद्रमासातील तीन, सहा व सात ह्या दिवशी करतात त्यांना लक्ष्मी प्राप्त होते. जे तुझा अनन्यसाधारण आराधना करतात त्यांना संकटे, दुःख आणि अडचणींपासून मुक्तता मिळते. जे तुला सगळ्यात पहातात त्यांना दीर्घायुष्य, पुण्य आणि निरोगी जीवन प्राप्त होते. तू माझ्यावर कृपा कर व मला नेहमी भरपूर अन्न मिळेल असें कर म्हणजे मी ब्राह्मणांचे व इतर पाहुण्यांचे आदरतीथ्य करू शकेन. तुझ्या सगळ्या शिष्यांचा सुद्धा आदर करतो त्यात मथर, अरुण आणि दंड आहेत. त्यात अशनि, क्षुव व इतर सुद्धा आहेत. मी सगळ्या दैवी मातांचा आदर करतो, त्यात क्षुवा आणि मैत्री आहेत. त्याने मला मदत करावी अशा माझी अपेक्षा आहे.

पुढे वैशंपायन सांगतात, अशारितीने युधिष्टीर सूर्याची पुजा करतो. त्या पुजेने संतुष्ट झालेला सूर्य त्याला प्रसन्न होतो. त्याला दर्शन देऊन तो विवस्वान बोलतो, "तुला जे कांहीं पाहिजे ते सगळे तुला मिळेल. मी तुझ्यासाठी सगळ्या व्यवस्था करीन ज्यामुळें तू तुझ्या अतिथी ब्राह्मणांचे व इतर अभ्यागतांचे स्वागत करू शकशिल". त्या नंतर तो विवस्वान त्याला एक तांब्याचे पात्र देतो. आणि वर देतो किं, "जोवर तुझी पत्नी पांचाली, हे पात्र हातात धरून उभी असेल तोवर त्या पात्रातून तुला पाहिजे ते अन्न मिळेल. त्यात शिजलेले मांस, कंदमुळं, फळं असें सगळे असेल". त्यानंतर तो विवस्वान त्याला आशिर्वाद देतो कि, "आजपासून चौदाव्या वर्षी तुला तुझे राज्य मिळेल".

वैशंपायन पुढे सांगतात, एवढे बोलून तो देव अंतर्धान पावतो. अशारितीने खर्या मनाने तो सुर्याची प्रार्थना करत असल्यामुळें त्याला तो वर जो कोणालाही सहजपणे मिळणे अशक्य असा, तो मिळतो व ते पात्र मिळते. असे समजतात किं, जे कोणी सच्च्या मनाने ही पुजा करतात दररोज संध्याकाळी त्याचे सगळे प्रश्न सुर्यदेव मिटवतो. ब्रह्माने खुद्द ती पुजा एकदा इंद्राला सांगितली होती. त्याच्याकडून ती नारदाला कळली. नारदाने ती धौम्यना सांगितली. आणि आता धौम्यकडून युधिष्ठीराला समजली. ह्या मंत्रामुळें तो सिद्ध झाला तर कोणत्याही युद्धात त्याला यश हमखास मिळते. त्या मंत्रामुळें अफाट संपत्ति प्राप्त होते.

ह्या मंत्राचे नित्य पठण करणारा सर्व पापापासून मुक्त होतो व स्वर्गात जातो असें समजतात.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने सुर्याकडून वर मिळालेला तो कुंतीपुत्र गंगेच्या पाण्यातून बाहेर येतो. धौम्यऋषींचे पाय धरतो. त्यानंतर तो त्याच्या सगळ्या भांवांना मिठी मारतो. त्यानंतर तो द्रौपदी बरोबर त्यांच्या स्वयंपाक घरात जातो. तेथे द्रौपदी ते भांडे तिच्या हातात धरते व त्यांचा स्वयंपाक सुरु होतो. त्या भांड्यातून थोडे थोडे परंतु, स्वच्छ, सुंदर चवीष्ट चार रुचीने युक्त (गोड, आंबट, तुरट, तिखट) असें खाद्य पदार्थ त्या भांड्यातून बाहेर येऊ लागतात. ते तसे न थांबता सतत येत रहाते. सगळ्यांनी खाऊन सुद्धा ते उरले होते. त्या पात्राच्या मदतीने तो पंडुपुत्र त्याच्याकडे असलेल्या ब्राह्मणांना पोटभर जेऊ घालतो. यजमानाने सगळे जेवल्यानंतर जेवावयाचे असते जे उरले असेल ते त्यांनी खावयाचे असते त्या अन्नालाच विघास असें म्हणतात. सगळे पुरुष जेवल्यावर शेवटी प्रिशताची मुलगी, कृष्णा जेवावयाला बसते. ती जेवल्यावर ते अन्न संपते. अशारितीने त्या मिळालेल्या वरामुळें प्रसन्न झालेले ते पांडव त्यांच्या कडे आलेल्या ब्राह्मणाच्या बरोबर वार्तालाप सुरु करतात. त्यांच्या पुरोहितांच्या आज्ञेत रहाणारे ते पांडव शास्त्रात दिलेल्या विधी करून मंत्र विधीयुक्त असें यज्ञ करू लागतात.

ते पंडुचे पुत्र त्यांच्या राजपुरोहीत धौम्य ऋषींबरोबर आणि इतर ज्ञानी ब्राह्मणांसह त्यानंतर जंगलात प्रवेश करतात.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा तिसरा भाग संपला.

# वनपर्व भाग चौथा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, येथे हस्तिनापुरात पांडव वनवासी गेल्यानंतर धृतराष्ट्र, अंबिकेचा पुत्र ज्याचे नेत्र होते त्याचे ज्ञान, अतिदुःखी झाला. आपल्या सिंहासनावर बसलेला तो राजा, त्याच्या धाकट्या भांवास, विदूरास, जो दूरज्ञानी होता, जो त्याचा प्रधानसुद्धा होता त्याला बोलतो, "तू जे सांगत होतास ते अचूक होते, अगदी भार्गवासारखे. तुझे नैतिकतेच्या सगळ्या बारकाव्यांचे ज्ञान उत्तम असते. तू सगळ्या तुझ्या पुतण्यांना नेहमी सारख्याच दृष्टीने पहात असतोस हे मी जाणतो. आता मी काय करणे ह्या परिस्थितीत, कौरवांसह ते मला सांग. जे व्हायचे ते झाले, आता त्यात फरक करणे असंभव परंतु, त्यावर तोडगा म्हणून मी कोणते पाऊल टाकावे ते तू सांग. आपल्या ह्या कृत्यामुळें आपली प्रजा भलतीच नाराज झाली आहे असें दूत सांगत आहेत व ते राजासाठी चांगले नाही. प्रजेची मर्जी पुनः मिळवण्यासाठी मी काय केले पाहिजे असें तुला वाटते"? कारण, जर जनता बिघडली तर ती आम्हाला मुळासकट उपटून टाकू शकते. म्हणून मी तुला बोलावले आहे. तुझा राजनितीचा अभ्यास अतुलनीय आहे, सर्व डावपेंच तुला समजतात". ते ऐकल्यावर विदूर त्याला सांगतो, "राजाला तीन उद्देश डोळ्यासमोर ठेवून काम करावे लागते. फायदा, आनंद आणि मोक्ष असें ते असतात. ह्या तिघांची मूळं सद्गुणांत असतात. तसेंच ज्ञानी असेसुद्धा सांगतात की, चांगल्या राज्याची बैठक राजाच्या सद्गुणावर अवलंबून असते. म्हणून अरे राजा, तुझ्या मुलांच्यात व पंडुच्या मुलांच्यात तू फरक केलास. सुवलाच्या कारस्थानी मुलाच्या नीच हालचालींमुळें ते झाले. जेव्हां तुझ्या मुलांनी कपटी मनाने त्या निष्पाप पांडवांना द्युतासाठी आमंत्रण दिले व छल कपटांने त्यांना जिंकले त्यामुळें एका चांगल्या राजाला शोभणार नाही असें घडले. जर तुझी मुलं त्यांच्या वाईट वागणूकीचा त्याग करून चांगल्या सवयी अंगिकारतील तर ते सज्जन समाजात पुन्हा सन्मानाने बसू शकतील. अजून वेळ गेलेली नाही, की तू त्या निष्पाप पांडवांना बोलावून त्यांचे त्यांना देऊन टाकावेस. माझ्या दृष्टीत हांच एकमेव उपाय आहे प्राप्त परिस्थिती सुधारण्याचा. राजाने त्याच्या राज्यात समाधानी रहाणे हेसुद्धा एक सद्गुणाचे लक्षण समजले जाते. गैरमार्गाने दुसर्याची संपत्ति काढून घेणे कोणत्याही

नैतिकतेच्या नियमात बसत नाही. असें तू केलेस तर तुझी किर्ती होईल व लोक तुला गतकर्मा बद्दल क्षमा करतील. त्याशिवाय पुढे जे कलह उत्पन्न होऊन कुरु वंशाचा नाश होणार तो टाळता येईल. म्हणून माझ्यामते हे तुझे प्रथम कर्तव्य असेल कीं, तू त्यांना त्यांची मालमत्ता बिशर्त परत करशील. त्याच प्रमाणे त्या तुझ्या मेव्हण्याची, शकुनीची, त्याच्या गांधार देशास बोळवण करशील. असें केलेस तरच तुझ्या मुलांचे भविष्य सुरक्षित होईल व तुला मनःशांती मिळेल. असें तू वेळीच केलेस तर उद्याचे मोठे संकट टळेल. कारण, ते दोघे पांडव व त्यांच्या बरोबर त्यांचे जुळे भाऊ नकुल आणि सहदेव एकत्र असल्याने कौरवांचा नाश केल्याशिवाय रहाणार नाहीत. त्या सव्यसाची अर्जुनाला व भिमाला काय अशक्य आहे? त्यांच्याकडे गांडीव आहे, न संपणारे दोन भाते आहेत अशा बरोबर सगळे सैन्यसुद्धा लढू शकणार नाही, मग तुझे कौरव किती काळ टिकाव धरतील. तुला वाईट वाटेल पण तुला आठवत असेल कीं, मी तुला सांगितले होते किं, हा मुलगा जो जन्मल्या बरोबर कोल्ह्या सारखा ओरडू लागला होता, त्याचा त्याग कर पण तू पुत्र मोहाने ते केले नाहीस, आता त्याचे परिणाम भोगण्याची वेळ समीप आली आहे. तुला धृतराष्ट्रा, प्रज्ञाचक्षू असें समजतात पण त्यावेळी तुझ्या पुत्र प्रेमांच्या मोहांने तुझ्या प्रज्ञेवर मात केली. माणसाला मोह झाला किं, त्या पुढे त्याची प्रज्ञासुद्धा कशी हरते त्याचे तुझे वागणे हे एक उदाहरण आहे. शुक्राचार्यांना सुद्धा प्रज्ञाचक्षू म्हणून संबोधतात (बोलतात) त्यांनी मोहात न जाता असुरांची सेवा उत्तमरित्या केली तसे तुझ्याबाबत झाले नाही. त्यांनी शुद्ध बुद्धीने शुक्र निती सांगितली व तू मात्र तुझ्या मोहात अडकल्यामुळें मतिभिन्न झाला आहेस. मी तुला अरे राजा, तुझ्या हिताचे जे मला दिसते ते सांगत आहे. मी जसें सुचवत आहे तसे तू केलेस व तुझा पुत्र आणि पंडुचे पुत्र सलोख्याने आपापल्या राज्यात राज्य करत राहिले तर सोन्याहून पिवळे होईल व सर्वत्र शांति आणि सुख आढळेल, परंतु जर तू तुझ्या व्रात्य मुलाच्या आग्रहास बळी पडत राहिलास तर तुझ्या सगळ्या मुलांचा व त्यांच्या मुलांचा पर्यायाने तुझ्या कुळाचा नाश निश्चित आहे. जर तुझ्यासाठी तुझी मुलं आणि पांडव समसमान आहेत तर मग तू राजन्यायांने सर्वात मोठा युधिष्ठीर असल्याने त्याला तुझा वारस म्हणून नेमावे व दुर्योधनाची त्याच्या प्रधानपदी नेमणूक करावी. असें झाले तर सगळ्या पृथ्वीचे व्यापारी तुम्हाला खंडणी राजीखुषी देतील कारण ते राज्य

सुखासमाधानाचे व न्यायाचे होईल. साक्षात कृत युग अवतरेल. दुर्योधनाच्या हाता खाली त्याचे मित्र, कर्ण, शकुनी, दुःशासन पांडवांच्या हाताखाली काम करतील. त्याच प्रमाणें शहाण्यासारखा तो दुःशासन भर सभेत भिम आणि द्रौपदीची माफी मागेल. असें सगळे जर तू जमवू शकलास तर कांहींच प्रश्न उरणार नाही". विदूराचे ते सांगणे ऐकल्यावर थोड्या नाराजीने त्याचा मोठा भाऊ बोलतो, "अरे विदूरा, तू हे जे सांगतोस ते पांडवांच्या हिताचे आहे, माझ्या मुलांच्या हिताचे नाही. माझे मन हा तुझा सल्ला मानवयाला तयार नाही. हे असें कसे सगळे तू तुझ्या मनात निश्चित केलेस? तुझ्या ह्या बोलण्याचा अर्थ तू अजूनही पांडवांच्या बाजूचाच आहेस. मी माझ्या मुलांना टाकून पंडुच्या मुलांना जवळ करू हे कसे शक्य आहे मला! माझी मुलं माझ्या रक्ताची आहेत हे तू कसा विसरतोस? पांडवांत आपले रक्त आहे कां? ते केवळ संस्काराने शंतनुच्या कुळाचे वारस आहेत परंतु माझे पुत्र संस्कार आणि रक्त अशा दोनही प्रकारे वारस आहेत म्हणून जेव्हां राज्याच्या वारसाचा प्रश्न येतो तेव्हां माझी मुलं जास्त योग्य वारसदार ठरतात हे तुझ्या कसे लक्षात येत नाही? पांडवांना मी जवळ केले तर मी माझ्या रक्ताचा अवमान केल्या सारखे नाही कां होणार"? अरे विदूरा, तू जे मला चांगला सल्ला म्हणून सांगत आहेस त्यात मला छलकपट स्पष्टपणे दिसत आहे. मी तुझा फार आदर करतो पण ह्यावेळी तू मला खोटा सल्ला देत आहेस हे तू चांगले करत नाहीस. म्हणतात नां, कुलटेला कितीही चांगले वागवले तरी ती शेवटी आपल्या वळणावर जाणारच, तसें तुझे झाले आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, असें बोलून धृतराष्ट्र तडकाफडकी उठतो व त्याच्या कक्षात निघून जातो. ते पाहून विदूर स्वगत पुटपुटतो, हे घराणे बरबाद होणार असें दिसते. त्यानंतर तो पांडवांचा काका, पांडवांकडे जातो.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा चौथा भाग संपला.

# वनपर्व भाग पांचवा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, वनात रहाण्याच्या उद्देशाने ते महाबली पांडव त्यांच्या सोबत्यासह गंगा किनारी प्रवास करत कुरूक्षेत्री जाण्याचे ठरवतात. त्यानंतर सरस्वती, द्रुसद्वती आणि यमुना ह्या नद्यांना अर्घ्य अर्पून त्यांनी त्यांचा प्रवास एका जंगलातून दुसर्या जंगलात असा चालू केला. त्यांचा प्रवास पश्चिमेच्या दिशेने होत होता. कांहीं दिवसाच्या प्रवासानंतर ते कम्यक वनापर्यंत पोहोचतात. जेथे अनेक मुनी आपले आश्रम बांधून रहात असतात. तो प्रदेश सरस्वती नदीच्या किनार्यावरील एका सपाट भागात होता. त्या वनात भरपूर पक्षी आणि हरणांचे कळप वावरत होते. त्या प्रसन्न वाटणार्या वनात वस्ती करण्याचे पांडव ठरवतात. त्या भागात आधीपासून रहाणारे मुनीवर त्यांचे स्वागत करतात. विदूराला समजले किं, त्याचे पुतणे कम्यक वनात स्थाईक झाले आहेत ते समजल्यावर तो त्यांचा काका त्याच्या दृतगति रथाने तेथे पांडवांना भेटण्यासाठी निघतो. तो युधिष्ठीराला द्रौपदीसह एका निवांत जागी बसलेले पहातो. त्या बरोबर त्याचे भाऊ आणि इतर ज्ञानी ब्राह्मण तेथे गप्पा मारत बसलेले होते. विदूराला त्यांच्याकडे येतांना पाहून युधिष्ठीर त्याच्या भावास, भिमास सांगतो, "अरे बंधो, जरा विदूरांच्या समीप जाऊन त्यांना विचार काय संदेश आहे". कदाचित शकुनीला पुनः माझ्याशी द्युत खेळण्याची इच्छा झाली आहे कां ते पहा". नंतर इतर तेथे असलेल्या मंडळींकडे पहात तो राजा बोलतो, "ह्या छोट्या बुद्धीच्या शकुनीकडे द्युत नांवाचे अस्त्र आहे ते तो आमच्यावर सतत फेकण्याचा प्रयत्न करत आहे. त्याला ह्यावेळी द्युतात आमची शस्त्रं पणाला लावावयाची आहेत असें वाटते". ते युधिष्ठीराचे भाषण ऐकल्यावर तो महाबली भिम युधिष्ठीराकडे तीक्ष्ण दृष्टीने पहात ओरडून बोलतो, "आमची शस्त्रे आणि पुत्र पणाला लावण्याचा अधिकार आम्ही कोणालाही देत नाही. हे तू लक्षात ठेव. जर गांडीव व ते भाते गेले तर मोठीच पंचाईत होईल. माझी गदा कोणालाही पणाला लावता येणार नाही. प्रत्येक गोष्ट किती सहन करावयाची ह्याला कांहीं मर्यादा असतात, त्या तू मोडू नकोस. आपण त्यांच्याच जोरावर पुढची लढाई लढणार आहोत". असें बोलून भिम एका प्रकारे युधिष्ठीराला शेवटची ताकीद देत असतो.

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, विदूरांचे आगमन झाल्याने ते पांडव उठून उभे रहातात व त्यांचे स्वागत करतात. त्या स्वागताने प्रसन्न झालेला तो अजमिदा घराण्याचा विदूर तेथे त्याला दिलेल्या आसनावर जाऊन बसतो. तो बसल्यावर थोड्या वेळानंतर पांडव कुतुहलाने प्रेरित झालेले, त्याला विचारतात, "काय कारण झाले येण्याचे"? त्यानंतर तो राजकारण निपूण असा दूरदृष्टी राखून नेहमी विचार करणारा विदूर सांगू लागतो, ते पांडव गेल्यानंतर जे कांहीं घडत गेले त्याचा सगळा वृतांत प्रथम तो सांगतो व नंतर त्या अंबिका पुत्र, धृतराष्ट्राच्या मनातील घाण सुद्धा सविस्तरपणे निवेदन करतो. पुढे विदूर सांगतो, "अहो अजातशत्रू, मला तुमच्या काकांने बोलावले व माझा सल्ला मागितला जसें तो नेहमी करत आला आहे. तो मला सांगतो, "हे बघ गोष्टी फारच बिघडल्या आहेत, आपले प्रजाजन पांडवांना ज्याप्रकारे वागवले गेले त्यावरून खूप नाराज झाले आहेत. ते जर आणखीन चिडले तर आमच्या राजसत्तेचे कांहीं खरे नाही. तर त्या कशा सुधारावयाच्या त्या बद्दल तो माझे मत काय म्हणून विचारत होता. त्याने मला प्रश्न केला कीं, दोघाही चुलत भावांच्या हिताचे काय असेल तुझ्या मतें ते सांग", असें तो मला म्हणाला. ते ऐकल्यावर मी त्याला, माझ्या दृष्टीने जे हितकारक आहे दोघांच्या भविष्यासाठी ते सांगण्यास सुरुवात केली. परंतु, मी जे त्याला सुचवले ते त्याला आवडले नाही. त्याला पसंत पडेल असा कोणताही पर्याय मी देऊ शकलो नाही कारण, त्याला पसत होणारे सगळे पर्याय केवळ कौरवांच्या भल्याचे होते व तुमच्या अहिताचे होते. असा कोणताही पर्याय मी स्वीकारणे शक्य नव्हते. मी त्याला काय सल्ला दिले ते आता सांगतो, अरे अजातशत्रू, त्याने माझा अपमान करून मला घालवले. तो मला कुलटा म्हणाला, त्यानंतर त्यानी मला आठवण करून दिली कीं, मी एक दासीपुत्र आहे! तो म्हणाला कीं, एका दासीपुत्राकढून आणखीन काय ऐकायला मिळणार? हे पाहून मी समजलो किं, आता ह्या कुळाला कोणीही वाचवू शकणार नाही. चौदा वर्षानंतर काय होणार त्याची मला कल्पना आली. त्याला माझा सल्ला आवडला नाही कारण मी त्याला सांगितले कीं, तुला जो कुटूंबाचा ज्येष्ठ आहे त्याला नियमानुसार राजगादीवर बसवावे आणि भिम व अर्जुनांच्या हाताखाली इतर कौरव रहातील त्यामुळे पृथ्वीवरील राजे तुम्हाला मोठ्या खंडण्या देऊन श्रीमंत करतील. अशा रितीने तुम्ही सगळे सुखांने एकत्र राहू शकाल. परंतु

हा सल्ला त्याला रुचला नाही. त्याचे म्हणणे असें किं, त्याचे कौरव कुरुवंशाचे रक्ताने वारस आहेत जे पांडवांना प्राप्त होत नाही. मी त्याला सांगितले, पांडव संस्काराने कुरु घराण्याचे वारस आहेत व क्षत्रिय संस्काराची वारसदारीच प्रमाण मानतात. त्यावर तो अंध राजा माझ्यावर रागावून बोलला कौरव संस्कार आणि रक्त अशा दोनही प्रकारे वारस ठरतात. त्याला मी सांगितले, कौरव रक्ताने जरूर वारस ठरतात पण ते संस्काराने निश्चितच शंतनुचे वारस होत नाहीत कारण त्यांचे वागणे त्या संस्कारात बसत नाही. हे ऐकल्यावर तो राजा एकदम चिडला व उठून त्याच्या कक्षात निघून गेला. जातांना तो बोलला, तू तुला हवे तेथे जा, पुढे तो धृतराष्ट्र उद्गारला कीं, तो ह्यापुढे माझा सल्ला कधीही विचारणार नाही". एवढे सांगितल्यावर थोडा वेळ थांबून तो प्रधान पुढे सांगतो, "मी तुम्हाला कांहीं सांगू इच्छितो जर तुमची हरकत नसेल". विदूर पुढे सांगत रहातो, जरा सावधपणे मी जे सांगतो त्याचा विचार करा. शहाणा माणूस अनेक चुकीच्या मतांतून योग्य मताची निवड करतो तसें तुला करावयाचे आहे. सामान्यपणे मत देणारा त्याच्या सोयीचा सल्ला देतो. परंतु खरा हितचिंतक सल्लागार, यजमानाच्याच हिताचा विचार करून त्या प्रमाणे मत देत असतो. राजाने सगळी मते शांतपणे ऐकून घ्यावयाची असतात असा नितिशास्त्राचा आदेश आहे. अनेक मते समजून घेतल्यावर त्यातून आपल्याला काय हिताचे आहे ते तो पहातो व त्या मताची अंमलबजावणी करत असतो. कांहीं मते भावनांवर आधारित असतात त्यात तर्कशुद्धता नसते. असें निर्णय कांहीं काळासाठी योग्य असतात परंतु, ते चिरकाळासाठी अयोग्य ठरतात. कांहीं वेळा असें भावनिक निर्णय चांगले वाटतात परंतु, ते अंती घातक असतात. धृतराष्ट्र अशा भावनिक मतांच्या भोवर्यात अडकलेला आहे. तसे तुम्ही करू नये असे मला वाटते. अशा निर्णयांमुळें कणाचा डोंगर होतो व छोटे प्रश्न मोठे होऊन अंती नाशास कारणीभूत होत असतात. कांहीं वेळा थोडे मागे हटण्याने भविष्यात फायदा होत असेल तर काय हरकत आहे अशा निर्णयाची"? परंतु, धृतराष्ट्राला ते मंजूर नाही, त्याच्या मुलांना तुमची सत्तासुद्धा गिळंकृत करावयाची आहे असें मला दिसते. राजाचे सगळे निर्णय अशारितीने तारतम्य राखून घेतलेले असले पाहिजेत. धृतराष्ट्र त्याच्या पुत्रप्रेमांने अंध झाला आहे. म्हणून मी त्याला सांगितले किं, दोनही राज्याचे एक राज्य करून त्याचा सम्राट युधिष्ठीर व्हावा व पांडव आणि कौरव त्यांचे प्रधान होऊन राज्य कारभार

चालवतील. परंतु तो त्याला तयार नाही. दोन दिले दोन घेतले, अशा प्रकारे जो कारभार करतो तो कधीही उत्कर्षाला पोहोचतो. असें विदूराचे बोलणे ऐकल्यावर युधिष्ठीर त्याच्या चुलत्याला बोलतो, "आपले मत सर्वांच्या भल्याचे असते व आजही ते तसेच आहे. परंतु, हितद्वेषाने पिडलेले कौरव आणि त्यांचे पिता तो निर्णय समजून घेण्यास तयार नाहीत हे मी समजलो. मी मात्र तुमच्या विचारांशी पूर्णतया सहमत आहे. म्हणून आपण जो मार्ग आम्हाला सांगाल त्या मार्गाने आम्ही पांडव पुढचे कार्य करू.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा पांचवा भाग संपला.

# वनपर्व भाग सहावा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, विदूर पांडवांच्या कडे गेल्याचे समजल्यावर धृतराष्ट्र, जो खूप चाणाक्ष होता, त्याच्या विदूराशी झालेल्या बोलण्याचा त्याला पश्चात्ताप झाला. त्याला माहीत होते किं, विदूर युद्ध आणि मसलतीत कोणाहूनही श्रेष्ठ आहे तेव्हां त्याला दुखवून आपण बरोबर केले नाही असें तो समजतो. त्याचप्रमाणे पांडवांच्या भविष्यातील होणार्या वृद्धीचीसुद्धा त्याला कल्पना आली. ह्या सगळ्यांचा परिणाम स्वरुप तो राजा आपल्या खोलीत जाण्या आधीच तेथे उपस्थित असलेल्या इतर राजांच्या समक्ष शुद्धी हरवून खाली पडला. थोड्या वेळांनी तो उठतो व त्याच्या समोर उभ्या असलेल्या त्याच्या सेवकांस, गवळी कुळातील संजयास बोलतो, "अरे संजया, माझा भाऊ साक्षात न्याय देवता म्हणजे यम आहे ह्याचा मला क्षणिक विसर पडला होता, आणि मी जे तोंडाला येईल ते त्याला अद्वातद्वा बोलून गेलो त्याचा आता मला पश्चात्ताप होत आहे. त्याला तसें बोलून गेलो पण आता माझे हृदयात धडधड होत आहे". असें बोलून तो सम्राट धाय धाय रडू लागला. त्यानंतर तो राजा संजयाला आज्ञा करतो किं, त्याने जाऊन खात्री करून घ्यावी कीं, विदूर आता कोठे आहे, त्याने त्याच्या जीवाचे कांहीं बरेवाईट तर केले नाहीना. पुढे धृतराष्ट्र त्याला सांगतो, "माझा भाऊ विलक्षण बुद्धीमत्तेचा नमुना आहे, तो कधीही चुकीचे निर्णय घेत नाही. असें असून माझ्या मूर्खपणामुळें त्याचा कारण नसतांना माझ्या कडून नकोतसा अपमान झाला आहे, मला त्याची माफी मागितली पाहिजे. त्याला कसेही करून माझ्याकडे घेऊन ये नाहीतर मी माझ्या जीवाचे वाईट करीन.

वैशंपायन सांगत असतात, असें राजाचे उद्गार ऐकल्यानंतर तो प्रामाणिक सेवक, संजय ती आज्ञा मान्य करून बोलतो, "हो साहेब, आत्ताच जाऊन काय परिस्थिती आहे ते पाहून तुम्हाला सागतो". त्याला माहित होते किं, पांडव कम्यक वनात गेले आहेत म्हणून तोसुद्धा त्या दिशेने निघतो. लवकरच तो पांडव जेथे वस्ती करून होते त्या जागी पोहोचतो. तो जेव्हां पोहोचतो तेव्हां तेथे तो पहातो कीं, पांडव हरणाच्या कातड्याचे अंगरखे घालून बसले आहेत व त्यांच्या जवळ विदूरसुद्धा बसले आहेत. त्यांच्या भोवती बरेच, हजारोंने विद्वान ब्राह्मण सुद्धा बसलेले होते. ते दृष्य असें होते जणू काय स्वर्गात

देवसभा भरली आहे. तेथे गेल्यावर संजय धृतराष्ट्राचा सेवक, युधिष्ठीराला वंदन करून उभा रहातो. त्याचे स्वागत भिम आणि त्याचे इतर भाऊ मोठ्या सन्मानाने करतात. त्यानंतर प्रथेनुसार युधिष्ठीर त्याचे क्षेमकुशल विचारतो व त्याला बसण्यासाठी आसन देतो. त्यानंतर संजय त्याच्या येण्याचे कारण सांगतो. तो विदूराकडे पहात म्हणतो, "राजा धृतराष्ट्र, अंबिकापुत्र, आपल्याला स्मरत आहेत. कृपया आपण परत निघावे, नाहीतर राजा धृतराष्ट्र त्यांचा जीव देतील असें त्यांनी मला आपल्याला सांगावयास धाडले आहे". पुढे तो सेवक बोलतो, "अहो कुरुवंशाचे दिपक, ह्या पांडवांच्या परवानगीने आपण त्वरित हस्तिनापुरी परत निघावे".

वैशंपायन पुढे सांगत रहातात, तो बुद्धीमान विदूर त्याच्या आप्तांच्या प्रेमांने आतूर असलेला, युधिष्ठीराची परवानगी घेतो व संजया बरोबर हस्तिनापुरी परत निघतो. हस्तिनापुरी आल्यावर तो धृतराष्ट्राला भेटतो. त्याला आलेला पाहून तो अंध राजा त्याला बोलतो, "माझे महद्भाग्य किं, तू माझ्याकडे परत आलाल. माझे बोलणे मनावर न घेता तू आलास त्याबद्दल तुला मी धन्यवाद देतो. तू गेल्यानंतर मी माझ्या कडे पहात होतो, माझी झोप उडून गेली होती. जसे माझे सर्वस्व हरवले आहे. असें बोलून तो अंध राजा त्याच्या भावाच्या माथ्याचे चुंबन घेतो. बोलतो, "माझ्या भावा, मला माफ कर. मी भावनेच्या भरात बोलत होतो. तुला माहित आहे, माणूस चुका भावनेच्या भरातच करतो. शुद्ध बुद्धीने काम करणारा, कधीच अशा चुका करत नाही". ते ऐकल्यावर त्याचा धाकटा भाऊ विदूर म्हणतो, "मी तुला माफ करतो, कारण मी माझ्या मोठ्या भावावर दोषारोप करणारा नाही. माझ्या मनात तुझ्या बद्दल फार आदर आहे. तुझ्या आज्ञेने मी पुन्हा तुझ्याकडे आलो आहे. सर्वच दूरदृष्टी असलेले लोक साघारणपणे अनवधानाने अडचणीत पडलेल्यांबद्दल सहानुभूती दाखवतात त्या प्रकारची सहानुभूती माझ्या मनात पांडवाबद्दल आहे. अरे भरत कुळी, तुझी मुलं मला पांडवां इतकीच प्रिय आहेत. परंतु, आज ते अडचणीत आहेत म्हणून मी त्यांना भेटावयाला गेलो होतो एवढेच". वैशंपायन पुढे सांगतात, ते दोघे एकमेकांची माफी मागत एकमेकांच्या सहवासात खूष होतात.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा सहावा भाग संपला.

## वनपर्व भाग सातवा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधनाला समजते कीं, निघून गेलेला त्याचा काका विदूर, पुन्हा परत आला आहे व विदूराचे व त्याच्या बापाचे पुन्हा एकदा सख्य झाले आहे तेव्हां त्याला फार दुःख होते. तो त्याच्या दोस्तांना बोलावणे धाडतो व सांगतो त्याचा काका परत आला आहे. जो पांडवांचा मित्र आहे. पांडवांचा मित्र येथे दरबारात असणे आपल्याला हितकारक नाही असें त्याचे कारस्थानी मन सांगत असते. दुर्योधन त्यांना बोलतो कीं, विदूर कधीच आपले हित पहाणार नाही. तो आपल्याला पांडवांचे अंकीत ठेवण्याच्या योजना आखत राहिल पण त्याच्या बापाला तो त्याचा भाऊ प्रिय आहे त्याला काय करावे असे ते विचार करत असतात. पुढे तो त्याचे दोस्त कर्ण, शकुनी आणि बंधू दुःशासन ह्यांना सांगतो, "हा विदूर माझ्या बापाच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन त्याला पुनः पांडवांना परत बोलावून व त्याची संपत्ती त्यांना परत करण्यात यशस्वी होत नाही तोवर आपण कांहीं करून त्या हतबल पांडवांचा काटा जंगलातच काढून टाकणेंच श्रेयस्कर ठरेल". पुढे तो बोलतो, "आपल्याला त्यासाठी कांहीं योजना आत्तापासूनच आखली पाहिजे कारण चौदा वर्षे थांबण्याची माझी इच्छा नाही". त्यानंतर दुर्योधन स्वगत बोलतो, जर ते पांडव पुन्हा आले तर मी संन्यास घेईन अथवा माझ्या जीवाचे कांहीं बरे वाईट करून टाकीन. कोठल्याही स्थितीत मी त्या चुलत भावांना समृद्ध झालेले पाहू शकणार नाही.

ते ऐकून शकुनी सांगतो, "अरे माझ्या प्रभो, तू विनाकारण चिंता करत आहेस. ते पांडव एक निश्चित स्वरुपाची अट मान्य करून वानवासात गेले आहेत ते कधीही आता इतक्यात परत येणे शक्य नाही. तू उगाचच घाबरत आहेस". तुला माहीत आहे कीं, हे पांडव फारच इमानदार आणि शब्दाचे पक्के आहेत, त्यांना छक्केपंजे करण्याचे समजत नाही. त्यामुळें त्यांचे परत येणे केवळ अशक्य आहे. सरळ मार्गी लोकांना भिऊ नये, फक्त आपल्या सारख्या लुच्चेगिरी करणार्यांपासून धोका संभवतो. त्या दृष्टीने तू फारच नशिबवान आहेस. आणि समज, तुझी भिती खरी ठरली तर ते येतील, असे झाले तर आपण त्यांच्यावर नजर ठेवून जेव्हां त्यांचा काटा काढणे शक्य होईल तेव्हां काढून टाकू शकू, वनात ते तेवढे

सोपे नाही. येथे आपले हस्तक सगळीकडे आहेत त्यामुळें त्यांचा नाश करणे हस्तिनापुरात जास्त सोपे होईल".

दुःशासन बोलतो, "आपले काका प्रचंड हुशार आहेत, ते आपल्या बापाला पटवून तू जी भिती सांगत आहेस ते होणे शक्य आहे. कारण मी बघितले आहे कीं, आपले बाबा त्याच्या सल्ल्यानेच राज्यकारभार चालवत असतात.

त्यानंतर कर्ण बोलतो, "अहो राजन, दुर्योधन, आम्ही सगळे तुझ्या इच्छेची पूर्तता करण्यासाठी वचन बद्ध आहोत. आज आपल्यात एकवाक्यता आहे. माझ्या अंदाजाप्रमाणे पाहिले तर ते शब्दाचे पक्के पांच जण व त्याची पत्नी परत येण्याची शक्यता अजिबात नाही. पण जर ते समजा विदूराच्या शिष्टाईने परत आलेच तर त्यांना पुनः द्युतात अडकवून त्या खेळाची पुनरावृत्ती करता येईल"!

वैशंपायान पुढे सांगतात, अशारितीने त्या चांडाळ चौकडींत चर्चा होत असते. कर्णाची गोष्ट ऐकल्यावर दुर्योधनाचा चेहरा चिडलेला दिसतो. तो कर्णाकडे पहाण्याचे टाळत आपली नाराजी व्यक्त करतो. ते पाहून कर्णाचे सुंदर नेत्र विस्फारतात, त्याला समजत नाही हे काय झाले. तो तक्रारीच्या सुरात बोलतो, "ऐका तुम्ही राजपुत्रांनो, आपण सगळे येथे जमलो आहोत कारण आपण दुर्योधनाला आपला राजा मानतो व त्याच्या आज्ञांचे पालन करण्यास बद्ध आहोत. परंतु, आपण नेहमीच त्याच्या भल्याचे चटकन करू शकूं असे समजणे व्यावहारिक कारणांसाठी शक्य नसेल. कारण आपण एक गोष्ट चांगलीच लक्षात घेतली पाहिजे कीं, आपले हात धृतराष्ट्राच्या निर्णयांने बांधलेले आहेत. अजून आपला दुर्योधन सम्राट समजला जात नाही, आणि विदूर ह्या राज्याचा प्रधान आहे. म्हणून मला वाटते आपण आपल्या शस्त्रांनी सज्ज असें आताच पाडवांवर चाल करून गेलो तर ते जास्त सोपे होईल. पांडव आज लढण्याच्या मनस्थितीत नसणार, ते अजून वनवासात जाण्याच्या धक्क्यातून पुरते बाहेर आलेले नाहीत, हांच मौका आहे. त्यांच्या ह्या अडचणीचा आपण फायदा करून घेतला पाहिजे. त्यांना आपण भारी जाऊ व मारून टाकू हेंच मला योग्य वाटते". कर्णाचा तो प्रस्ताव ऐकून सगळे एकदम खूष झाल्यासारखे टाळ्या वाजवून त्याच्या सुझावाचे स्वागत करतात. तो प्रस्ताव त्यांना इतका आवडला किं पुढचा मागचा कसलाही विचार न करता ते आपापल्या रथात चढले व पांडवांचा नाश

करण्यासाठी निघाले. तेथे त्याच्या दिव्य दृष्टीने ते कृष्ण द्वैपायन ते पहात होते. ते वेळ न दवडता धृतराष्ट्राच्या ठिकाणी उपस्थित झाले. त्या राजाला डोळे नसले तरी तो त्याच्या बुद्धीच्या दृष्टीने सगळे पहात असतो. त्याच्यापुढे व्यासमुनी अवतरले व त्याला असें बोलले,

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा सातवा भाग संपला.

# वनपर्व भाग आठवा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

व्यासमुनी त्याला धृतराष्ट्राला सांगतात, "अरे धृतराष्ट्रा, मी तुझ्याशी बोलत आहे, कृष्ण द्वैपायन आलो आहे. आता मी जे सांगणार आहे ते तुम्हा सगळ्या कौरवांच्या हिताचे आहे. एक लक्षात घे कीं ज्या पद्धतीने तू तुझ्या मुलांच्या खुषी साठी पंडुच्या मुलांना विश्वासघात करून व खोटा द्युत खेळावयाला लावून देशोधडीला लावले आहेस ते मला अजिबात रुचलेले नाही. युधिष्ठीर जरी क्षमाशिल असला तरी त्याच्याने कांहीं गोष्टी सावरता येणार नाहीत कारण आधीच भिम आणि अर्जुन एकंदर परिस्थितीवर नाराज आहेत. त्यामुळें तेरा वर्षे झाल्यावर तुझी मुलं त्यांना त्यांचे हक्काचे देणार नाहीत व परिणाम स्वरुप त्यांच्या महाघातक शस्त्रांनी ते कौरवांवर हल्ला करून त्यांना ठार मारणार आहेत हे प्रथम लक्षात घे. मला सांग, तुझा पापपूर्ण असा मोठा मुलगा त्या पंडुच्या निष्पाप मुलांना मारण्याचे सतत प्रयत्न कां करत आहे? त्या मूर्खाला तू सदैव पाठीशी घालत आला आहेस म्हणून परिस्थिती बिघडलेली आहे. आणि दिवसेंदिवस अधिकाधिक बिघडत आहे. ते तुला समजत नाहीं कां"? मला वाटते कीं, तू माझ्या प्रमाणे, भिष्म, द्रोण, कृप, गौतम अशा सगळ्यां इतकाच समजूतदार आहेस तरी केवळ पुत्र प्रेमामुळें त्या मूर्ख दुर्योधनाचे सगळे लाड पुरवत आहेस. आणखीन बिघाड होऊन तुझ्या जीवंतपणी तुला तुझी सगळी मुलं मारलेली जाऊ नये असे वाटत असेल तर वेळीच त्या दुर्योधनाला व त्याच्या दोस्तांना आवर घाल. कोठल्याही परिस्थितीत पांडवांचा नाश तुझे कौरव करू शकणार नाहीत कारण, ते दिव्य लोक आहेत, साधारण माणसे नाहीत. त्यासाठी त्या मूर्ख मुलाला सुधारण्यासाठी माझ्यामते पांडवांच्या बरोबर रहावयाला जाण्याचे ठरव, कदाचित त्यांच्या सानिध्यात राहिल्याने तो त्याचा व्रात्यपणा सोडून देईल. असें झाले तर त्यात सर्वांचे भले होईल. परंतु तसे होण्याची शक्यता कमीच आहे कारण प्राणी त्याचा अंगीभूत स्वभाव मरे पर्यंत सोडत नाही. तुझे इतर वडीलधारे काय विचार करत आहेत ह्या बद्दल"? वेळीच उपाय करा नाहीतर तुला पश्चात्ताप करावयाला सुद्धा वेळ मिळाणार नाही. सर्वच तू घालवून बसशील.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा आठवा भाग संपला.

# वनपर्व भाग नववा

(पहिले अरण्यक पर्व पुढे चालू)

ते ऐकून राजा धृतराष्ट्र व्यास मुनींना बोलतात, अहो पुज्य गुरूवर, मी खरोखरच सांगतो, मला स्वताला तो द्युताचा खेळ पसंत नव्हता. मला समजून घ्या ऋषीवर्य, तो निर्णय माझ्यावर लादला गेला होता माझ्या दैवाने. कोणीही येथे असलेल्या वडीलधार्यांनी, भिष्म, विदूर किंवा द्रोण अशा कोणीही माझ्यावर त्यासाठी दबाव आणला नव्हता. मी मान्य करतो किं, तो माझा केवळ मूर्खपणाच होता. आपण व्रतस्थ जीवनाचे आदर करणारे अहात, आपण जाणू शकता मी माझ्या पित्रीक भावनाने प्रेरीत होऊन तो चुकीचा निर्णय घेतला होता. मी माझ्या मूर्ख मुलाचा, दुर्योधनाचा त्याग करू शकत नाही हांच माझा गुन्हा आहे. ते ऐकल्यावर कृष्ण द्वैपायन त्याला बोलतात, "अरे राजा, विचित्रवीर्याच्या सुपुत्रा, तू जे सांगितले आहेस मला, ते सगळे खरे आहे. मी जाणतो कीं, एकाद्या माणसाला त्याचा पुत्र हे सर्वस्व असते. त्यासाठी कोठल्याही थराला तो जाऊ शकतो. प्राचीन काळातील एक उदाहरण मला आठवले, इंद्र सुरवीच्या अश्रूने प्रभावीत झाला होता, ती कथा तुला सांगतो. सुरवी नांवाची एक दैवी गाय एकदा रडत असलेली इंद्र पहातो. इंद्राला त्या रडणार्या गाईची दया येते व तो तिला विचारतो, "अहो पवित्र सुरवी, तू कां रडत आहेस? सगळे कुशल मंगल आहे नां स्वर्गात? थोडेसे जरी कांहीं चुकीचे होत असेल तर त्याची माहिती तू मला दे. कोण चुक करत आहे? माणूस कां कोणी सर्प करत आहे ते मला सांग. सुरवी त्याला सांगते, कीं, कांहींही गैर झालेले नाही परंतु माझ्या मुलासाठी मी कष्टी झाली आहे आणि म्हणून मी रडत आहे. नंतर ती धेनु इंद्राला सांगते, "ते शेतकरी माझ्या मुलाकडून जास्त काम करून घेत आहेत त्यामुळें त्याला फार त्रास होत आहे. अतिकष्टामुळे तो शेवटी बेशुद्ध झाला व खाली पडला. म्हणून मी दुःखी झाले आहे. जो वृषभ जास्त मजबूत आहे तो जास्त भार घेतो व जो कमजोर आहे तो तसे घेऊ शकत नाही. त्याला ते काम करता येत नाही. ते मला पहावत नाही म्हणून माझ्या डोळ्यात अश्रू आले आहेत". ते ऐकून शक्र तिला बोलतो, "अग धेनु तुझी असंख्य मुलं शेतकर्यां कडून अशाप्रकारे वापरली जातात. परंतु तू मात्र ह्या एका मुलासाठीच दुःखी होत आहेस असें कां"? त्यावर सुरवी बोलली, "माझी असंख्य अपत्ये आहेत व माझी माया त्या

सगळ्यासाठी सारखीच असते परंतु, त्यातील जे कमजोर आणि निष्पाप आहेत त्यांच्या बद्दल मला जास्त काळजी वाटते". ते ऐकून इंद्र त्याच्या ढगांना पाऊस पाडण्याची आज्ञा करतो व खूप पाऊस पडतो. त्यामुळें तिच्या कमजोर मुलांस कमी त्रास होतो.

व्यास सांगत असतात, "ते सुरवीचे सागणे ऐकून इंद्राला अचंबा वाटला. एवढे सांगून पुढे व्यास धृतराष्ट्राला बोलतात, जसें त्या गाईचे प्रेम सगळ्या तिच्या वासरांसाठी सारखे होते तरी त्यातल्या कमजोरांबद्दल जरा जास्त माया होती. त्याप्रमाणे तू सुद्धा म्हणतोस कीं पंडुची मुलं व तुझी मुलं तुला सारखीच प्रिय आहेत तरी त्यातल्या कमी नशीब असणार्यांसाठी तुझ्या मनात जास्त माया असावयाला पाहिजे. विदूराचे पाडवांकडे जाण्या मागील कारण सुद्धा तेंच आहे". पुढे व्यास त्याला सांगतात, "तू व पंडु माझी मुलं अहात, दोघेही मला सारखेच प्रिय असला तरी पंडुची मला जास्त काळजी वाटते कारण तो कसा मेला ते तुला माहित आहे, आणि आता त्याच्या मुलांची काय अवस्था तुझ्या मुलांने केली आहे ते पहाता सहाजिकच माझ्या मनात पांडवाबद्दल जास्त माया उत्पन्न झाली आहे. त्यांच्या भवितव्याची त्यांच्या सुरक्षिततेची मला सतत चिंता खात आहे. म्हणून सांगतो जर तुला सगळे कुरु सुखाने रहावे असे वाटत असेल तर तू तुझ्या मुलाला, दुर्योधनाला पांडवांशी सलोखा करण्यास सांग व जे वितुष्ट तो त्यांच्या बाबत मनात राखून आहे त्यात कांहीं तथ्य नाही हे त्याला समजावून सांग. तसे तू नाही केलेस तर मी तुझ्या मुलांना शिक्षा करीन ज्यामुळें ते त्यांचे राज्य घालवून बसतील.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा नववा भाग संपला.

# वनपर्व भाग दहावा

(पहिले अरण्यक पर्व संपले)

ते व्यासमुनींचे सांगणे ऐकल्यावर धृतराष्ट्र त्याला सांगतात, "अहो मुनीवर, तुमच्या म्हणण्या प्रमाणें सगळे राजे त्यांच्या प्रजेतील कमजोरांसाठी जास्त दक्ष असतात. तुम्ही जे सांगता ते सगळ्या कुरु घरासाठी हितकारक आहे. त्याबद्दल शंका नाही. त्याच प्रमाणे भिष्म, विदूर, द्रोण आणि कृप सुद्धा तसेंच सांगतात पण मी माझ्या मुलाला सुधारू शकत नाही व मी त्याला दुःखीसुद्धा पाहू शकत नाही त्यासाठी तुम्ही एवढे करा कीं माझा मुलगा, दुर्योधन तुमच्या कृपेने सुधारेल व पांडवांचा द्वेष करणे बंद करेल". ते ऐकल्यावर कृष्ण द्वैपायन सांगतात, "तुझ्या पुतण्यांना भेटल्यावर ते महान ऋषी मैत्रेय तुझ्या भेटीस आले आहेत. ते तुझ्या मुलाला दम भरतील व सुधारण्यासाठी ताकीद देतील ज्यामुळे तुमच्या कुटूंबाचे भले होईल. ते जे सांगतात तसे तुझे कौरव करतील तर ठीक नाहीतर तो ऋषी तुझ्या मुलांना शाप देऊन बरबाद करील".

वैशंपायन सांगतात, असे सांगून व्यासमुनी निघून जातात. त्यांच्या जाण्यानंतर मैत्रेय ऋषी तेथे अवतरतात. त्या भटकणार्या ऋषीचे स्वागत अर्घ्य अर्पून धृतराष्ट्र आणि त्याची मुलं सन्मानपूर्वक करतात. त्यानंतर तो राजा ऋषींना आदरपूर्वक सांगतो, "अहो पुण्यवंत आपला कुरुजंगला कडील प्रवास सुखरुप झाला कां? माझे पुतणे पांडव कसे आहेत? ते तेथे वनवासात रहाणे पसंत करतात कां? आपल्याला काय वाटते ह्या चुलत भावांत मेळ भविष्यात होईल कां"? ते प्रश्न ऐकल्यावर ऋषी मैत्रेय म्हणतात, "तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशाने निघालो आहे व त्यात कुरुजंगलाला भेटत आहे. मी अनपेक्षितपणे तेथे पांडवांना पाहिले कम्यक वनात. तेथे मी पाहिले कीं, अनेक मोठे ऋषी त्यांच्या बरोबर निवासाला आहेत. ते सगळे संन्ययाशाच्या रुपात तेथे वस्ती करून आहेत. त्यांचे केस वाढलेले आहेत व त्यांच्या अंगावर हरणाच्या कातड्याचे अंगरखे आहेत. तेथे मला समजले कीं, तुझ्या लाडक्या दुर्योधनाने एक घोड चूक केली आहे. त्या द्युताच्या खेळामुळें तुझ्या घराण्याचा नाश संभवत आहे. म्हणून मी तुमच्या घराण्याला वाचवण्यासाठी येथे तुझ्याकडे येण्याचे ठरवले. जेणे करून त्या शंतनुच्या वंशाचा र्हास होणार नाही. आमचे लक्ष असते तुमच्या कारभारावर, जरी आम्ही तुम्हाला दिसत नसलो तरी, हे लक्षात ठेव.

तुझी मुलं विनाकारण त्यांच्याशी वैर करत आहेत ज्याला कांहीं आधार नाही आणि हे सगळे तुम्ही वडील माणसें घरात असतांना होत आहे ह्याचे नवल वाटते. ज्या हितसंबंधाशी तुम्ही सगळे जोडलेले अहात त्यात वाद करावयाला जागा नसतांना हे होत आहे. त्याचा परिणाम तुम्हा सगळ्यांना फार भारी किंमत मोजून करावा लागणार आहे. तुमच्या ह्या कृत्यामुळें तुम्ही एकाद्या गुन्हेगारापेक्षा जास्त खराब ठरला अहात व सर्व संन्याशी, बैरागी आणि तुमची प्रजा तुम्हाला नापसंत करत आहेत, एकाही ज्ञानी ब्राह्मणाची तुमच्यावर कृपा राहिलेली नाही.

वैशंपायन नंतर सांगतात, तेवढे बोलल्यावर ऋषी मैत्रेय रागावलेल्या दृष्टीने दुर्योधनाकडे पहात बोलतात, आता मी जे सांगतो आहे ते नीट ध्यान देऊन ऐक. ते तुझ्या व इतरांच्या भल्यासाठी आवश्यक होत आहे. त्या पांडवांशी तू विनाकारण भांडण उरकून काढू नकोस. कारण त्यातच तुझे हित आहे. तुला वाटते कीं, तू कांही करून त्यांचा नाश करू शकशील तर तो तुझी गैरसमज आहे. ते सगळे तुझ्यापेक्षा कितीतरी जास्त शक्तिमान आहेत, त्यांच्यातील शक्तिशी तू आणि तुझे दोस्त लढू शकणार नाहीत. त्यांनी देवांना भारी गेलेले राक्षस मारले आहेत. तू तुझ्या छोट्या कुवतीचा अंदाज घेऊन त्यांच्या पासून दूर अथवा त्यांच्याशी सलोखा करून रहणेंच तुमच्या हिताचे आहे. जो आपल्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेच्या शत्रूशी मुकाबला करतो तो हमखास हरतो, नव्हे तो मारला जातो. तुझे सुद्धा तेंच होणार आहे. एकदा युद्ध सुरु झाले कीं मग तुमचे भवितव्य कोणीही बदलू शकणार नाही. म्हणून जोवर शक्य आहे तोवर तू शहाणपणे तुझे सगळे हे मूर्खपणाचे उद्योग आवर. त्यात तुझे व तुझ्या आप्तांचे भले आहे. मायावी शक्ति असलेले हिडींब, बकासूर आणि आता किरमीरा सारखे राक्षस भिमांने हातोहात ठार मारले आहेत. त्याच्या पुढे तू काय करणार? किरमीराला आत्ताच भिमांने कसे मारले ते तुला समजले तर मी काय म्हणत आहे त्याची तुला कल्पना येईल. तुला माहीत आहे तुझ्या त्या भावाला युद्ध फार प्रिय आहे व शत्रूला ठार मारण्याने त्याला अत्यानंद होतो. जरासंधाचा वध कसा झाला तू जाणतोस. ज्यांच्या कडे द्रुपदाचा मुलगा आहे ज्याला कधीही कोणीही हरवू शकणार नाही असे लोक आहेत त्यांच्याशी मुकाबला करण्याची नुसती कल्पना सुद्धा करणे किती मोठा मूर्खपणा आहे ते लक्षात घे. हे सर्व लक्षात घेऊन शहाण्या माणसा सारखा तू त्यांच्याशी

सलोखा करशील तर त्यात तुझे व तुझ्या सगळ्या आप्तांचे हित आहे. त्या महाबली पांडवांना असंख्य ऋषी, मुनी व ब्राह्मणांचे आशिर्वाद आहेत त्यांना इंद्रसुद्धा हात लावण्याचा विचार करत नाही तेथे तू त्यांचा नाश करण्याची स्वप्नें पहात आहेस म्हणजे तुझा विवेक संपला आहे. त्या तुलनेने तुझ्याकडे एकातरी ऋषी, मुनी आणि ब्राह्मणाचे आशिर्वाद आहेत कां"?

ते मैत्रेयांचे बोलणे ऐकल्यानंतर तो नीच प्रवृत्तीचा खलपुरुष दुर्योधन आपल्या प्रशस्थ मांडीवर जोरा जोरानें हात मारून त्याचा क्रोध व्यक्त करतो. त्याच्या चेहर्यावर भयंकर हास्य उमटते, तो फक्त गप्प रहातो. तो माती पायाने उकरण्याचा प्रयत्न करतो हे सगळे त्याच्या क्रोधाची अभिव्यक्ती होती. ते त्याचे वागणे मैत्रेय ऋषीला पसंत पडत नाही व ते रागावतात. दैवात जसे लिहीले होते त्या प्रमाणे तो महान ऋषी दुर्योधनाला शाप देतो. आपल्या कमंडलूतील पवित्र जल हातात घेऊन तो ऋषी रागांने लालेलाल झालेल्या डोळ्याने त्याच्या कडे पहात म्हणतो, "ज्या अर्थी तू माझे ऐकणार नाहीस त्या अर्थी लवकरच तुझ्या ह्या उर्मटपणाची मोठी किंमत तू देशिल. ते युद्ध जे तुझ्या चुकीमुळें व तुझ्या पित्याच्या तुझ्यावरील प्रेमातून उत्पन्न होणार आहे त्यात भिम त्याच्या गदेने तुझी माडी जिच्यावर तू आता थाप मारलीस ती फोडून टाकील".

धृतराष्ट्र ती शाप वाणी ऐकतो. तो ऋषीला शांत करण्याचा प्रयत्न करतो. त्याला त्याचा शाप मागे घेण्याची विनंति करतो. ऋषी राजाला सांगतो. जर तुझ्या मुलांने पांडवांची क्षमा मागून सलोखा केला तर माझा शाप खरा होणार नाही पण जर ते झाले नाही, तर माझा शाप सिद्ध होईल.

भिमाच्या ताकदीचा अंदाज यावा म्हणून धृतराष्ट्र त्यांना विचारतो, "किरमीराचा वध भिमाने कसा केला"? मैत्रेय क्रुद्ध होते. ते राजाला सांगतात, "मी ते तुला सांगणार नाही". तुला ते विदूर सांगेल कारण, त्या वेळी विदूर तेथे उपस्थित होता. असें बोलून तो ऋषी निघून गेला. दुर्योधन सुद्धा किरमीराच्या वधाची वार्ता ऐकून बराच घाबरून गेला होता. तो सुद्धा तेथून निघून जातो.

अशारितीने वनपर्वातील पहिल्या अरण्यक पर्वाचा दहावा भाग संपला.

# वनपर्व भाग अकरावा

(किरमीरा वध पर्व सुरु)

धृतराष्ट्र विदूराला बोलावतो व त्याला विचारतो किं, "किरमीरा राक्षसाचे काय झाले? तो राक्षस व भिम कोठे व कसे भेटले?

विदूर सांगतो, भिमसेनाची ती करामत आपणा सगळ्यांना अभिमानाची आहे कारण तो आपला मुलगा आहे. मी ती कथा सविस्तरपणे सांगतो, जेव्हां मी तेथे वनात भेटलो तेव्हां मला तेथे पांडवांनी ती माहिती सांगितली. युधिष्ठीर द्युतात हरल्यानंतर ते ठरल्या प्रमाणे वनात गेले. ते तीन दिवस आणि रात्र प्रवास करत होते. अखेरीस ते कम्यक वनात पोहोचतात. अरे राजा, मध्य रात्रीनंतरच्या सुमारास जेव्हां नरभक्षक राक्षस आपले सावज पकडण्यासाठी फिरत असतात तेव्हां, सन्यासी आणि गुराखी रानात जाण्याचे टाळतात. पांडव मात्र नेमके त्याच वेळी त्या निबिड वनात शिरत होते. त्यांच्या समोर एक भयंकर राक्षस ज्याचे डोळे लाल होते, त्यांच्या समोर उभा राहीला. त्याच्या हातात पेटलेली मशाल होती. तो राक्षस त्यांच्या वाटेतच उभा राहिला. त्या राक्षसांने त्याचे लांबलचक हात पसरून वनातील चिंचोळी वाट अडवून टाकली होती ज्या वाटेने पांडव त्यांच्या परिवारासह प्रवास करत होते. त्याचा भयंकर चेहरा कोणालाही घाबरवून टाकणारा असा होता. त्याचे आठ दांत तोंडाबाहेर आलेले होते, त्याचे केस रक्त वर्णी होते. काट्या सारखे ताठ उभे दिसणारे ते केस पाहून भिती वाटेल असे ते होते. तो स्वतः पावसाच्या ढगासारखा सावळ्या वर्णाचा आणि बेढब शरीरयष्टी असलेला असा दिसत होता. तो राक्षस ज्याला लोक किरमीरा ह्या नांवानो ओळखत तो पांडवांच्या टोळीवर चाल करून आला. त्याचे ओरडणे ढगांच्या गडगडाटा सारखे होते. पांडवांना पाहिल्यावर तो त्याच्या मायावी सिद्धीने पांडवांच्या भोवती भ्रम दृष्ये उत्पन्न करून त्यांना आणखीन घाबरवण्याचा प्रयत्न करू लागला. त्याच्या त्या कारवाईमुळें तेथे झाडांवर झोपलेली पक्षी व इतर प्राणी पटापटा खाली पडू लागले. त्यांने अशी दृष्यं उत्पन्न केली किं, असें वाटावे कीं, पांडवांच्या चौफेर वनातील हिंस्त्र प्राणी सैरावैरा धावत आहेत. असे वाटावे कीं, ते सगळे वन जागे झाले आहे. त्या राक्षसाच्या आज्ञेने वारा जोराने वाहू लागला. मोठ मोठ्या वेली लांब पसरून दूरच्या वृक्षांना विळखा घालत आहेत असें वाटावे असें भ्रम दृष्ये त्यांने निर्णाण केली.

जोरांने वाहणार्या वार्यामुळें माती उंच उडून हवेत गरगरा फिरू लागली. जसें वावटळ आली आहे. पांडव त्यांच्या दुःखमय अवस्थेत तेथे पोहोचले होते व आता त्यांना ह्या अनोळखी दुष्मनाशी मुकाबला करावा लागणार होता. राक्षस किरमीरा एकाद्या मैनक पहाडा सारखा त्यांच्या पुढे उभा होता. त्याला पाहिल्यावर आधीच अस्वस्थ मनस्थितीत असलेल्या कृष्णेचे दुःशासनाने पकडल्यामुळें सुटलेले केस पांडवांच्या मध्ये वार्यामुळें फडफडत होते. जसें कांहीं नदी पाहत आहे. तिला घाबरलेली पाहून ते पांच पांडव तिला आधार देतात. धौम्य त्यांच्या मंत्र सिद्धाने त्या राक्षसाने उत्पन्न केलेली मायावी भ्रमदृष्ये नष्ट करतात. ते पाहिल्यावर तो राक्षस समजतो कीं त्याची मायावी शक्ती ह्यांच्यावर काम करणार नाही. ते समजल्यावर तो वेगवेगळी सोंग घेऊन त्यांना घाबरवण्याचा प्रयत्न करू लागतो. त्याचे ते भयावह रुप पाहिल्यावर युधिष्ठीर त्याला विचारतो. "तू कोण आहेस"? तो राक्षस बोलतो, "मी वक (बकासुर) राक्षसाचा भाऊ आहे. मला किरमीरा असें म्हणतात. मी कम्यक वनातील अशा निर्जन प्रदेशात रहातो". वनातून प्रवास करणार्या माणसांना पकडून त्यांना खातो. आपण कोण अहात माझे खाद्य बनण्यासाठी तयार व्हा. तुम्हाला मारून मी तुमच्या मांसावर कांहीं दिवस आरामात रहाणार आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, राक्षस किरमीराचे ते ऐकल्यावर युधिष्ठीर स्वतःची माहीती त्याला सांगतो. मी पंडु राजाचा ज्येष्ठ मुलगा व हे माझे भाऊ भिम, अर्जुन, नकुल आणि सहदेव असें आम्ही आमच्या पत्नीसह वनात भटकण्यासाठी निघालो आहोत. माझ्या दैवामुळें माझे राज्य मी घालवले आहे. प्रवासात आम्ही तुझ्या भागातून जात आहोत. आमचा वनवासाचा काळ आम्ही येथे घालवण्याचे ठरवले आहे. आमच्या सह आमचे पुरोहित धौम्य व इतर ब्राह्मण आहेत.

विदूर पुढे सांगतो, किरमीरा युधिष्ठीराचे ऐकून बोलतो, "खरोखर आता माझे नशिब बलवत्तर झाले आहे. मी ह्या भिमाला शोधत आहे सगळी पृथ्वी मी पालथी घातली पण हा कांहीं मला मिळत नव्हता. माझे सुदैव आहे कीं अखेरीस हा भिम स्वताहून माझ्या जागेत आला आहे. ह्यांने माझे कांहीं भाऊ विनाकारण मारले आहेत, त्याची किंमत आता हा चुकवणार आहे. ह्यानेच माझ्या भावाला बकासुराला ब्राह्मणाचे सोंग घेऊन वेत्रक्य वनात मारले त्याला आता मी मारणार. ह्यानेच माझा परम मित्र हिडींब मारला. त्याच्या

बहिणीबरोबर तो तेथे रहात होता. ह्यानेच त्याच्या बहिणीला नासवले व नंतर सोडून दिले. आता हा मूर्ख माझ्या तावडीत आला आहे, हे जंगल माझे आहे, येथे फक्त माझी सत्ता चालते. मध्यरात्री नंतर आम्ही राक्षस भक्ष्य शोधत फिरत असतो. मी तुझ्या भावाला मारून माझ्या भावाच्या व मित्राच्या मृत्यूचा वचपा काढणार आहे. असें करून मी आमच्या पितरांचे ऋण फेडणार आहे. त्याला मारून मला किती हर्ष होणार आहे ते सांगू शकणार नाही. बकासुराच्या हातून तुझा भाऊ सुटला पण माझ्या हातून सुटणार नाही. त्याला मी तुझ्या समक्ष कच्चा खाणार आहे. अरे युधिष्ठीरा, तुला माहीत असेल प्राचीन काळी अगस्त्य ऋषीनी असुर वाटपीला खाल्ले तसे मी तुझ्या भावाला खाणार आणि मग सावकाशपणे एक एक करून तुम्हा सगळ्यांना खाऊन टाकणार आहे. असे बोलून तो भयंकर राक्षस अक्राळ विक्राळ हंसू लागला.
विदूर पुढे सांगतो, त्या राक्षसाचे ते ऐकून युधिष्ठीर त्याला शांतपणे सांगतो, असें तू करू शकणार नाहीस आणि युधिष्ठीर त्याच्यावर रागावतो. त्यांचे संभाषण चालू असतांना भिम एक मोठे झाड मुळा सकट उपटतो व त्याच्या फांद्या तोडून त्या झाडाची गदा बनवतो. नंतर ती गदा घेऊन तो किरमीरावर चालून जातो. त्याच वेळी अर्जुन आपले गांडीव सज्ज करतो आणि त्या राक्षसावर बाणांचा मारा करणार इतक्यात भिम त्याला सांगतो, "अरे अर्जुना थांब, थांब तो माझा आहे". असे बोलून भिम त्याच्यावर त्या झाडाच्या गदेने हल्ला करतो. भिम दात ओठ चावत चिडलेला त्या राक्षसावर चालून जातो. तो राक्षस ढगं गडगडतात तसा ओरडत भिमावर चालून जातो. राक्षस वीजेच्या कडकडाटा सारखे वज्र घेऊन भिमावर धावून जातो. भिमाच्या जोरदार फटक्याचा त्याच्यावर कांहींच परिणाम झालेला दिसत नाही. त्याच्या विरोधात तो राक्षस त्याचे वज्र भिमावर फेकतो. तो नेम चुकवत त्या वज्राला अशा फटका मारतो किं, ते वज्र उलट फिरून त्या राक्षसावरच जाते. भिम पुन्हा त्या झाडाने जोरात मारतो पण त्याचा त्या राक्षसावर कांहीं परिणाम झालेला दिसत नाही. त्यानंतर तो भयंकर चिडलेला किरमीरा जवळचे झाड उपटून त्यांने भिमावर हल्ला करतो. आता ते दोघे त्यांच्या हातातील झाडांच्या गदांनी द्वंद्व करू लागतात. जसें पुरातन काळी वलि आणि सुग्रीव एकाच बाईसाठी लढले होते. जेव्हां त्या झाडांच्या फांद्या त्यांच्या डोक्यावर आपटत तेव्हां त्यांचे तुकडे होत परंतु त्या दोघांना कांही होत नव्हते.

अशा लढाईत तेथील बरीच झाडे नष्ट झाली. कांहीं काळ ती झाडाच्या गदेची मारामारी चालली. त्यानंतर त्या दोघांनी ती झाडं फेकून दिली व हातांने मारामारी ते करू लागले. आता ते आजू बाजूचे मोठे खडक उचलून फेकू लागले. परंतु त्याने सुद्धा फारसा फरक होत नव्हता. राक्षसाने अखेरीस आपले दोनही हात लांब वाढवून भिमाला मिठी मारली अशी कीं, त्याच्या मिठात तो ठार होईल. भिमावर मारलेल्या खडकांमुळें त्याच्यावर कांहींच परिणाम झालेला दिसत नव्हता. आता ते दोघे एकमेकांना घट्ट मिठीत पकडून दाबू लागले. त्या वेळी मात्र तो राक्षस थकत असल्यासारखे वाटू लागले. भिम दामोदराची आठवण करत होता. त्याला अशी भावना होत होती कीं, कृष्ण त्याच्या पाठीशी उभा आहे. त्या भावनेमुळें भिमाला प्रचंड स्फुरण आले व त्याची शक्ती कितीतरीपट जास्त झाली. जणू दोन प्रचंड हत्ती झुंजत आहेत असे ते दृष्य होते. त्या दाबादाबीत भिमाची ताकद राक्षसापेक्षा जास्त झाली असें वाटू लागले कारण ते किरमीरा थकत असल्या सारखे वाटू लागले. तो भयंकर प्रकारे ओरडू लागला. त्याच्या ओरडण्याचा आवाज बांबू उभा फाटावा असा येत होता. थोड्या वेळांनी भिमाला समजते कीं, त्याच्या मगरमिठीत तो राक्षस बेशुद्ध झाला आहे. त्याच्या शरीराचा थरथराट भिमाला जाणवत होता. भिमाला थकवा अजिबात वाटत नव्हता. जसे भिमानी त्याला आणखीन जोरानी आवळायला सुरुवात केली तो प्रचंड राक्षस भयानक असा गर्जना करू लागला. परंतु, त्याच्या विरोध करण्याची क्षमता दिसत नव्हती. तो आचके घेऊ लागला होता. भिमाला आता खात्री झाली किं, राक्षस संपला आहे. ते लक्षात आल्यावर भिमाने त्याला एकाद्या पशुला कसे मारतात तसे ठार मारले. ते द्वंद्व संपले होते. त्यानंतर तो भिम त्याला जमिनीवर फरफटत खेचत त्या मरत असलेल्या राक्षसास बोलला, "अरे राक्षसा, जसे मी तुझ्या भावाला व मित्राला मारले तसेंच तुला सुद्धा मारत आहे. आता तुम्ही तिघ यमाच्या घरी बसा. त्या द्वंद्वामुळें किरमीराच्या अगावरील दागदागिने मोडून तुटून सगळीकडे विखूरलेले दिसत होते. अशारितीने त्या भयंकर राक्षसाला मारल्यानंतर सगळे पांडव आणि त्यांच्या बरोबर असलेले इतर भिमाचा स्तुती करतात. युधिष्ठीर भिमाच्या अनेक उत्तम गुणाची तारीफ करतो. त्यानंतर ते सगळे घाबरलेली कृष्णा शांत झाल्यानंतर ते जंगल सोडून द्वैत वनाकडे निघतात. विदूर धृतराष्ट्राला सांगतो, अशारितीने भिमाने किरमीराचा वध एकट्याच्या

हातांने केला. युधिष्ठीराच्या आज्ञेने तो ते करतो. त्यानंतर ते कांहीं काळ द्रौपदीसह आनंदात रहात आहेत. सगळे सतत भिमाच्या ताकदीचे न थकता कौतुक करत आहेत. त्यानंतर मघा सांगितले त्याप्रमाणे ते सगळे एका शांत व सुरक्षित अशा वनात ज्याला द्वैत वन म्हणतात तेथे जातात. तेथेच मला ते द्वंद्वं समक्ष पाहिलेल्या ब्राह्मणांनी हे सगळे सांगितले, जसे मला सांगितले तसे मी तुम्हाला सांगितले.
वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र ते किरामीराच्या वधाचे वृत्त ऐकून अस्वस्थ असा होऊन उसासा टाकू लागतो. त्याचा श्वास थांबल्या सारखी त्याची अवस्था झालेली असते.
अशारितीने वनपर्वातील किरमीरा वध पर्वाचा अकरावा भाग संपला.

# वनपर्व भाग बारावा

(अर्जुनाभिगमन पर्व सुरु)

वैशंपायन सांगतात, द्वारकेतील भोज, वृश्नी आणि अंधक टोळ्यांच्या म्होरक्यांना समजते कीं, पांडवांचे वनवासगमन झाले आहे. त्यांच्यावर त्यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेऊन कौरवांनी त्यांना खोट्या द्युतात अडकवून त्यांचे सर्वस्व काढून घेऊन, तेवढ्याने समाधान नाही झाले म्हणून त्याना बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास अशी शिक्षाच जणू दिली आहे. ते समजल्यानंतर ते सगळे पांडवांना भेटण्यासाठी द्वैत वनाकडे निघतात. ते पांचालांचे सोमवंशी, छेड्डीचा राजा धृष्टकेतु, सामर्थ्यवान कैकेय, त्यांच्या सगळ्या गोतावळ्यासह कौरवांवरच्या संतापाने प्रेरीत असें, त्या वनाकडे जाण्यास तयार होतात, पृथाच्या मुलांना भेटण्यासाठी. धृतराष्ट्राच्या मुलांवरील रागात ते विचार करत असतात, आता काय करावयाचे! ते क्षत्रियांतील महाबली त्याचा प्रमुख असलेल्या वासुदेवासह युधिष्ठीरा जवळ बसतात. युधिष्ठीरीला वंदन करून कृष्ण त्याच्याशी बोलतो, "दुर्योधनाचे आणि कर्णाचे, दुःशासनाचे आणि शकुनीचे रक्त ह्या भूमीवर सांडेल. युद्धात त्यांचा त्यांच्या सगळ्या साथीदारासह नाश करून आपण युधिष्ठीराला पुनः राजगादीवर बसवल्याशिवाय हे संपणार नाही. अशा हलकट लोकांना मारून टाकण्यातच खरी नैतिकता आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, तो जनार्दन पृथाच्या मुलांवर झालेल्या अन्यायामुळे इतका चिडला होता किं, क्षणभर असें वाटले किं, तो सगळी पृथ्वी जाळतो कीं काय? अर्जुन त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत रहातो. त्याला शांत करण्यासाठी फाल्गुनी (अर्जुन) कृष्णाच्या आधील अवतारातील किमयांची गाथा गाऊ लागतो. त्यात तो कृष्णाची स्तुती करण्यास सुरुवात करतो,

"तू अद्वितीय आहेस, तू सर्व शक्तिमान आहेस, साक्षात प्रजापति आहेस, सर्व जगाचा स्वामी आहेस, तू विष्णू सर्व शहाणपणाचा कळस आहेस, वगैरे वगैरे. त्या स्तुतीत तो आणखीन सांगतो, प्राचीन काळी दामोदर, गंधमदन पर्वतावर दहा हजार वर्षे एका मुनीच्या रुपात तप करत होता. त्याचे वस्तीस्थान तेथे असें जेथे तो त्या रात्री असेल. म्हणजे तो सतत भटकत होता. केवळ पाण्यावर त्याचे गुजराण होत होती, त्याच प्रमाणे, आणखीन दहा हजार वर्षे तो कृष्ण, पुष्कर सरोवराच्या तटावर राहिला होता. अरे तू राक्षस मधूचा

वध करणारा, एका पायावर उभे राहून तू शंभर वर्षे तप केले आहेस वद्री पर्वताच्या जागी. त्या तपस्येच्या काळात तू केवळ हवा पिऊन रहात होतास. तेथे तू उघडा रहात असें व तुझे शरीर म्हणजे एक हाडांचा सापळा व शिरांचे गाठोडे असें भासत होते. अशा रितीने तू सरस्वती नदीच्या किनारीसुद्धा होतास, तेथे तू एक तप चालेल असा यज्ञ करत होतास. अरे कृष्णा, तुला आठवते कां, ते दिवस जेव्हां तू एका पायावर उभा राहून प्रभास पर्वतावर एक हजार वर्षे, तीसुद्धा देवलोकांची, तप करीत होतास? कृष्ण द्वैपायन सांगतात किं, तू ह्या जगातील सृष्टीचा कर्ता आहेस. अरे कृष्णा तू क्षेत्रज्ञ आहेस. तू हिमालयातील बद्रिका येथे जेथून गंगा उगम पावते तेथे असतोस. म्हणून तूंच नीलकंठ, महाभूतांचा स्वामी आहेस. तूंच जाणीव आहेस, तुझ्यातून सगळी मुलतत्त्वे उत्पन्न झाली आहेत. तुझ्यातून त्या जाणीवा उत्पन्न झाल्या ज्यांना आपण पृथ्वी, पाणी, इच्छा, अनिच्छा (तिरस्कार), आनंद, दुःख, त्यांचे मिश्रभाव, आणि चैतन्य असे समजतो. तू मनाचा (विचारांचा) कारक आहेस, तूंच सुरुवात आणि अंतसुद्धा आहेस, तूंच वैराग्यवृत्ती आहेस, तूंच सर्व यज्ञांचा कर्ता आहेस, तूंच अनंत आहेस, तूंच नरकासुराचा वध केलास, तूंच पृथ्वीवर पहिला जन्मलास, तूंच पहिला अश्वयज्ञ केलास व त्यात त्या घोड्याच्या रुपातील, असुराला, आहूती म्हणून वाहिलेस. त्या यज्ञानंतर तू अजिंक्य झालास म्हणून तेव्हां पासून अश्वयज्ञ करण्याची प्रथा तू सुरु केलीस. तूं सगळ्या दैत्य आणि दानवांचा वध केलास, तूं देवांच्या राजाचे स्थान मजबूत केलेस, तूं वेळोवेळी माणसांत जन्म घेतोस आणि माणसाला मार्गदर्शन करतोस, तूंच त्या वैश्विक पाण्यावर रहातोस म्हणून तुला हरी आणि ब्रह्म असें बोलतात. सूर्य आणि धर्म, धात्री आणि यम, अनल आणि वायू, वैश्रावण आणि रुद्र, काळ आणि आकाश, पृथ्वी आणि दहा दिशा, हे सगळे तूंच उत्पन्न केले आहेस तुझ्या विचारांतून, म्हणून तुझा विचार हेंच सर्व उत्पत्तीचे कारण आहे. चर आणि अचर तू तयार केलेस. अस्तित्वाचे कारण तू आहेस, मधू (मोह दोष) राक्षसाचा वध तू केलास, तू सर्वश्रेष्ठ देव ठरला आहेस, आज तू यादवांचा पुत्र तर आधी तू अदिती, तू आत्म्याच्या त्या आठ गुणांचा (दानं करणे, भेटवस्तु देणे, तपश्चर्या करणे, खरे बोलणे, हित करणे, क्षमा करणे, वासनांना आवर घालणे आणि वेदांचा अभ्यास, ज्ञानार्जन करणे) कर्ता आहेस, तू ह्या व्रतांच्या नियमांचा कर्ता आहेस. तू शरीराचे योगक्षेमाचा (शरीराची आठ कामं

सांगितली आहेत अशी आहेत, खाणे, पिणे, आराम करणे, उपजिवीकेसाठी उद्योग करणे, शरीर संवर्धन, प्रजोत्पादन करणे, मनोगंजन करणे, ज्ञान साधना करणे, थोडक्यात चरितार्थाची कर्तव्ये) नियोजक आहेस. अशारितीने तूं शरीर व आत्मा ह्यांची कर्तव्ये निश्चित केली आहेत. आत्म्याने शरीराच्या योगक्षेमाच्या वासनांत लक्ष घालावयाचे नसते परंतु, शरीराने मात्र आत्म्याला त्याच्या व्रतात मदत करावयाची असते असें नियम तूंच तयार केले आहेत त्याप्रमाणे सगळे जीव जगत असतात. जो हे नियम पाळत नाही तो भ्रष्टात्मा होतो व पाताळात जातो. तूं सगळ्या शरीरात आत्मा म्हणून रहात असतोस, परंतु, मायेच्या प्रभावामुळें ते तो विसरतो. तुला पुराणांत इंद्राचा धाकटा भाऊ म्हणून सांगतात, तू तुझ्या सगळ्या अवतारात अगदी लहानपणापासून पाप प्रवृत्तीचा विनाशक राहिला आहेस, तू तुझ्या तीन पावलांत सगळी सृष्टी (पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळ) पादाक्रांत केलीस. तू विविध रुपात निरनिराळ्या ठिकाणी वावरत राहून संयम, मर्यादा, विवेक ह्यांची स्थापना करत आला आहेस. तेंच तुझे अवतार कार्य ठरले आहे. तू चरा चरात असूनही त्यात नसतोस सुद्धा, असे विलक्षण अस्तित्व दाखवत असतोस, तू सर्व तारकांत असतोस, तू अनेक अवतार घेतलेस त्यात तू असंख्य पापात्मे मारून टाकले आहेस. अनेक असुरांचा (ज्यांचा अहंकार विकृत झाला आहे असा विकृत) वध केला आहेस. तू अनेक मौरव आणि पाशांचा नाश केला आहेस, तू निसुंद आणि नरक ह्यांचा नाश केला आहेस, त्यांचा नाश करून तू प्रागज्योतिष कडे जाण्याचा मार्ग मोकळा केलास, तू अहंवृतीचा वध जरुथीत केलास, क्रथ आणि शिशुपाल त्याशिवाय त्याच्या दोस्तांचा (सैव्य व शतधंवन) वध तू करून घेतलास त्यात जरासंध आहे. तू भोजाची कन्या स्वतासाठी पत्नी म्हणून मिळवलीस, जिचे नांव रुक्मीणी आहे तिच्या भावाचा पराभव करून. तू रागावून इंद्रद्युम्नचा वध केलास, आणि यवन ज्याचे नांव होते, केशरुमन त्यालासुद्धा मारलेस. सौभचा वध करून मग त्याची नगरीसुद्धा तू नष्ट केलीस, आणखीन कोणाची हत्या तू केलीस ते सांगतो, त्रवतिमध्ये भोज राजा जो कार्तवीर्यासारखा शूर होता त्याला मारलेस, गोपति व तलकेतु, तू मारलेस, तू स्वतः साठी पवित्र नगरी द्वारका जिंकलीस, जेथे नव्या युगाची सुरुवात होणार होती परंतु, तुझ्याच मर्जीने ती नगरी समुद्रात बुडाली, अरे मधुच्या वध करणार्या, तुझ्यात खोटेपणा कसा असेल"?

"तू दशर्ह कुळात जन्म घेतला आहेस ह्यावेळी, तुझ्यात ते सहा दोष (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) कसे असणार? ते तुझ्यात नाहीत म्हणूनच तू, तू आहेस! सगळे ऋषी तुझ्या पाशी येतात व तुझ्या जवळ बसतात. यज्ञात ते तुझ्याकडून संरक्षण मांगतात. ह्या युगाचा अंत होईल तेव्हां हे सगळे तुझ्यात विरून जाईल व जेव्हां नवीन युग सुरु होईल तेव्हां ते सगळे पुन्हा तुझ्यातून उत्पन्न होईल. अरे वृश्नी वंशात आज जन्म घेतलेल्या तू युग सुरु झाले तेव्हां तुझ्या नाभितून एक कमळ आले व त्यातून ब्रह्मदेव निघाले. जो सगळ्या चराचर सृष्टीचा नियंत्रक झाला. ज्याच्या नियंत्रणाने ह्या सृष्टीचा खेळ चालतो. जेव्हां त्या सृष्टीत भयंकर दानव मधू सारखे दैत्य आले ब्रह्माचा नाश करण्यासाठी, तेव्हां तुला राग आला व तुझ्या कपाळातून शंभू अवतरले त्यांच्या हातात त्रिशूळ होते. अशारितीने ह्या मूळ देवता (ब्रह्मा आणि महेश) ज्या ह्या सृष्टीचे काम पहात असतात त्या तुझ्यातून उत्पन्न झाल्या. हे सगळे मला नारदांनी सांगितले. अहो नारायणा, तू चैत्ररथ वनात एक मोठा यज्ञ आरंभलास ज्यात अनेक दानं झाली. तू तुझ्या प्रत्येक अवतारात काहीं न कांहीं पराक्रम करतोस जे आधी कोणीही केले नव्हते, त्या सगळ्यात तुला तुझ्या मोठ्या भावाची बलरामाची साथ असते. तू कैलास पर्वतावर ब्राह्मणां बरोबर रहातोस".

वैशंपायन सांगतात, अशारितीने अर्जुनाने कृष्णाची स्तुती केली व त्याला शांत केले. त्यावर उत्तर देण्यासाठी कृष्ण बोलतो, अरे श्रेष्ठ पांडवा, जेथे तू तेथे मी, जेथे मी तेथे तू असे नेहमी असते. जे तुझी भक्ती करतात त्यांना मी प्रसन्न होतो व जे माझी भक्ती करतात त्याना तू प्रसन्न होतोस. तू आणि मी एकच आहोत. तू नर आहेस व मी नारायण आहे, आपण दोघे ऋषी आहोत ज्यांची नांवे आहेत नर आणि नारायण, आपण जगाच्या कल्याणासाठी वेळोवेळी अवतार घेत असतो. ह्यावेळी मी वृश्नी कुळात जन्म घेतला आहे व तू कुरु कुळात, आपल्यातील फरक कोणालाही समजणार नाही. हे ऐकल्यावर तो श्रेष्ठ पांडव शांत होतो.

वैशंपायन पुढे सांगतात, केशव त्या जमलेल्या राजांत ते अर्जुनाबद्दल बोलतो तेव्हां तेथील राजे रागांने उत्तेजित होऊन बोलतात, जेथे द्रौपदी तिच्या सख्ख्या भाऊ दृष्टद्युम्ना बरोबर बसलेली होती, असित आणि देवलांनी ह्या सृष्टीच्या निर्मितीबद्दल असें दिलेले नाही. त्यांनी तुला फक्त प्रजापती म्हणून सांगितले आहे, आणि ऋषी जमदाग्नी सांगतात, तू फक्त

विष्णू आहेस. आणि तू मधू (मोह दोष) दानवाचा वध केला ते मान्य करतात. तू यज्ञ साक्षात आहेस असेंसुद्धा सांगतात. कांहीं ऋषी सांगतात, तू क्षमाशिलता आहेस, आणि सत्य आहेस, नारदमुनी तुला साध्यांचा देव समजतात, ते तुला शीव आणि ब्रह्म सुद्धा समजतात. तू त्या सृष्टीच्या कर्तांबरोबर त्यांच्यातला एक असा वागतोस. ते असें सुद्धा बोलतात किं, हे आभाळ तुझा माथा आहे व पृथ्वी तुझे पाय. ज्या वैदिक ऋषींनी त्याचे स्वत्व (आत्मा) ओळखले आहे ते सांगतात कीं, तू पूर्ण असून तुझ्या नंतर कांहीं नाही. ते असेसुद्धा समजतात किं, तू सगळ्या ऋषींचा आधार आहेस. तू सर्वसाक्षी आहेस, तू सर्वज्ञानी आहेस, तू एकाच वेळी सगळीकडे असतोस, तू व्यक्ती असूनही अव्यक्त सुद्धा आहेस. तू ह्या सृष्टीचा नियामक आहेस, तू सगळ्या दिशा आहेस, तूंच सूर्य व चंद्र आहेस तूंच तारे आहेस, ह्या सृष्टीतील प्राण्यांचे नितीनियम तूंच आहेस व अनितीसुद्धा तूंच आहेस!

आणि ते सगळे ऐकल्यावर तेथे बसलेली पांडवांची पत्नी कृष्णा बोलते, "म्हणून मी द्रौपदी पांडवांची पत्नी आणि दृष्टद्युम्नाची लहान बहीण तुला माझे दुःख सांगते कारण, तूच माझा आधार आहेस. असें असूनही तो कौरव माझा भर सभेत मला माझे केस धरून खेचत आणत होता, जेव्हां मी ऋतुस्नात होती व म्हणून माझ्या देहावर एकच वस्त्र होते त्या वस्त्रावर मासिकपाळीचे डांग पडलेले होते व माझे केश मोकळे होते, हे कसे झाले"? "मी थरथरत होते, माझ्यात त्या नराधमाला विरोध करण्याची ताकद नव्हती, मी रडत होत्ये, अशा माझ्या स्थितीत तो मला निर्दयपणे खेचतच होता. ते पाहून माझी मदत करण्या ऐवजी ते कौरव माझी मस्करी करून हसत होते. तुम्ही पांचाल, वृश्नी, भोज जर तेथे असतां तर त्यांची तसे करण्याची हिम्मत झालीच नसती. अरे कृष्णा, नियमाने मी धृतराष्ट्राची व भिष्मांची सुन आहे. असें असतांना ते मला कोणाची दासी कशी करू शकतात? त्यांच्या समक्ष ते नराधम मला त्यांची दासी करण्याचा प्रयत्न करतात व ते बुजूर्ग फक्त पहात रहातात, अरे कृष्णा, मला कांहीं कळतच नाही हे काय होत होते? मी माझ्या पांचही नवर्यांचा धिक्कार करते. त्यांनी माझा डाव कसा केला? त्यांना हा अधिकार कोणी दिला. युधिष्ठीर दैवाच्या खेळात असा कसा रमला? तो चुकला पण बाकीचे काय करत होते? मला सांगतात, वचन बद्धता, पण अशी कशी वचन बद्धता किं

कोणी तुमची बायको पणाला लावतो व तुम्ही तोंड बघत बसता? वचन बद्धतेच्या नियमांची नैतिकता कोणती होती. कोणी कांहीं करेल ते तुम्ही मान्य कराल कारण तुम्ही वचन बद्ध अहा? त्याला कांही मर्यादा आहेत किं नाहीत? हे नवरे त्यांच्या मोठ्या भावाला वचन बद्ध आहेत तर ते मलासुद्धा वचन बद्ध होते, माझ्या शरमेचे संरक्षण करण्याचे वचन त्या प्रत्येकांनी मला दिले आहे, त्याचे काय? कोठली वचनबद्धता श्रेष्ठ व ते ह्या लोकांनी कसे ठरवले? ह्या वचन बद्धतेला मी शेळ्या बकर्यांची वचन बद्धता समजावी कां? एक मुख्य शेळी मूर्खपणाने खड्ड्यात गेली कीं तिच्या मागोमाग इतर शेळ्यानी सुद्धा त्या खड्ड्यात पडावे असे सांगणारी वचन बद्धता क्षत्रियांना शोभत नाही. अशी वचन बद्धता निर्बुद्धतेचे लक्षण आहे. काय माझे पांचही नवरे इतके निर्बुद्ध आहेत? परिस्थितीनुसार अशा वचनबद्धता व त्यांची शाश्वतता तपासायला पाहिजे हे ह्या एरवी मोठ्या चातुर्याच्या गोष्टी करणार्याना कळत नव्हते कां? द्युतात हा माणूस, युधिष्ठीराकडे अंगुली निर्देश करत ती प्रिशताची नात कृष्णाला विचारते, कोणाही माणसास कसे पणाला लावू शकतो. आम्ही त्याची मालमत्ता तो कसा समजतो? पत्नी, भाऊ, मुलगा, मुलगी कोणाची मालमत्ता असतात कां? कृष्णा, माझ्या प्रश्नाची उत्तरे दे कारण, त्या प्रसंगानंतर माझा माझ्या नवर्यावरील विश्वास संपला आहे. मी ह्यांच्या बरोबर सुरक्षित नाही. मी काय करू, तूंच सांग दामोदरा, माझ्या प्रिय भावा? ह्यां नवर्यापासून मला पांच तेजस्वी पुत्र झाले आहेत, माझे नशिब, ह्या माणसांने त्याना पणात लावले नाही. दैवाचा खेळ खेळावयाचा तर स्वताच्या हिम्मतीने खेळावा इतरांना पणाला लावून हा माणूस कोणाच्या दैवाची परीक्षा घेत होता. त्यातसुद्धा त्याला माहीत होते की, तो द्युत खोटा होता, मग तो तशा द्युताच्या खेळास कां तयार झाला"? एवढे बोलून ती द्रुपदाची कन्या, कृष्णाला विनंती करते कीं, "ती फक्त आता ह्यापुढे त्याच्यावर भिस्त ठेवणार व तिच्या नवर्यांवर ती विश्वास ठेवणार नाही". ती पुढे सांगते, "ह्यानंतर आम्ही जरी पतिपत्नी असे जगासाठी असलो तरी आमचे नाते पूर्वीसारखे होणे शक्य नाही. मी ह्यापुढे माझ्या पांच मुलांसाठी जगणार आहे. जणू आमचे वैवाहीक नाते संपले! कारण, त्यांनी त्यांचे पत्नीव्रताचे पालन केलेले नाही. माझे पति मोठे लढवय्ये आहेत पण जर ते एकाद्या युक्तीने हरणारे असतील तर त्याच्या त्या शौर्याची किंमत शून्य आहे. तो फालतु शकुनी, त्यांना दास करू शकत असेल तर त्या

गांडीवाचा, त्या गदेचा काय उपयोग"? द्रौपदी पुढे कृष्णाला सांगते, अरे कृष्णा, तुला कदाचित माहीत असेल ह्यां पांडवांवर विसंबून राहिलेली माझी सासू, कुंतीमातासुद्धा ह्या युधिष्ठीराच्या नकर्तेपणामुळे व इतर भावांच्या त्या वचनबद्धतेच्या अडचणी मुळें खूप भोगून राहिली आहे. अशा पुरुषांवर ज्यांना त्यांच्या पुरुषी अहंकारापेक्षा दुसरी कोणतीही गोष्ट नगण्य वाटते आम्हा बायकांनी विश्वास ठेवणे केवळ मृत्यूला बोलावणे धाडण्या सारखे आहे. वडील भावाचे कोणते कर्तव्य ह्या मोठ्या भावानें जबाबदारीने पार पाडले आहे ते मला सांग? ते लहान असतांना वृकोदराला त्या दुर्योधनाने खाण्यातून जहर दिले पण ह्या मोठ्या भावाने त्यावर कधी कोणाला जाब विचारला कां? मोठा भाऊ म्हणून हक्क मागणारा, मालकी दाखणारा हा युधिष्ठीर कां कांहीं विचारणा करत नव्हता? त्यानंतर वरणावतात लक्षागृहात त्यांना जाळण्याचा प्रयत्न झाला त्यात भिम आणि त्याचे धाकटे तीन भाऊ तो बोगदा खोदत होते व हा मोठा भाऊ नुसता बसून त्याच्या वडीलकींचा रुबाब दाखवत होता. भिमामुळें हिडींब राक्षसा पासून सगळे बचावले त्यात ह्यांने कोणती भूमिका बजावली? ते त्याला तू विचार. हा माझा नकर्ता पति फक्त त्याला फुकट मिळालेल्या सत्तेचा आणि बायकोचा उपभोग घेतो व मोठ्या दिमाखाने सगळ्यांना सांगतो त्याला ते सगळे त्याच्या दैवामुळें मिळाले! कधीही त्याने त्याचे श्रेय त्याच्या भावांना दिले नाही हा कोणत्या प्रकारचा कृतघ्नपणा म्हणावयाचा? ह्या त्याच्या वागण्यात कोणती नैतिकता आहे ते त्यांने सांगावे. आम्ही बायका साधारणपणे आपल्या नवर्याचा मान राखण्यासाठी त्यांच्या कित्येक मूर्खपणाच्या वागण्याकडे दुर्लक्ष करतो म्हणजे त्या आम्हाला मान्य आहेत असें जर ते पुरुष समजत असतील तर तो त्यांचा मूर्खपणा होतो. जी गोष्ट केवळ आणि केवळ त्याच्या दैवावर अवलंबून होती ती म्हणजे, तो द्युताचा खेळ, तेथे आपण पाहिले कीं, त्याचे दैव फुटके आहे. अरे कृष्णा, मी इतका कृतघ्न माणूस माझ्या आता पर्यंतच्या जीवनात दुसरा पाहिलेला नाही. जे कांहीं पांडवांच्या जीवनात आजवर घडले त्यातील सगळे भिमामुळें निस्तरले गेले, जर आम्ही ह्या दैववादी नकर्त्या युधिष्ठीरीवर आणि त्याच्या त्या फुटक्या दैवावर अवलंबून राहीलो असतो तर एव्हाना आम्ही केव्हांच यमाकडे गेलो असतो. तसे पाहिले तर युधिष्टीर फक्त एक वर्षाने भिमापेक्षा मोठा आहे, तेवढ्या एका वर्षाचा एवढा गैर फायदा घेणे कितपद योग्य आहे? मला विशेष

राग ह्याचा आहे कीं, बिकट प्रसंग आला कां त्याला स्वताची बुद्धी वापरता येत नाही, तो कोणाला तरी सल्ला विचारतो, कधी तू भेटतोस तर कधी आमचे पणजोबा व्यास भेटतात व कधी कोणी नाही तर विदूर काका भेटतात. त्यांच्या सांगण्या प्रमाणें मग हा माझा मठ्ठ नवरा ते काम करतो. कधी कधी मला गंमत वाटते, जर कोणीच त्याला सल्ला द्यायला नाही मिळाले, तर तो कसें काम करील"? "सुरुवातीला मी सुद्धा त्यांना मोठा नितीशास्त्र जाणणारा समजून त्याचा आदर करत असें पण जेव्हां हा प्रसंग माझ्यावर आला तेव्हां माझा भ्रमनिरास झाला व एक एक गोष्टी ह्या नकर्त्याच्या माझ्या ध्यानात येऊ लागल्या. मला सुद्धा अर्जुनाने जिंकले व हा फुकट मिळालेल्या बायको बरोबर बेशरमपणे राहू लागला, मी त्याला न स्वीकारून काय करणार अरे जनार्दना? त्या घरात त्यांच्या आईचे चालते, तिच्या शब्दा बाहेर कोणी नाही, एका परीने ते योग्य असले तरी मला वाटते त्यामुळें माझ्या मनांचा कधी विचारच झाला नाही. मला काय वाटते ते कोणी कधी विचारलेसुद्धा नाही. तू माझ्या भावा, कृष्णा, तू जरा माझा विचार कर म्हणजे तुला समजेल माझी काय अवस्था होत असेल. तुला माहीत आहे राजसूय यज्ञासाठी खंडणी गोळा करण्यासाठी माझे हे चार कर्मयोगी, साक्षात कर्तृत्व असें पती सिमोल्लंधन करून चारही दिशांना चौफेर फौजा घेऊन लढत होते व वेळोवेळी भरपूर खंडणी पाठवत होते आणि हा माझा नवरा मात्र माझ्या बरोबर प्रणय क्रिडा करण्यात रमत होता. अरे कृष्णा, आता मला ह्या सगळ्या गोष्टी आठवतात तेव्हां मला माझीच लाज वाटते. माझे हे चार पती ज्यांच्या बद्दल मला फार अभिमान आहे तेसुद्धा त्या वचनबद्धतेच्या शब्दात अडकले आहेत ह्याची खंत वाटते. कारण, आजवर दोनदा त्या माझ्या काक सासर्याने धृतराष्ट्राने ह्यांना बोलावून दोनदा द्युतात फसवून नाकीनऊ केले, तसेंच पुन्हा होणार नाही कशा वरून? जोवर हा माणूस युधिष्ठीर त्याच्या खोट्या नैतिकतेच्या भ्रमात आहे त्याचा अहंकार त्याला सांभाळता येत नाही. तुम्ही सगळे त्याला मोठा गुणी समजता तोवर मी मला सुरक्षित समजत नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलल्यानंतर थोडावेळ थांबून ती प्रिशताची नात यज्ञसेना कृष्णाला सांगते, "अरे जनार्दना, तू जाणतोस माझी त्या लाजिरवाण्या परिस्थितीतून माझ्या अंगावर नवनवीन पातळं घालून तू कशी लाज राखलीस. आता मी धौम्यांच्या

बरोबर रहात आहे. मी किती विषण्ण अवस्थेत आहे त्याची कल्पना कोणाला येणार नाही. मी येथे एकटी बाई आहे ह्या सगळ्या पुरुषांत. माझी सासू विदूरांच्या कडे आहे. मला समजत नाही हे एवढे मर्द, हिम्मतवान आणि शूर असे सगळे उत्तम गुण असून त्यांच्या भरवशावर मी मला सुरक्षित समजू शकत नाही. त्या नीच लोकांच्या हातून माझी जी बेइज्जती झाली त्याचा कोण वचपा काढणार? कां ते नराधम असेंच ह्यांच्या खोट्या नैतिकतेच्या भ्रमाचा फायदा घेऊन माझ्याकडे सदैव हसत रहाणार. तू माझा भाऊ आहेस, तू सांग मला न्याय मिळणार आहे कां नाही? त्या कर्णाने माझ्या बद्दल जे उद्‌गार काढले ते तू ऐकलेस तर तुझ्या अंगाचा तळतळाट झाला असतां पण हे माझे पती एक नाही चांगले चार चार समजतात प्रति इंद्र पण कांहीं करत नव्हते. जेव्हां भिम उठला तेव्हां मला हायसे वाटले पण हा नैतिकतेचा खोटा पुतळा त्याला हाताने खुणवून गप्प बसण्यास सांगतो! माझा विश्वास बसत नाही कीं, हे इतके मूर्ख असतील. तू त्यांना खरी नैतिकता कशात असते ते शिकव कारण. मला खात्री आहे किं, ह्यांचे त्या बाबतचे शिक्षण चुकीचे आहे. **माझ्या मते ज्या वागण्यामुळें पापाला मदत होते ती अनैतिकता आहे**". द्रौपदीचा शोक अनावर झाला होता. ती तिचे मुख तिच्या ओंजळीत झाकत बोलली, "मला कोणी नवरा नाही, कोणी मुलं नाहीत, मित्र नाहीत, मदतनीस नाहीत, बाप नाही मी अनाथ झाली आहे". तू जर कांहीं नाही केलेस तर मी तुला सुद्धा ओळखत नाही"! असे कृष्णाकडे बघत ती स्वाभिमानी राजकन्या ओरडली. नंतर ती कृष्णाला विचारते, "सांग मला एकदाचे तू मला मदत करणार कीं, नाही"?

वैशंपायन पुढे सांगतात, त्या जमलेल्या योद्‌ध्यांच्या सभेत वासुदेव बोलण्यास उठतो.

रडून आकांत करणार्या आपल्या मानलेल्या भगिनीकडे पहात तो बोलतो, "माझी लाडकी भगिनी, कृष्णा, तुला मी वचन देतो कीं, तुझा अपमान करणार्या कौरवांच्या सगळ्या बायकां विधवा होतील. त्यांचे कपाळ पांढरे पडेल, त्या स्त्रिया अशाच आकांत करून रडतील. त्या बायकां त्यांच्या मेलेल्या पुरुषांच्या रक्तांने माखलेल्या शरीराला बघून रडत असतील. त्या प्रत्येक मेलेल्या कौरवाच्या शरीरात विवत्सुचे असंख्य बाण घुसलेले असतील. मी तुला आश्वासन देतो कीं, मी माझी सगळी शक्ती पणाला लावून पंडुच्या मुलांना त्या युद्धात य़शस्वी करीन. मी तुला दुसरे आश्वासन देतो कीं, तू पृथ्वीची महाराणी

होशिल. हे माझे आश्वासन इतके पक्के असेल किं एकवेळ स्वर्ग खाली कोसळेल, पृथ्वी फाटेल, हिमालयाचे तुकडे होतील, समुद्र सुकेल पण माझे वचन अबाधित राहिल". अच्युताचे ते वचन ऐकल्यावर द्रौपदी अर्जुनाकडे तिरकस दृष्टीने पहाते, जणू तिला आता त्याच्या कडून कांहीं आश्वासन अपेक्षित होते, तो इशारा लक्षात घेऊन जिश्नू बोलतो, "माझ्या प्रिय कृष्णा, आता चिंता करू नकोस, जे आश्वासन दामोदर देतो तसेंच होईल, त्या बद्दल निश्चिंत रहा". त्यानंतर एक एक वीर पुढे होऊन तिला त्यांची आश्वासने देण्यास सुरुवात करतात. तिचा भाऊ दृष्टद्युम्न तिला सांगतो, तो द्रोणाचा वध करणार आहे व त्याबरोबर अनेक कौरवांना सुद्धा कंठस्नान घालणार आहे. पुढे तो सांगतो, शिखंडी भिष्माचार्यांचा वध करण्यास कारणीभूत होणार आहे. भिम दुर्योधनाला ठार मारणार आहे. अर्जुन कर्णाला ठार मारणार आहे. आणि बलरामाच्या मदतीने तुझा बंधू दामोदर दुःशासनासह सगळ्या कौरवांचा नाश करणार आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने तेथे जमलेल्या शूरांनी द्रौपदीला आश्वासनं दिल्यानंतर ते आता त्यांचा प्रमुख जनार्दन, ह्याच्याकडे पुढील गोष्टींसाठी, तो काय बोलतो ते ऐकण्यासाठी पाहू लागतात. सगळ्यांचे लक्ष आपल्याकडे आहे हे पाहून तो कृष्ण त्यांच्यापुढे बोलू लागतो.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा बारावा भाग संपला.

# वनपर्व भाग तेरावा

(अर्जुनाभिगमन पर्व सुरु)

वासुदेव त्यांना सांगतो, "अहो राज्यांनो, मी जर त्यावेळी द्वारकेत उपस्थित असतो तर परिस्थिती एवढी विकोपास जाऊ दिली नसती. अरे राजांनो, मला आमंत्रण नव्हते तरी मी जर तेथे अनाहूतपणे गेलो असतो तरी कोणीही तेथील यजमानांने म्हणजे अंबिका पुत्र धृतराष्ट्राने किंवा कौरवांने मला अडवले नसते व त्या परिस्थितीत मी तो द्युत होऊ दिला नसता. त्यांना मी त्या द्युताचे अनेक दुष्परिणाम दाखवले असते. मी भिष्म, द्रोण आणि कृपाचार्य व वल्हिक ह्यांना हस्तक्षेप करावयाला लावले असते. धृतराष्ट्राला पटवले असते कीं, हा द्युत त्याच्या मुलांच्या साठी मोठा हानिकारक होणार आहे. द्युताचे अनेक वाईट परिणाम मी दाखवले असते. प्राचीन काळी द्युतामुळें कसे मोठ्या मोठ्यांचे नुकसान झाले आहे ते त्या विचित्रवीर्याच्या पुत्रास सांगितले असते. वीरसेनाचा मुलगा कसा त्याचे राज्य असा द्युतामुळें घालवून बसला ते सांगितले असते. अविचारी माणूस द्युताच्या खेळात अडकतो. द्युत हा एकाद्या भोवर्यासारखा असतो, जो त्यात अडकला तो त्यातून बाहेर येणे मुष्किल असते. जिंकण्याच्या मोहात बरेच लोक द्युत खेळतात व हरतात. माणसाचे चार छंद त्याला बरबाद करतात. द्युत, वासना, शिकार आणि मद्य (प्राचीन काळी राजे ह्या चार व्यसनांत त्यांचा समय घालवत असतं) ह्या चारांत जो अडकला त्याला वाचवणे महा अवघड असते. त्यात अडकलेले मोठे मोठे राजे त्यांचे सर्वस्व घालवून बसले आहेत. शास्त्र जाणणारे सांगतात ह्या चारांतून पापाचा मार्ग उत्पन्न होते. खरे तर जे ह्यात रमतात त्या सगळ्यांना हे सगळे माहीत असते तरी ते त्या मोहात अडकल्यामुळें त्यातून बाहेर येत नाहीत. अंबिकेच्या मुलाला मी सांगितले असते, द्युतात एका दिवसात आयुष्याची सगळी कमाई माणसांनी घालवली आहे. त्यानंतर जे घडते त्यातून वादंग सुरु होतात व शेवटी मृत्यू सुद्धा होत असतो. आता, तेंच तुमच्या बाबत होणार आहे. हरलेला जिंकलेल्याला मारतो! तुम्ही कौरवांना ठार मारणार अहात, तेंच मी धृतराष्ट्राला दाखवून दिले असते जुन्या जमान्यातील उदाहरणे दाखवून. तसें मला दाखवण्याची संधी मिळाली असती तर तो त्याच्या मुलांच्या मृत्यूच्या कल्पनेने धास्तावला असता व द्युताला परवानगी दिली नसती आणि हे सगळे घडले नसते. परंतु, ते करणारा माझ्यासारखा कोणी तेथे मध्यस्थ

नव्हता. आणि जर माझा प्रस्ताव त्यांनी स्वीकारला नसता तर मी त्याच्यावर बळजबरी केली असती. तेथे असलेले त्या सभेतील लोक जे तुमचे मित्र सांगत होते व प्रत्यक्षात मात्र ते तुमचे शत्रू होते त्यांना खेचून मी त्यांचा तेथेच नाश केला असता. जसें मी शिशुपालचे केले, सगळे तेथेच संपवले असते. त्या बरोबर तो द्युताचा खेळ व तो खेळणारा (शकुनी) कोणीही उरले नसते. अरे युधिष्ठीरा, मित्र बोलले म्हणून कोणी मित्र ठरत नाही, एवढे तुझ्या ध्यानात कसें येत नाही"? हे झाले कारण मी अनारत्त देशापासून दूर गेलो होतो. मी जसा द्वारकेला आलो मला युयुधनाने तुमच्याबद्दल सांगितले व ते समजल्यावर त्वरित मी येथे तुम्हाला भेटण्यासाठी निघालो. मला हे पहावयाला लागते किं, तुम्ही सगळे अशा हालाकीच्या परिस्थितीत अहात त्याचे खूप दुःख होते.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा तेरावा भाग संपला.

## वनपर्व भाग चौदावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

ते ऐकल्यावर युधिष्ठीर कृष्णाला विचारतो, "अहो देव, तू अनारत्त मधून कोठे गेला होतास"? आणखीन तो विचारतो, "अरे वृश्नीतील श्रेष्ठा, तू जेव्हां बाहेर गेला होतास तेव्हां कोठे रहात होतास? तेथे जाऊन तू काय करत होतास"?

कृष्ण त्याला सांगतो, "अरे भरत श्रेष्ठा, मी शल्वाच्या नगरीचा नायनाट करण्यासाठी गेलो होतो. तेथे काय झाले ते सांगतो, शल्वांचा राजा धमघोषाचा पुत्र जेव्हां त्याला समजले किं, मी शिशुपालाला तुझ्या राजसूय यज्ञाच्या वेळी डोके उडवून ठार मारले तेव्हां तो भयंकर चिडला. तो त्याचे सैन्य घेऊन द्वारकेवर चालून गेला. शिशुपालाला मारण्याचे कारण, तुला माहीत आहे, तुम्ही सर्वसंमतीने मला यज्ञात अग्रहक्क दिला ते त्याला आवडले नाही व तो अद्वातद्वा बोलून माझी निर्भत्सना करू लागला तेव्हां त्याची शंभर पातके पूर्ण झाली व मी त्याच्या आईला दिलेल्या वचनानुसार त्याचा वध केला. मी येथे असतांना तो सल्व राजा द्वारकेत घूसून तेथील लहान वयाच्या वृश्नी युवकांची हत्या करू लागला व नगराचेसुद्धा बरेच नुकसान करत राहीला. तो त्याच्या हवेत उडणार्या सौव नावांच्या सोन्याच्या रथाने आला होता. द्वारकेचे अशारितीने नुकसान करत तो विचारत होता, कोठे आहे तो नीच ज्यांने माझ्या शिशुपालाला व त्या आधी कंसाला मारले आहे, त्याला मी आत्ताच यमाकडे पाठवणार आहे. तो खूप रागावलेला होता. तो पुढे बोलत होता, शिशुपाल लहान वयाचा असतांना त्यांने त्याला ठार मारले व तोसुद्धा युद्धात अथवा द्वंद्वात नाही तर छल कपट करून. मी त्याचा युद्धात पराभव करण्यासाठी आलो आहे. असें मोठमोठ्याने तो ओरडत मला आव्हान देत होता. तेव्हां मी येथे असल्याने तो माझ्या द्वारकेचे नुकसान करू शकला. असें बोलून व द्वारकेतील लहान मुलांना मारून तो सल्व त्याच्या सौव नावाच्या उडणार्या रथाने समुद्रातील एका बेटावर गेला. मी जेव्हां घरी परतलो तेव्हां मला सगळे समजले. तो मार्तिकेचा राजा मला ठार मारण्याचे आव्हान देऊन गेलो होता. त्यामुळें मी अस्वस्थ झालो व त्याचा बंदोबस्त करण्यासाठी निघालो. माझ्या अनारत्तचा विध्वंश करण्याच्या बद्दल त्याला शासन करण्यासाठी मी गेलो होतो, जेव्हां तुमच्या कडे ते द्युताचे प्रकरण होत होते. सौभांच्या त्या नायकाला मारण्यासाठी त्याला मी

शोधत फिरत होतो. तो त्या बेटात उतरला आहे असें मला समजले, तेव्हां मी माझा शंख पंचजन्य, जोरांने फुंकला . त्याच वेळी तेथे लपलेले इतर बरेच दानव सुद्धा बाहेर आले व आमची लढाई सुरु झाली. त्या सगळ्यांना मी चीत केले व जमिनीवर झोपवले. हे असे झाले, माझ्या प्रिय पांडवानो, म्हणून मी तुमच्या मदतीला तेथे नव्हतो. आता समजले किं, तुम्ही येथे वस्तीला अहात तेव्हां येथे आलो.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा चौदावा भाग संपला.

# वनपर्व भाग पंधरावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

ते निवेदन ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला बोलतो, "अरे सर्व शक्तिमान वासुदेवा, आम्हाला त्या सौभाच्या वधाची गोष्ट सविस्तरपणे सांग. कारण, जे तू आता सांगितले त्यांने आमचे समाधान झालेले नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, वासुदेव त्यांना सांगू लागतो, तो बलाढ्य सल्व राजा श्रुतश्रवसाच्या मुलाचा (शिशुपाल) वध मी केला हे समजल्यावर त्याची फौज घेऊन द्वारकेला आला. त्यांने त्याचा फौजा युद्धाच्या तयारीने माझ्या नगरीच्या भोवती उभ्या केल्या. द्वारकेला त्यांने वेढा दिला होता. त्यातील वरच्या आघाडीत तो स्वतः होता. वेढा पूर्ण झाल्यावर त्याच्या सैन्याने माझ्या नगरावर सर्व बाजूनी बाणांचा पाऊस टाकण्यास सुरुवात केली. सुदैवाने द्वारकेची तटबंदी चांगली होती. त्या तटबंदीतील सगळी आयुधे, यंत्रे, सुरुंग वगैरे सुस्थितीत होते. प्रतिहल्ला करण्याची तयारीसुद्धा पूर्ण होती. सगळे बाले किल्ले सशस्त्र होते. जळते गोळे फेकणार्या गोफणी तोफा सुद्धा तयार होत्या. आमचे सैनिक शतघ्नी धनुष्य घेऊन तयार होते. वेळीच नगराची सगळी प्रवेश द्वारं ज्यांच्यावर मोठे मोठे खिळे बसवलेले आहेत ती बंद केलेली होती. सैनिक हातात गोफणी घेऊन तयार होते. नगरातील माणसें प्रतिहल्ला करण्यासाठी तयार होती. गद, सम्व, उद्धव, आणि इतर योद्धे ज्यांचे लढाईचे ज्ञान बर्यापैकी आहे ते संरक्षणासाठी सज्ज होते. शत्रू जर तटबंदीवर चढून येण्याचा प्रयत्न करील तर त्यांच्या अंगावर ओतण्यासाठी उन्ह पाण्याची व्यवस्था होती. कोणत्याही लढाईस ती नगरी तयार होती. सौभाच्या हल्ल्याला ते तोंड देण्यासाठी सज्ज होते. बाहेरून बाणांचा वर्षाव सुरु झाला तसें आमच्या मंडळींनी सुद्धा त्यांच्या शतघ्नीनी बाणांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली. कोठल्याही प्रकारचा हलगर्जीपणा करण्याच्या विरुद्ध आदेश दिले गेले, कोणीही नशा करावयाची नाही असें हुकूम झाले होते. असें करण्याचे कारण माझी माणसे, वृश्नी व अंधक, जाणून होती किं, जर ते थोडे तरी हलगर्जीपणे वागतील तर ते सल्व योद्धे आमचा नाश करतील कारण, ते युद्धकलेत जास्त जोरदार असतात. शिपायांनी नगरातील सगळे दारुडे, नायकीणी, विदुषक, खुषमस्करे ह्यांना बंदी करून ठेवले अशासाठी किं, त्याच्या चुकीच्या हालचालीमुळें नुकसान होऊ

नये. कारण अशा मंडळींना परिस्थितीचे गांभिर्य सांभाळता येत नाही. सगळे नगरात येणारे नाले बंद केले होते. सगळे पुल तोडून टाकले होते म्हणजे ते सल्व त्या मार्गाने आत येऊ नयेत. नगराभोवती असलेल्या खंदकात मोठे मोठे काटे अशारितीने पसरवून ठाकले होते किं, जर कोणी त्यातून चालत येण्याचा प्रयत्न करील तर त्याच्या पायात ते रुततील. हि तयारी उग्रसेनानी चोख केली होती. नगराच्या भोवतीची भूमी खड्डे व ढेकळ्यानी उंचसखल अशी केली होती किं, त्यातून रथ चालवता येणार नाहीत. कांहीं ठिकाणी भुई सुरुंग पेरलेले होते असें किं, जर कोणी त्यावरून चालत येण्याचा प्रयत्न करील तर तो त्या सुरुंगामुळें उडवला जाईल. माझा किल्ला स्वाभाविकपणे मजबूत आहे व तो पार करणे सहसा शक्य नव्हते. त्यावर पहारा करणार्या सैनिकांना शस्त्रे पुरवली होती. कोणत्याही हल्ल्याला तोंड देण्याची तयारी सदैव असते तशी ती होती. अशा तयारीमुळें माझी नगरी साक्षात पुरंदर वाटत होती. जेव्हां सल्व आक्रमण करून आला, कोणीही त्या वृश्नी व अंधकांच्या नगरीत आत येऊ शकत नव्हते अथवा बाहेर जाऊ शकत होते. जे ठरलेली खूण दाखवत त्यांनाच ते करता येत होते. इतकी चोख व्यवस्था होती. नगरातील सगळ्या मोकळ्या जागांवर हत्ती व घोडे ठेवलेले होते. सैनिकांना खास वेतन जाहिर केले होते त्यामुळें त्यांचा उत्साह वाढलेला होता. माझ्या सगळ्या योद्ध्यांना मी नेहमी सोन्याच्या नाण्याने वेतन देतो. सगळे योद्धे अनुभवी होते. अशा तयारीमुळें माझी द्वारका सुरक्षित राहिली. त्यांचे नेतृत्व अहुकांने (उग्रसेन) केले होते. अशा तयारीमुळें सल्व बाहेरील भागाचे नुकसान करून गेला होता. तरी त्यात माझे बरेच तरुण वृश्नी मारले गेले होते.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा पंधरावा भाग संपला.

# वनपर्व भाग सोळावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वासुदेव पुढे सांगतो, तो सल्व, सौभांचा राजा द्वारकेकडे त्याची प्रचंड फौज घेऊन येत होता. त्यात पायदळ, घोडदळ आणि हत्तीदळ असे सगळे होते. त्याच्या सैन्यात चार प्रकारचे दल होते. त्याच्या कडे त्यांच्या गरजेप्रमाणे पुरेसा पाणी साठा व खाद्य साठा होता. सैनिक अनुभवी व तयार होते. द्वारकेच्या भोवतीच्या सगळ्या भागात त्याचे सैन्य बसलेले होते फक्त मंदीर, स्मशानभुमी, पवित्र वृक्ष, वारुळांनी भरलेल्या जागा, एवढे सोडून. द्वारकेकडे येणारे सगळे रस्ते, वाटा त्यांनी अडवलेल्या होत्या. अशी जय्यत तयारी असतांना तो शल्वांचा राजा गरुडासारखा झेपावत माझ्या नगरावर चाल करून आला. त्यात सशस्त्र रथ, हत्ती आणि पाईक होते. त्यांच्याकडे सगळ्या प्रकारची आयुधं होती. त्याचे योद्धे त्या आयुधांच्या वापरात तरबेज होते. त्यांच्या रथांवर त्यांचे ध्वज फडकत होते. त्याच्या पाईकांकडे धनुष्य बाण होते व कमरेला तलवारी होत्या. ते पाहिल्यावर आमच्या वृश्नी मुलांनी नगराबाहेर येऊन लढण्याचा निर्धार केला. त्यांत चारुदेशन, सम्व, आणि पराक्रमी प्रद्युम्न पुढे होते. ते चिलखत, शिरोटोप परिधान करून मोठ्या तयारीने शल्वाशी लढण्यासाठी निघाले. सम्वाने पहिला हल्ला केला. शल्वांचा सेनापती क्षेमवृद्धी त्याच्या सैन्याला आगेकुच करण्यास सांगतो. जंबवतीच्या मुलांने मोठ्या प्रमाणात बाणांचा वर्षाव सुरु केला. क्षेमवृद्धीच्या सैन्याने त्याचा मुकाबला उत्तम केला. ते तसुभरही हटले नाहीत. जणूकाय हिमालयच समोर उभा आहे असें वाटत होते. त्यानंतर क्षेमवृद्धीने त्याहीपेक्षा जास्त जोराने प्रतिहल्ला केला. आता तो मात्र केवळ शस्त्रांवर अवलंबून न रहाता मायावी सिद्धीचा उपयोग करू लागला. ते पाहून आमच्या सम्वनेसुद्धा मायावी सिद्धीने प्रतिहल्ला केला. त्यात शेकडो सैनिक मारले गेले. ते पाहून क्षेमवृद्धी तेथून मागे हटला. जसा तो दुष्ट शल्वाचा सरसेनापती मागे फिरला त्याच्या मागून एक दैत्य ज्याचे नांव वेगावत होते तो पुढे आला. तो माझ्या मुलांवर चाल करून गेला. सम्वाने तो हल्ला घेतला. आणि त्याला त्याने गदा फेकून मारली. ती गदा त्या वेगावताला जोरांने लागली. त्या फटक्याने तो असुर मारला गेला. ते झाल्यावर माझा मुलगा सम्व त्यांच्या मध्ये घूसून लढू लागला. दुसरीकडे एक जबरदस्त दानव ज्याचे नांव होते विविंध्य चारुदेशनावर चाल

करून गेला. त्यांचे युद्ध मोठे भीषण होते. त्यामुळें कोणालाही पूर्वी होऊन गेलेले वृत्र आणि वसवाच्या युद्धाची आठवण होईल असं ते होते. दोघेही एकमेकांवर ओरडत आपली अस्त्रे फेकत होते, त्यात रुक्मीचा मुलगा त्याचे ठेवणीतील शस्त्र काढतो जे कोणाही शत्रूचा नाश करण्यात अव्वल होते. त्याच्या मारा मुळें तो दानव विविंध्य मरून पडला. त्या मागून सगळे त्याचे दानव मारले गेले. विविंध्यच्या मृत्यूमुळें उत्साहीत झालाला सम्व पुढे जातो व पहातो ते सल्व त्याच्या सोनेरी रथातून त्याच्याकडे चाल करून येत आहे. ते पाहून माझा मुलगा थोडा घाबरला. ते पाहून प्रद्युम्न ओरडून त्याच्यात जोम आणण्यासाठी बोलतो, "घाबरू नकोस, मी त्याच्याशी लढतो ते तू पहात रहा. मी तो शल्वाचा रथ माझ्या शस्त्रांच्या मारानें मोडून टाकतो. त्या सौभांच्या राजाला हरवू या. माझ्या ह्या हल्ल्याने त्याचा रथ मोडेल व तो ठार मरेल असं मी करतो". "अनारत्तावर स्वारी करण्याची त्याला मी शिक्षा करणार आहे". अशारितीने बोलतो व तो मजेत ती लढाई करत होता.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा सोळावा भाग संपला.

# वनपर्व भाग सतरावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

पुढे वासुदेव सांगत असतो, यादवांना असें बोलून रुक्मीचा तो शूरवीर पुत्र प्रद्युम्न त्याच्या सोनेरी रथात पुढे जातो. त्याच्या रथाला उमदे घोडे जोडलेले होते. त्यांचा वेग व चपळाई विलक्षण होती. त्याच्या रथाच्या ध्वजावर मकराचे चिन्ह होते. त्या मकराचे तोंड उघडे होते जणूकाय तो मकर आत्ताच शत्रूला खाणार आहे. जणूकाय ते यमाचे द्वार आहे. त्याच्या रथाचे घोडे इतक्या चपळाईने पुढे सरकत होते किं असे वाटावे कीं, ते धावत नाही तर उडत आहे. त्याच्या पाठीवरील भाते बाणांनी भरलेले होते, त्याचे हात अशा झपाट्याने धनुष्यातून बाण फेकत होते किं, जणू विजा चमकत आहेत. त्या वेगवान हल्ल्यांमुळें दानव गोंधळून गेले. ते इतस्ततः पळू लागले. त्यांच्या सह सौभाचे सैनिकसुद्धा पळू लागले. प्रद्युम्नाचे आव्हानात्मक ओरडणे व बाणाचा वर्षाव ह्यामुळें सर्वत्र शत्रूपक्षाचा गोंधळ उडाला होता. त्याच्या ध्वजावरील मकराच्या चिन्हामुळें सर्वत्र घबराट पसरली होती कारण, त्यातील मायावी मंत्रामुळें असा भास होत होता की, तो मकर ध्वजातून बाहेर येऊन त्यांच्या सैनिकांना गिळत आहे. त्यानंतर प्रद्युम्न थेट शल्वावरच चाल करून गेला. त्याचे आव्हान सल्व घेऊ शकला नाही. राग आणि भावनांच्या आवेगांने भ्रष्ट झालेला तो सल्व त्याच्या रथातून उतरतो व प्रद्युम्नाला भूमीवर उतरण्याचे आव्हान देतो. तेथे सल्व आणि प्रद्युम्न ह्यांचे युद्ध होते. ते युद्ध प्राचीन काळी होऊन गेलेल्या वसव आणि वलीच्या द्वंद्वाची आठवण करणारे होते. सल्व त्याच्या धनुष्यातून बाणांचा वर्षाव करत होता त्याला तोडीस तोड अशा प्रतिहल्ला प्रद्युम्न करत होता. त्या हल्ल्यापुढे सल्व फार काळ टिकाव धरू शकला नाही. शल्वावर आता सम्व आणि प्रद्युम्न दोघे हल्ला करतात. त्यात एक बाण शल्वाच्या चिलखतातून त्याच्या छातीत घूसतो व सल्व बेहोष होऊन खाली पडतो. ते पाहून त्याचे दानवी सैन्य ओरडते कीं, त्यांचा राजा पडला. तेव्हढ्यात तो मायावी दानव उठतो व अचानकपणे प्रद्युम्नावर बाणाचा मारा करतो. त्या मारांने रुक्मीचा मुलगा प्रद्युम्न त्याच्या रथात पडतो. ते पाहून सल्व वेड्यासारखा मोठ्यानी आरोळी ठोकतो किं, त्याने रुक्मीच्या मुलांस मारले आहे. त्यानंतर तो त्याचा मोर्चा

सम्वाकडे वळवतो. त्यालासुद्धा तो खाली पाडतो, दोघेही शूर योद्धे त्यांच्या रथात निपचीत पडलेले होते.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा सतरावा भाग संपला.

# वनपर्व भाग अठरावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वासुदेव पुढे सांगत असतो, प्रद्युम्नला रथात पडलेला पाहिल्यामुळें वृश्नी फौजेतील कांहीं निराश आणि दुःखी झाले. ते अंधक व वृश्नीचे सैनिक एकदम बोलले, "अरे हे काय झाले". सल्व पडल्यामुळे आनंदी झालेले यादव आता थोडे खच्ची झाल्यासारखे स्थब्ध झाले. प्रद्युम्नचा सारथी जो माझ्या सारथ्याचा मुलगा आहे तो दारुक चपळाईने रथ युद्ध क्षेत्रातून बाहेर काढतो. तो रथ फार दूर गेला नव्हता तेव्हढ्यात प्रद्युम्नला शुद्धी येते व तो लढण्यासाठी उठतो. तो पहातो कीं सारथी रथ बाहेर नेत आहे. ते पाहून तो त्याला बोलतो, "अरे दारुका लढाईतून पळण्याची आपली वृश्नींची परंपरा नाही हे तुला माहीत नाही कां? अरे सुता, तू युद्धाला घाबरलास कां? कां त्या शल्वाला पाहून तू पळत आहेस? तुझ्या मनांत काय आहे ते सांग". दारुक त्याला उत्तर देतो, "अहो, मी न घाबरलो आहे अथवा पळत आहे, तुम्ही बोहोष पडल्यामुळें एका सारथ्याचे जे काम आहे ते मी करत होतो. माझे काम तुम्हाला व ह्या रथाला वाचवण्याचे असते, ते मी करत होतो". कारण, आपण कितीही शूर असलात तरी बेहोष झाल्यावर त्याचा कांहीं उपयोग नसतो. मला वाटते शल्वाला मारणे तुम्हाला झेपत नाही. म्हणून मी आपला रथ सावकाशपणे बाजूला घेत होतो. युद्धात योद्धा व सारथी एकत्र काम करत असतात, दोघांनी एकमेकांना वाचवायचे असते. म्हणून मी तुम्हाला येथून दूर नेत आहे. मला माझे कर्तव्य करू द्या. आपण एकटे आहोत व हे दानव संख्येने जास्त आहेत. त्याचा विचार करा. शेवटी जिंकणे हे महत्वाचे आहे म्हणून हट्ट करू नका. सारथ्याचे ते ऐकून मकरध्वज असलेला तो योद्धा त्याला हुकूम करतो, "रथ परत फिरव व शल्वापुढे घे. परत कधीही असें करू नकोस. लढाईतून परत फिरणे सच्च्या लढवय्यासाठी नामुष्किचे असते हे तुला समजत नाहीं कां? जोवर मी जीवंत आहे तोवर मी लढत रहाणार हे लक्षात ठेव. जो लढाईतून पळ काढतो तो सच्चा वृश्नी नाही". "तू सारथ्यांच्या परंपरेतील असून तुला हे कसे माहीत नाही? म्हणून मी तुला पुन्हा सांगतो भविष्यात कधीही असा पळ काढून जाऊ नको जेव्हां मी रथात लढत असेन". "तुझ्या ह्या कृत्यामुळें माझे नांव माधवापुढे कमी होईल, मला ते सगळे हसतील. महाबली बलराम काय माझ्याबद्दल समजतील? ते

महान योद्धे सत्यकी काय बोलतील? तुझ्यामुळें त्यांचे माझ्याबद्दलचे मत खराब होईल त्याचा तू विचार कर. आजपर्यंत ते सगळे मला चांगला शूरवीर बेडर लढवय्या समजतात ते बदलेल. ते मला भित्रा समजतील त्यापेक्षा मरण परवडले. एका शूराला लढतांना मरणे जास्त श्रेयस्कर असते ते मी तुला सांगावयास पाहिजे कां? म्हणून मला वाचवण्यासाठी तू भविष्यात कधीही रथ मागे घेणार नाही, ही माझी तुला आज्ञा आहे असें समज". "हरी पांडवांच्या कडे त्यांच्या यज्ञात भाग घेण्यासाठी गेले आहेत, म्हणून मला शल्वाला ठार मारलेच पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाही. जेव्हां शल्वाचा हल्ला झाला तेव्हां मी कृतवर्मनला बोललो आहे किं, हा हल्ला आपण परतवू. म्हणून ते आपल्याला केलेच पाहिजे, जगून अथवा मरून. मी हृद्रीकाचा पुत्र आहे हे लक्षात ठेव. जेव्हां ते शूरयोद्धे भेटतील तेव्हां मी त्यांना काय सांगणार, कीं, दारूकाने मला न विचारता रथ मागे फिरवला म्हणून. ते कोणीही मानणार नाही हे तुला समजत नाही कां"? "बलराम, सत्यकी असें सगळे माझ्या शौर्या बद्दल किती चांगले बोलतात व त्यांने असें समजले किं, शल्वाशी लढतांना मी रथ मागे फिरवला, काय माझी इज्जत राहिल त्यांच्या पुढे. जर तू असा रथ फिरवलास व माझ्या पाठीत बाण घुसल्याच्या जखमा त्यांना दिसल्या तर मला ते सहन होणार नाही. त्यापेक्षा युद्धात मरणें परवडले. ह्यापुढे कशाही परिस्थितीत तू माझा रथ अशारितीने मागे फिरवणार नाहीस असें मला वचन दे. भित्रा म्हणून जगण्यापेक्षा वीरमरण मला जास्त प्रशस्थ वाटते. आता चल लवकर, मला युद्धभूमीकडे घेऊन चल".

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा अठरावा संपला.

# वनपर्व  भाग एकोणीसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वासुदेव पुढे सांगत असतो, प्रद्युम्नचे ते बोलणे ऐकल्यावर त्याचा सारथी दारुकाचा मुलगा त्याला मृदू आवाजात उत्तर देतो. "अहो, रुक्मीपुत्र तुमचा कांहीं गैरसमज माझ्याबद्दल होत आहे. मी रणभूमीला घाबरत असतो तर तुमचा सारथी झालोच नसतो. म्हणून त्या भ्रमात कृपया राहू नका. किंवा मी तुम्हाला नामर्द शाबीत करण्याचा प्रयत्न सुद्धा करत नाही. त्याशिवाय मी तुमच्या वृश्नींच्या सगळ्या चालीरीतीं चांगल्याच ओळखतो. तुम्ही संपूर्ण दिवस लढत अहात, त्यामुळें आमच्या प्रशिक्षणाप्रमाणे, एका सारथ्याचे कर्तव्य असतं कीं, तो त्याच्या रथाचे व त्यावरील योद्ध्याचे संरक्षण करील. तुम्ही कांहीं बोला, अशी वस्तुस्थिती होती कीं, तुम्ही फार थकला होता व बाणांच्या माराने भरपूर जखमी झाला होतात. त्या स्थितीत शल्वा सारख्याशी तुम्ही लढू शकला नसता. म्हणून मी रथ फिरवला होता. त्यामुळें तुम्हाला एवढे वाईट वाटण्याचे कारण असू नये. अहो सतवतांचे प्रमुख, आता तुम्ही सावध झाला अहात तेव्हां माझी रथ हाकण्याची कसब पहा. आता पहा मी शल्वाच्या सैन्याच्या फळीत आपला रथ कसा घालतो. मला रथ चालवण्याचे शिक्षण माझ्या पित्याने उत्तम दिले आहे त्याबद्दल आपण शंका घेऊ नका". असे बोलून त्या दारुकाच्या मुलांने तो रथ अशा चपलखपणे शल्वाच्या पुढे आणला किं, जाणकार थक्क झाले. शल्वाला कांहीं कल्पना येण्या आधी प्रद्युम्न तीन बाण त्याच्या दिशेने फेकतो, परंतु, त्याचा सारथी त्याकडे दुर्लक्ष करत त्याचा रथ पुढे आणतो. त्याबरोबर सल्व प्रद्युम्नाच्या दिशेने बाणांचा बर्षाव करतो. त्यात विविध तर्हेचे बाण होते. प्रद्युम्न मात्र ते सगळे बाण लिलया त्याच्या बाणांनी दूर फेकून देतो. ते पाहिल्यावर सल्व त्याच्या मायावी शस्त्रांचा वापर करू लागतो. परंतु, प्रद्युम्न त्याच्या प्रतिमायावी शस्त्राने त्यांचे तुकडे करून टाकतो. त्यानंतर जास्त समय न दवडता प्रद्युम्न ब्रह्मास्त्र शल्वावर फेकतो. त्याबरोबर तो त्याचे खास पंख असलेले बाण मारतो. ते शल्वाच्या छाती, तोंड व डोक्यात घुसतात. त्या जबरी जखमामुळें सल्व खाली कोसळतो. तो नीचात्मा खाली कोसळल्यावर प्रद्युम्न त्याचे ठेवणीतील शस्त्र असलेला बाण काढतो जो सगळे दशर्ह पुजतात, व तो सल्वावर मारणार इतक्यात आकाशातून वाणी होते, "अरे, अहो", ज्यात अनेक दर्शी

ओरडून त्याला कांहीं सागण्याचा प्रयत्न करत असतात, अखेरीस नारद खाली उतरतात व प्रद्युम्नाला सांगतात, अरे रुक्मीच्या सुपुत्रा हा सल्व तुझा बळी नाही. तो तुझ्याने मरणार नाही. तो तुला आटपणार नाही. तू जो बाण त्याच्यावर उगारला आहेस तो जर तू मारलास तर तो सल्व त्याच्या फटक्याने मरेल परंतु, विधीलिखीत वेगळे आहे व म्हणून तू तसे करणार नाहीस. म्हणून तू तो त्याच्यावर फेकू नकोस. ते ऐकून प्रद्युम्न तो प्रभावी बाण त्याच्या धनुष्यावरून काढतो व त्याच्या भात्यात ठेवतो. त्यानंतर तो दानव सल्व उठतो व वृश्नींच्या त्या प्रभावी हल्ल्याने निराश झालेल्या मनानें त्याच्या रथातून परत फिरतो. सल्व त्याच्या सोनेरी रथात बसून आकाशात उडून जातो त्या समुद्रातील बेटाकडे.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा एकोणीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग विसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वासुदेव पुढे सांगतो, जसें तो सल्व अनारत्त सोडून गेला त्याच सुमारास मी तेथे परतलो होतो. तुझा तो महान राजसूय यज्ञ उरकून मी माझ्या गांवी परतलो होतो. तेथे गेल्यावर पहातो ते काय, सगळी द्वारका, तिचे वैभव पूर्णपणे उध्वस्त झालेले पाहिले. तेथे कोणी वेदाचे पठण करत नव्हते. कोणी यज्ञ करत नव्हते. तेथील बायकांच्या अंगावर दागिने नव्हते ज्या सदैव अलंकाराने सजलेल्या असतात. त्यांचे सौंदर्य पूर्णपणे झाकोळलेले होते. त्या निस्तेज झाल्या होत्या. ते पाहून मी सतर्क झालो व हृदिकच्या मुलांस कृतवर्मनला हे असें कसे झाले म्हणून विचारले. हे सगळे असें बेभान कां झाले आहेत, त्याने मला सगळे सांगितले सविस्तरपणे. शल्वाने द्वारकेवर निर्घृण हल्ला केल्याचे मला समजले. त्याने नंतर कशा प्रकारे प्रयाण केले तेसुद्धा सांगितले. ते ऐकल्यावर मी सल्वाचा वध करण्याचे ठरवले. त्यानंतर मी माझ्या सगळ्या माणसांना बोलावले ज्यात अहुक, अनकदुंधूव आणि इतर महत्वाचे यादव होते, त्यांना सांगितले किं, मी आता सल्वाचा बळी घेण्यासाठी जात आहे तेव्हां तुम्ही सगळे द्वारकेचे संरक्षण करण्यासाठी सज्ज रहा. त्या दानवाला मारल्याशिवाय मी परत येणार नाही असें त्यांना सांगितले. मी त्याला व त्याच्या जादूई सोनेरी रथाचा नाश करूनच मग येईन. असें आश्वासन दिल्यावर ते सावरले व मला बोलले, आम्ही द्वारकेचे संरक्षण करू तुम्ही परत येण्याची वाट पहात रहाणार आहोत. ते मला उत्तेजन देण्यासाठी सांगतात, जा आणि त्या दानवाचा नाश करून या. अशारितीने त्या सर्वांच्या शुभेच्छा घेऊन मी निघालो. तेथे असलेले ब्राह्मण वेदातील ऋचा गाऊन मला उत्तेजन देत होते. माझ्या रथाला माझे खास अश्व शैव आणि सुग्रीव लावलेले होते. माझ्या रथाच्या चाकांचा आवाज व माझे पंचजन्य ह्याचा शंखनाद ह्याने सगळे आकाश दणाणून निघाले होते. माझ्या बरोबर माझे खास विश्वासाचे चारदळी सैन्य सुद्धा निघाले. अशा पूर्ण तयारीनिशी मी सल्वाला गाठण्यासाठी देशोदेश पार करत जात होतो. अनेक प्रदेश, पर्वत, नद्या, झरे, वनं असें जे कांहीं वाटेत येत होते ते पार करत मी माझ्या सैन्यानिशी सल्वावर चाल करून जात होतो. शेवटी सल्वाच्या मर्तिकावर्त स्थानी पोहोचलो. तेथे पोहोचल्यावर मला समजले कीं, तो त्याचा मायावी सोनेरी रथाने

समुद्रातील बेटाकडे गेला आहे. ते समजल्यावर मी त्याच्या मागे तेथे जाण्याचे ठरवले. तो तेथे त्या बेटात होता व त्याच्या चौफेर पाण्याच्या प्रचंड लाटा उसळत होत्या. त्यांनी मला दूरूनच पाहिले. अरे युधिष्ठीरा, तेथून तो नीचात्मा मला आव्हान देत होता. मी माझे दूर पल्ल्याचे बाण फेकले परंतु, तेसुद्धा त्याच्या पर्यंत पोहोचू शकले नाहीत. ते पाहून तो दानव मला आणखीनच चिडवू लागला. त्यामुळें मी चिडलो. त्यानंतर तो दैत्य कुळातील दानव ज्याची शक्ति अफाट होती माझ्यावर त्याच्या बाणांचा पाऊस पाडू लागला. एकाद्या वादळा सारखे ते होते. त्यांने त्याच्या बाणांनी वर्षाव करून माझ्या चारदळी सैन्यास जेरीस आणले. त्यात माझे घोडे, माझा सारथी सर्वांना त्याने झोडपले. त्यानंतर त्याचे सैनिक सुद्धा आमच्यावर त्यांच्या बाणांचा वर्षाव करू लागले. ते पाहून मी माझ्या दैवी सामर्थ्याने त्याच्या मायावी हल्ल्याला चोख उत्तर दिले. परंतु, तो रथ आकाशात साधारणपणे दहा हजार हात इतक्या उंचावर होता, आमचे बाण तेथ वर पोहोचर नव्हते. त्या कारणांने माझे सैनिक कांही करू शकत नव्हते फक्त बघ्याची भूमिका करत राहिले. त्यात ते टाळ्या वाजवून व जोरजोरांने ओरडून मला प्रोत्साहन देण्याचे तेवढे करत होते. माझे रंगवलेले छोटे बाण मात्र त्यांच्या जरा खालच्या पातळीवर असलेल्या दानव सैन्यातील लढवय्याना लागत होते, त्याच्यामुळें किटक चावल्यासारखे त्यांना भासत होते. त्यामुळें ते घायाळ होऊन खाली पडत होते. माझ्या बाणातील विषामुळें ते दानव बोहोष होत होते व कांहीं मरत होते. मरून ते दानव त्या गरजणार्या समुद्राच्या प्रचंड लाटांवर पडत व नंतर बुडून जात होते. पाण्यात पडलेले दानव समुद्रातील मांसे खाऊन टाकत होते. त्यानंतर मी माझे पंचजन्य शंखू वाजवायला सुरुवात केली. सल्व पहात होता किं, त्याचे सैन्य पाण्यात पडत आहेत व त्यातील मांसे त्यांना खात आहेत, ते पहाताच सल्व त्याच्या भ्रमदृष्य उत्पन्न करण्याच्या मोहीनी विद्येचा उपयोग करू लागला. त्यानंतर तो आमच्यावर गदा आणि नांगराचे फाळ फेकण्यास प्रारंभ करतो. पंखधारी शर (छोटे बाण, शलाक) तो आता वापरू लागतो. त्याच प्रमाणे तो लांब पल्याचे भाले, दुधारी उडत्या समशेरी, पेटते गोळे, उडत्या कुर्हाडी, सुरुंगीबाण असें सगळे फेकू लागतो. हि एकतर्फी मारा असलेली लढाई होती कारण, अरे युधिष्ठीरा, आम्ही कांहीं करूच शकत नव्हतो कारण ते दानव खूप उंचावर आकाशात तरंगत आमच्यावर त्यांच्या आयुधांनी मारा करत होते. माझ्या लक्षात

आले कीं, त्यात भ्रमदृष्य आहेत म्हणजे प्रत्यक्ष ते कांहींच फेकत नव्हते पण आम्हाला वाटत होते किं, ते फार मोठा मारा करून राहीले आहेत. ते लक्षात आल्यावर मीसुद्धा माझी दैवी भ्रमदृष्ये उत्पन्न करण्याला सुरुवात केली. त्यामुळें त्याची भ्रमदृष्ये विफल झाली. ते समजल्यावर तो वेगळी भ्रमदृष्ये वापरू लागला. त्यात भर दिवसा रात्रीसारखा अंधार असल्याचे वाटू लागले व माझे योद्धे त्यामुळें बावचळून गेले. माझ्या सैनिकांना एकदम थंड व मध्येच अतिशय उष्ण झाल्या सारखे भासू लागले व त्यांचा तोल जाऊ लागला. त्यांच्या अंगावर जळत्या कोळश्याचा वर्षाव झाल्यासारखे त्यांना भासू लागले व त्यामुळें ते त्या पासून बचाव करण्यासाठी इकडे तिकडे धावू लागले. कोणाला काय होत आहे त्याचा अंदाज करणे अशक्य झाले होते. मध्येच धुके पडल्या सारखे झाल्यामुळें ते काय करावे ते न समजल्यामुळें अस्वस्थ होत होते. त्याच वेळी दानवांचा मारा होतच होता. ती एक असमान लढाई होत होती म्हणजे साधारणपणे जेव्हां दोनही पक्ष त्यांच्या जाणीवेबाबत सारखेच असतात तेव्हां ती समान लढाई असते व जेव्हां एक पक्ष भ्रमात अडकलेला व दुसरा भ्रमाशिवाय असें असते तेव्हां त्याला असमान लढाई समजले जाते. अशाप्रकारे माझ्याशी तो सल्व लढत होता. अशी लढाई लढणे व त्यात जिंकणे अरे युधिष्ठीरा सोपे नसते. शत्रूपक्षाने कोणते भ्रम उत्पन्न केले आहेत ते समजणे सोपे नव्हते. परिणामतः मी त्याचे सगळी भ्रमदृष्ये माझ्या विद्येच्या जोरावर नाकाम केली. मी त्याचा वरील आकाशात असंख्य सूर्य असल्याचा व त्यातून भयंकर उष्णता येत असल्याचा भ्रम त्याच्या वर व त्याच्या दानव सैन्यावर केला. त्यामुळें ते बेचैन झाले. त्यांना लढता येई ना, त्याचा फायदा घेऊन माझ्या सैनिकांनी त्याच्यावर हल्ला केला व त्यात बरेच जण मारून टाकले. तो व त्याची सेना बावचळलेली आहे हे समजल्यावर मी माझे ठेवणीतील अस्त्र, प्रगनास्त्र काढले. त्याच्यामुळें त्यांचा संहार असा झाला किं, त्यांच्या मृत देहांचा ढीग लागला. अशारितीने आमची लढाई चालू राहिली.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा विसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकवीसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वासुदेव सांगत असतो, माझा मोठा वैरी सल्व अशारितीने मला त्या युद्धात भेटला. तो पुन्हा आकाशात गेला आणि जिंकण्याच्या अभिलाषेने तो माझ्यावर शतघ्नीनी मारा करतो. त्याशिवाय गदांचा वर्षाव करतो. जळत्या मशाली व सोटे माझ्या दिशेने भिरकावत रहातो. त्यात उडत्या तलवारी सुद्धा होत्या. जसे ते सगळे माझ्याकडे येत मी माझ्याकडील बाणांनी त्यांना तोडून, त्याच्या दिशा बदलत असें व ते इतरत्र जाऊन पडत होते. त्याच सुमारास आकाशातून मोठे आवाज येऊ लागतात. कारण सल्वाने माझा सारथी, दारुक व माझे घोडे ह्यांना असंख्य बाणांनी घेरले होते. त्यामुळें दारुक बेहोष होण्या आधी मला बोलतो, "ह्या बाणांच्या वर्षावाने मी बधीर होत आहे म्हणून मी रथ फिरवतो. कारण अशा परिस्थितीत ते माझे कर्तव्य ठरते. परंतु, मी तसे करू शकत नाही. माझे शरीर बधीर होत आहे", ते त्याचे बोलणे ऐकून मी त्याच्याकडे पाहिले. तो सगळ्या शरीरात बाण घुसल्यामुळें प्रचंड जखमी झाला होता. त्या जखमांतून वहाणार्या रक्तामुळें तो लाल रंगाच्या खडू सारखा भासत होता. ती माझ्या सारथ्याची अवस्था पाहून सल्व मोठ्या आनंदाने ओरडत होता. अरे युधिष्ठीरा त्याच वेळी एक द्वारकेतील परिचित इसम माझ्याकडे लगबगीने आला व मला म्हणाला किं, "आपल्याला अहुकांचा संदेश आहे. तो सांगतो कीं, आपल्या गैरहजेरीत सल्व द्वारकेला त्याचा मोठा फौजफाटा घेऊन आला व त्यांने आपल्या पित्याचा वसुदेवांचा खून केला आहे. म्हणून येथे आता लढण्यात कांहीं अर्थ उरलेला नाही. तुझी जास्त गरज आहे तेथे अनारत्तात म्हणून आपण त्वरित मागे फिरावे". ते ऐकून माझे हृदयाचे ठोके जणू थांबले. मी त्या वार्ताने बधीर झालो. मला समजे नां मी नेमके काय करावे ते. मी क्षणभर माझ्या सहकार्यांना दोषसुद्धा दिला, त्यात माझा सत्यकी, बलराम आणि तेजस्वी प्रद्युम्न ज्यांच्यावर मी द्वारकेची जबाबदारी टाकली होती ते होते. मग मी ठरवले आता सल्वाच्या नगराचा नाश करूनच त्याचे उट्टे निघेल. माझ्या मनात त्या संदर्भातील विविध विचार येत होते. असें वाटत होते जर माझा बाप मेला असेल तर त्या आधी सल्वाने बलराम, सत्यकी आणि प्रद्युम्न ह्यांना मारले असावे कारण, जर ते असतील तर कोणीही माझ्या पित्याला हात लावू शकत नाही. अशा

विचारात मी असतांना पहातो किं, सल्व माझ्या दिशेने झपाट्याने येत आहे. त्याचवेळी मी माझे तात वसुदेव आकाशातून एकादा मेलेला पक्षी पडावा, ज्याचे पंख पसरलेले आहेत, तसें माझ्या दिशेने खाली येतांना दिसत होते. मी समजलो कीं मी हरलो आहे, त्याच वेळी सल्व मोठ्याने हसत ओरडत माझ्या दिशेने येत होता आणि अचानक मला जाणवले कीं, तो द्वारकेतून आलेला इसम व त्याने दिलेली वार्ता माझ्या पित्याच्या हत्त्येची हे सगळे मायावी होते. कारण जर सल्व येथे माझ्याशी लढत आहे तर तो द्वारकेला कसा असणार? क्षणभर मला सल्वाच्या मायावी भ्रमदृष्टीने फसवले होते खरे, पण मी ताबडतोब स्वताला सावरले. त्यानंतर मी पुन्हा माझ्या भात्यातील बाण त्याला मारण्यास सुरुवात केली.

अशारीतीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाची एकवीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग बाविसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वासुदेव पुढे सांगत असतो, त्या भ्रमातून बाहेर आल्यावर मी माझे धनुष्य शारंग घेऊन त्या स्वर्गीय दानवांची डोकी उडवण्याचा सपाटा लावला. तो त्याच्या मौल्यवान सुवर्णाच्या रथातून एकदाचा पडला. ते पाहिल्यावर मी माझ्या भात्यात असलेले सुंदर बाण जे विविध मंत्राने प्रभावित होते, त्यांच्यावर टाकण्यास सुरुवात केली. त्यात कांहीं सापाच्या मंत्राने प्रभावित होते, कांहीं इतर प्रकारचे होते, ते सगळें उंचावरील गोष्टींना खाली पाडू शकत होते. ते होत असतांना मी सल्वाचा रथ शोधत राहिलो कारण, तो त्या रणधुमाळीत कोठे गायब झाला होता. त्यांने, सल्वाने पुन्हा माझ्यावर त्याच्या भ्रमविद्येचा प्रयोग केला होता. मला भलते सलतेच दिसू लागले होते. त्या दानवाची मोहीनी विद्या कमालीची प्रभावी ठरली होती. माझ्या कांनात कानठळ्या ऐकू येऊ लागल्या, माझ्या समोर घाबरवणारी दृष्ये उभी होत होती. त्या परिस्थितीत मी माझ्या शत्रूचा नाश करण्याचा निर्धार कायम केला. सल्वाला ठार मारण्याची क्षमता असलेला बाण मी माझ्या शारंगावर लावला. ते ओरडणारे सगळे दानव माझ्या बाणांनी मारले गेले व त्याचे ओरडणे थांबले. मी त्या आवाजांच्या दिशेने बाण मारत होतो व माझा नेम चुकत नव्हता. ते मरत तेव्हां त्याची किंकाळी ऐकू येई. अशारितीने ते बहुतेक सगळे मेले. त्यांच्या त्या किंकाळ्याने तो आसमंत दणाणून गेला होता. जे आकाशात फिरत होते ते व जे अदृश्य होते असें सगळे मारले गेले. माझे बाण मंत्राने प्रभावित होते म्हणून ते शक्य झाले. त्यानंतर तो मायावी रथ मला दिसू लागला. तो रथ प्रागज्योतिष कडे जात होता. अचानक माझ्या अंगावर मोठाले दगड येऊन पडू लागले. ते पडणारे दगड इतके होते किं, त्यांच्या खाली मी गाडला गेलो. त्यात माझा रथ, त्याचा ध्वज, सारथी असे सगळे गाडले गेले होते. मी त्या ठिकाणातून पुरता दिसेनासा झालो. असें झाल्यामुळें माझ्या बरोबर असलेले वृश्नी योद्धे गांगरून गेले. ते काय करावे ते न समजल्यामुळें सैरावैरा पळू लागले. त्यावेळी आकाशातून अरेरे, हाय रे, अशी वाणी ऐकू आली. माझे साथीदार रडू लागले त्यांना वाटले मी संपलो! दुसर्या बाजूला आमच्या विरुद्ध असलेले खूष झालेले दिसत होते. ते ओरडून सांगत होते, त्यांनी मला मारले आहे. मी इंद्राचे वज्र वापरावयाचे ठरवले आणि त्या सगळ्या दगडांचा चुराडा

केला. परंतु, माझे घोडे त्या दाबांने मरणाचे दाबले गेले होते. त्यामुळें ते थरथरत होते. मला त्या राशींतून बाहेर आलेले पाहून माझे लोक आनंदी झाले. जसें आकाशात सूर्य ढगांतून बाहेर येतो तसा मी त्या दगडांच्या ढिगार्यातून बाहेर आलो होतो. माझे घोडे शेवटच्च्या घटका मोजत होते. त्यावेळी माझ्या सारथ्याने मला सावध करण्यासाठी दाखवले कीं, सल्व लांबून त्याच्या सोनेरी रथात बसून माझ्याकडे पहात होता. दारुक मला सांगतो, त्याला कमी समजू नकोस. तुम्ही आता आपली सहनशिलता सोडून द्या व त्याचा नाश करा नाहीतर चुकीची सुचना दिल्यासारखे होईल. आता त्याच्याशी खेळणे बंद करावे. सल्वाचा वध करून टाका. त्याच्या जगण्याने लोकांचा देवावरील विश्वास कमी होईल. तो तुमचा शत्रू आहे म्हणून त्याचा नाश करणे जरुरीचे झाले आहे. शत्रू कितीही लहान असला तरी त्याला फार काळ खेळवत ठेवणे श्रेयस्कर नसते. आता समय व्यर्थ घालवू नका. हा असा शत्रू आहे जो सामान्य प्रकारे मारता येणार नाही. तो जो द्वारका बरबाद करण्याचा प्रयत्न करतो त्याला जीवंत ठेवणे जगाच्या हिताचे नाही. माझ्या सारथ्याचे विचार रास्त होते. म्हणून मी आता त्याला जास्त काळ जीवंत ठेवणे चुकीचे होईल हे पटल्यामुळें माझे सर्वनाशक सुदर्शन चक्र काढले. त्यापुढे कोणीही टिकाव धरू शकत नाही. मग ते कोणीही असोत, असुर, यक्ष, राक्षस, दैत्य, दानव कोणीही त्याच्यापुढे तग धरू शकत नाहीत. पापाचा नाश करण्यासाठी हे देवाचे अंतिम शस्त्र आहे. ते कृष्णाने सोडले तसे ते आकाशात उंच वर गेले. तेथे ते सूर्यासारखे चमकत होते. युगांत आला आहे असें क्षणभर वाटले. ते सौभाच्या नगरावर गेले. आणि वेगांने ते त्या नगरात घुसले. ते शहर नष्ट झाले होते. ते माझ्याकडे परत आले तेव्हां मी ते पुन्हा सल्वावर सोडले. त्याच वेळी तो दानव माझ्यावर एक गदा फेकण्याच्या तयारीत होता. परंतु, त्या आधीच माझ्या सुदर्शन चक्राने त्याचा बळी घेतला होता. त्याच्या दुःखी झालेल्या बायका सैरावैरा पळू लागल्या. त्यानंतर मी माझा रथ त्या ठिकाणी सौभनगरीत नेला व माझा शंखू जोराने वाजवला. त्यामुळें माझे मित्र आनंदीत झाले. तेथे सगळे जळून गेले होते. एके काळची सुंगर नगरी आता राखेचा ढीग झाली होती. मेरू पर्वताच्या शिखरावर वसलेली ती नगरी पूर्णपणे नष्ट झाली होती. अशारितीने दानवांच्या राजाचा, सल्वाचा पराभव केल्यावर मी अनारत्त कडे निघालो. त्यामुळें मी हस्तिनापुरात तुम्हाला मदत करण्यास येऊ शकलो

नाही. मी जर आलो असतो तर तो दुर्योधन ठार झाला असता व तो द्युत खेळला गेला नसता. मी आता काय करणार? धरण फुटण्या आधी तरतुद करावयाची असते, एकदा ते फुटले कीं कांहीं करता येत नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, अशा रितीने पांडवांशी बोलल्यानंतर तो सर्वशक्तिमान मधूचा वध करणारा कृष्ण द्वारकेला जाण्यासाठी निघतो. त्यासाठी तो युधिष्ठीराला नमस्कार करतो. त्यानंतर तो भिमाला मिठी मारून निरोप घेतो. त्यानंतर तशीच अर्जुनाला मिठी मारून निरोप घेतो. त्यानंतर तसेंच दोघा धाकट्यांना भेटतो. त्याच प्रमाणे कृष्ण नंतर धौम्य ऋषींना वंदन करतो. त्यांचासुद्धा निरोप घेतो. साश्रू नयनांने तो द्रौपदीचा निरोप घेतो. त्या वेळी भिम न राहून कृष्णाला एक प्रश्न विचारतो, भिम बोलतो, "अरे जनार्दना, मला सांग जर तू सल्वाच्या वधासाठी तेथे अडकला होतास मग त्याचवेळी येथे द्रौपदीवर जो अन्याय दुःशासन करत होता त्यापासून तू तिला नवनवीन वस्त्रे नेसवून वाचवलेस ते कसें"?

वैशंपायन सांगतात कीं, ते ऐकल्यावर तो विश्वाचा धनी स्मित हास्य करत ऋषी धौम्यांकडे पहातो व त्यांची परवानगी घेऊन भिमाला सांगतो, "अरे वृकोदरा, तो भ्रम तुमच्या राजगुरूनी माझ्यावतीने केला होता. त्यात जी वस्त्रं दिसत होती व जी तो नराधम दुःशासन द्रौपदीच्या देहावरून ओढत होता ती सगळी भ्रमदृष्य होती. प्रत्यक्षात तसें कांहींच होत नव्हते. समस्त सभागृह त्या मायावी रचनेत अडकलेले होते. द्रौपदी तेथे तिचे मुख तिच्या हातांच्या ओंजळीत लपवून उभी होती परंतु, तिच्या वस्त्राला कोणीही हात लावू शकत नव्हता. त्या साड्या व तो दुःशासन त्या भ्रमात अडकलेले होते तसेंच ते वस्त्रहरण त्या भ्रामात अडकल्यामुळें द्रौपदी तेथे सुखरुप होती". ते समजल्यानंतर ते सगळे पांडव आणि द्रौपदी धौम्यांना त्रिवार वंदन करून त्यांचे आभार मानतात.

त्यानंतर तो सुभद्रा व अभिमन्युना त्याच्या रथात चढावयाला सांगतो. कृष्ण त्याच्या बहिणीला व तिच्या मुलाला आपल्या बरोबर द्वारकेला घेऊन जाण्याचे ठरवतो. अशारितीने त्यांची जाण्याची तयारी होते. त्याच्या नंतर दृष्टद्युम्न सुद्धा जाण्यास निघतो. तो प्रथम द्रौपदीला त्याच्या बरोबर निघावे असा आग्रह करतो परंतु, ती सांगते किं, तिला त्या पांडवासह वनवासात रहाण्याची इच्छा आहे. मग तो त्याच्या बरोबर द्रौपदीची पांचही मुलं घेतो. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असतो. वनात ते होणार नाही म्हणून तो त्यांना घेऊन जातो.

त्याच प्रमाणे, छेड्डीचा राजा धृष्टकेतु त्याच्या बहिणाला घेऊन त्याच्या ठिकाणी सुक्तमतिला निघतो. त्यानंतर कैकेय सुद्धा निघण्यासाठी पांडवांची परवानगी मागतात. आता फक्त ते पांडव त्या कम्यक वनात रहातात. तेथे त्यांच्या बरोबर असलेले ब्राह्मण ते पहात असतात. ब्राह्मणाना परत घेऊन जाण्यासाठी रथ तयार करण्यासाठी आज्ञा देतात.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा बाविसावा भाग संपला.

# वनपर्व भाग तेविसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत असतात, दशर्हाचे प्रमुख गेल्यानंतर युधिष्ठीर, भिम आणि अर्जुन आणि नकुल व सहदेव रथात चढले वनात जाण्यासाठी. त्यांच्या बरोबर ते ब्राह्मणसुद्धा चढतात. त्या रथाला उत्तम जातीचे दमदार घोडे खेचत असतात. अशा रितीने ते सगळे आता वनात शिरतात. वनात जाण्यासाठी निघण्या आधी ते तेथे असलेल्या ब्राह्मणांना सोन्याची नाणी, कापडे, गुरंढोरं दान करतात. आपली शस्त्रे घेऊन ते महाबली पांडव त्यांच्या निजी सेवकांसह वनात जातात. द्रौपदीसाठी वेगळा रथ होता त्यात तिच्या सह धौम्य ऋषी होते. असें ते त्यांच्या रथाच्या ताफ्यासह त्या वनात जातात. त्यांचा रथाचा ताफा वनात शिरण्या आधी तेथील कुरुजंगलाचे निवासी त्यांच्या भोवती जमा होतात व मोठ्या प्रेमभावांनी त्यांना तीन प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर तेथे असलेले ब्राह्मण त्यांना शुभेच्छा देतात. "तुमचा प्रवास व वनवास निर्विघ्न हो", असा आशिर्वाद ते सगळे देतात. त्यावेळी पांडवांचा मुख्य थोडावेळ त्या जमलेल्या लोकांकडे पहात रहातो. त्याला त्यांच्या बद्दल वाटत असलेली प्रेमाची भावना त्यातून व्यक्त होत होती. त्या त्याच्या वागण्यामुळें भावूक झालेले ते कुरुजंगलाचे लोक ओरडून सांगतात किं, तो त्यांचा राजा आहे व प्रसंग येईल तेव्हां ते त्याच्या बरोबर असतील. ते सगळे क्रूर कौरवांचा धिक्कार करतात. ते सुवलाचा आणि कर्णाचा सुद्धा धिक्कार करतात. ते प्रजाजन बोलत असतात किं, तुमच्या सारख्या गुणी राजाशी असें करून त्या लोकांनी प्रजेचा विश्वास घालवला आहे. ते प्रजाजन पांडवांना विचारतात, अहो तुम्ही इंद्रप्रस्थ स्थापन केले ते सोडून असें कसे वनात जाता? तो मायासुरांने घडवलेला वाडा आता कोण वापरणार? त्यांचे संरक्षक राक्षस कौरवांना त्यात शिरू देतील कां? तुमच्या अशारितीने जाण्यामुळें कौरवांचे नांव किर्ती आणखीनच खराब झाली आहे. पुढे तो अर्जुन बोलतो, "ब्राह्मणांनो, आमच्यासाठी तेथील वैराग्यांकडे दुवा मागा ज्यामुळें आमचा हा वनवास सुखरुप होईल. त्यानंतर पांडव त्या पवित्र ब्राह्मणांना प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर ते सगळे प्रजाजन व ब्राह्मण आपापल्या निवासी निघून जातात.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा तेविसावा भाग संपला.

# वनपर्व भाग चोविसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, त्या दाट जंगलात आल्यानंतर युधिष्ठीर आपल्या भांवांना बोलतो कीं, "आता आपल्याला अशा वनात बारा वर्षे रहावयाचे आहे, तेव्हां आपल्या पोटा पाण्याचा प्रश्न आपल्याला त्या प्रमाणे सोडवावा लागणार आहे. त्यासाठी खाण्यासाठी पक्षी, सांबरं, हरणं, रानडुकरं तसेंच कंदमुळं, फळ असें सगळे जमा करावे सागणार आहे. त्याच प्रमाणे अशी जागा निवडावी लागेल जी रहाण्यासाठी सुंदर, प्रशस्थ, हवेशीर आणि सुरक्षित असेल. जेथे पुण्यवान लोकांची वस्ती आहे. अशी शुभलक्षणं असलेली जागा जेथे आपल्याला आपले नित्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडता येतील". युधिष्ठीराचे बोलणे ऐकल्यावर त्याला वंदन करून तो बोलतो, "तू बर्याच महान ऋषींच्या सहवासात त्यांची सेवा केली आहेस. त्यामुळें तुला त्या बाबतीची सगळी माहिती असणार, त्यात कृष्ण द्वैपायन, नारद असे आहेत, ज्यांना देवांपासून ब्रह्मापर्यंतचा रस्ता माहित आहे. त्यात गंधर्वांकडे अप्सराकडे जाणारा मार्गसुद्धा त्याना ज्ञात असणार. त्या बद्दलचे ब्राह्मणांचे काय मत आहे तेसुद्धा तुला माहित असणार. त्या प्रत्येकाची हिम्मत किती असते, त्यांच्या पासून आपल्याला कसा फायदा होऊ शकतो त्याचासुद्धा विचार तुला करता येईल. त्यामुळें आपण कोठे रहाणे उचित आहे ते तू जास्त चांगले ठरवू शकतोस. येथे पवित्र जल असलेला तलाव आहे ज्याचे नांव आहे द्वैतवन. त्यावर असंख्य कमळं आहेत व त्यांचे दृष्य प्रेक्षणीय आहे. आपण येथे बारा वर्षे रहावे कां"?

वैशंपायन सांगतात, अर्जुनाचे ते ऐकून युधिष्ठीर व त्याच्या बरोबर सोबत असलेले ब्राह्मण तेथे त्या तलावाकडे जातात. त्याच्या बरोबर असलेल्या ब्रह्मणांत कांहीं यज्ञ करणारे असतात, कांहीं अग्निहोत्र सांभाळणारे असतात, कांहीं वेदाचे पठण करणारे असतात, कांहीं भिक्षा मागून त्यावर रहाणारे असतात, त्यांना वानप्रस्थी असें म्हणून ओळखले जात होते. त्याशिवाय त्याच्या सोबतीला पुष्कळ संन्यासी महात्मे होते. ते सगळे तो तलाव पहाण्यासाठी निघाले. ते त्या तलावाकडील वनात ज्याला द्वैतवन म्हणून ओळखले जात होते त्यात शिरतात. राजा पहातो किं, त्या वनात उंच वाढलेले साल वृक्ष आहेत. माड, ताड त्यांच्या विविध प्रजाती तेथे दाटीवाटीने वाढत होत्या. त्याशिवाय आंबा, मोह, कदंब,

लिंबू, शिरसा, अर्जुन, कर्णिक, असें वृक्ष दाटीवाटीने वाढलेले होते. त्यावर मोर, चकोर, कोकीळ, चिमण्या असें पक्षी होते. झाडे फळाफुलांनी डवरलेली होती. त्यांचे चिवचिवाटाने आसमंत प्रसन्न झाला होता. ते पक्षी त्या झाडांच्या उंच वाढलेल्या फांद्यांवर बसून त्यांचे गाणे गात होते, जणूकाय ते वेदातील साम गात आहेत. ते पहातात किं, त्याच्या थोड्या अंतरावरून भोगवती नदी वहात असते त्या नदीच्या तटांवर प्रचंड आकाराचे गज आपल्या सोंडी हलवत डुलत इकडे तिकडे असें फिरत होते. तेथे भरपूर गवत होते त्यात ते बुडून जात होते. तेथे बरेच संन्यासी आपली तपस्या करण्यात मग्न होते. त्यांच्या अंगावर वल्कल (झाडांच्या सालीचे वस्त्र) नेसले होते, त्यांच्या केसाच्या जटा झाल्या होत्या. पांडव त्यांच्या रथातून उतरून वनातील जमिनीवरून चालू लागले. ते तेथे इंद्रासारखे दिसत होते. ते आल्यामुळें तेथे वस्ती करणारे चरण आणि सिद्ध त्या राजाला पहाण्यासाठी त्यांच्याजवळ जातात. पांडवांच्या भोवती ते गराडा घालून  उभे रहतात. पांडव त्या सर्व योग्यांना लवून नमस्कार करतात. ते चरण आणि सिद्ध पुरुष पांडवांना धन्यवाद देतात. अशारितीने त्यांच्यात पहिला परिचय चांगला होतो. त्यानंतर तो राजा तेथे असलेल्या मोठ्या वृक्षाच्या पायथ्याशी तो बसतो. जसें त्याची पिता करत असें. त्यानंतर पांडवांबरोबर आलेले ते सगळे थकल्यामुळें त्या वृक्षाभोवती जमिनीवर खाली बसतात. त्या अवाढव्य वृक्षाखाली ते सगळे पांडव पांच हत्ती बसले आहेत असें वाटत होते.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा चौविसावा भाग संपला.

# वनपर्व भाग पंचविसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, दुःखाच्या तणावाखाली असलेल्या त्या पांचांना त्याठिकाणी थोडा आराम मिळाला होता. त्या जागी रहाण्याचे ते ठरवतात. त्यानंतर ते पांच पांडव तेथील मुनी व संन्याशी ह्यांच्याशी मैत्री वाढवण्यास सुरुवात करतात. तेथे असलेल्या संन्याशांना ते त्यांच्या बरोबर आणलेली फळं व कंदमुळं भेट देतात. त्यांचे राजगुरू धौम्य तेथे यज्ञ करण्यास सुरुवात करतात. अशारितीने ते पांडव तेथे आपले बस्तान पक्के करतात. धौम्य तेथे इश्ती, पैत्रेय यज्ञ पांडवासाठी करतीत. त्यात तेथील वैराग्यपूर्ण अशा चरणांना ते अर्घ्य वाहतात. तेथे ते राज्य घालवलेले राजे रहात असतांना एके दिवशी त्यांच्याकडे एक महान ऋषी ज्याचे नांव मार्कंडेय आणि ज्यांचे तपोसामर्थ्य विलक्षण आहे असें, अतिथी म्हणून येतात. युधिष्ठीर त्यांचे स्वागत करतो. तो सर्वज्ञानी योगी त्यांनी दिलेले अर्घ्य स्वीकारतो व तो द्रौपदीला त्यांच्यात पहातो. त्या वनातील बैराग्यात ते बसलेले तो पहातो व त्याच्या चेहर्यावर एक स्मित उमटते कारण, त्याला प्राचीन काळी राम लक्ष्मण आणि सीता जसें रहात होते त्याची आठवण येते. मार्कंडेय ऋषीना युधिष्ठीर बोलतात, अहो मुनी, हे सगळे येथे असलेले संन्याशी माझी ही अवस्था पाहून खेद व्यक्त करतात परंतु, तुम्ही मात्र स्मित करता त्याचे कारण काय"? मार्कंडेय त्याला सांगतात, मलासुद्धा तुमची ही अवस्था पाहून दुःख झाले आहे, माझे हे स्मित तुच्छतेचे नाही, परंतु, मला प्राचीन काळी होऊन गेलेल्या दशरथ कुळातील रामाची आठवण आली कारण, तो सुद्धा असाच त्याची पत्नी व भाऊ ह्यांच्या बरोबर त्याच्या पित्याच्या आज्ञेने वनवास भोगत होता. त्याला मी त्या काळातील ऋषीमुख पर्वताच्या शिखरावर फिरतानाची आठवण आली म्हणून मला त्या रामाबद्दल स्मित आले, तुम्हाला नाही हसलो. मुला, राम साक्षात इंद्र होता. साक्षात यमाचा अवतार ज्यांने नमुचीचा वध केला, असे असूनही त्या निष्पाप राजालासुद्धा वनवास भोगावा लागला होता. जेव्हां तुमच्यासारखे अवतारी पुरुष असें हालाखीच्या परिस्थितीत दैवामुळें फेकले जाता तेव्हां त्याचे कारण असते कीं, विधात्याला तुमच्याकडून कांहीं विशिष्ट कार्य करून घ्यावयाचे आहे. अरें कुंतीपुत्रा तुम्ही पृथ्वीवर कांहीं मजा करण्यासाठी पाठवलेले नाहीत. तुम्हाला कांहीं कर्तव्य दिले आहे ते तुम्ही कसे

करता त्यावर तुमचे दैवी भवितव्य निर्भर करत असते. सुखोपभोग घेण्यासाठी स्वर्ग असतो तुमच्या सारख्या दैवी लोकांसाठी, त्यासाठी कोणी पृथ्वीवरील भोग घेत नाही. पृथ्वी तुमच्यासाठी कर्तव्य भूमी असते. त्यात सुख दुःख पहावयाचे नसते. मी पहातो तुम्ही सगळेच दैवी पुरुष अहात व तुमची पत्नीसुद्धा तशीच आहे व म्हणून मी तुमची रामाशी तुलना केली. पृथ्वीवर सामान्य माणूस सुखोपभोगाचा विचार करतो ते त्याच्यासाठी योग्य असते. तुला माहीत आहे कां, मोठे राजे जसें राजा नभंग, भगिरथ हे सगळे जग जिंकल्यावर ते सोडून विरक्त होऊन रानावनात फिरत होते. ते मूर्ख नव्हते. त्यात जे शहाणपण आहे ते सामान्याला कधीच उमगत नाही. काशीचा राजा तसांच सर्वसंग परित्याग करून जंगलात गेला त्याबद्दल कांहीं अज्ञानी बोलतात कीं तो वेडा होता.
तुला माहीत आहेत ते सात ऋषी, ज्यांना ब्रह्माने उत्पन्न केले ते कधीही असें समजले नाहीत किं, ते सर्वशक्तिमान आहेत. असें समजणे कीं, मी सर्व शक्तिमान आहे हेंच अज्ञान आहे. जो तो त्याचे त्याचे काम करण्यासाठी पाठवलेला आहे. जो हे अंतिम सत्य ओळखून जगतो तो ब्रह्माला पसंत असतो व तोंच अखेरीस तरतो. तुमचा नम्रपणा हींच तुमची शक्ती असते. कारण, त्यामुळें तुम्ही अनेक त्रासातून मुक्त होता. जरी आज तुम्हाला त्रास होत असला तरी तुमच्या कडून जे कार्य विधात्याला करून घ्यावयाचे आहे ते झाले कीं, पुन्हा तुम्ही कौरवांना मारून तुमचे अधिराज्य स्थापन करणार अहात. तुमचे पुण्य तुमच्या बरोबर रहाणार व ते तुम्हाला अशा परिस्थितीत तारणार आहे. जो पुण्य घालवून पृथ्वीवरील धनदौलत मिळवतो तो अखेरीस लयाला जातो. कौरव तेंच करत आहेत, त्यांना थोडे सुख मिळणार परंतु, अंती सर्वनाश होणार आहे. ब्रह्माला तुमच्या कडून कोणते कार्य करून घ्यावचाचे आहे ते त्याला करू द्या म्हणजे तुमचा उत्कर्ष निश्चित आहे. त्या सृष्टीच्या कर्त्याला मदत करणे हे पुण्यवंतांचे कर्तव्य असते. असें सांगून तो महान मुनी मार्कंडेय, धौम्यांना भेटतो व त्यांना अभिवादन करतो. त्यानंतर वरील प्रमाणे आशिर्वाद देऊन तो ऋषी उत्तरेच्या दिशेने निघून जातो.
अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा पंचविसावा भाग संपला.

# वनपर्व भाग सव्विसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, पांडवाच्या आगमनामुळें त्या द्वैतवनाला आगळे वेगळे रुप प्राप्त झाले. तेथे लांबून लांबून योगी, ऋषी, ब्राह्मण येऊन युधिष्ठीरा बरोबर राहू लागले. त्यांना तो नितीमान राजा दान करून त्याचा आदर करत असें त्यासाठी त्याचा काका विदूर वेळोवेळी इंद्रप्रस्थातून धन, दौलत वगैरे आणून देत असें. त्यामुळें त्या वनात खर्या साधकांची मोठी वस्ती वाढत होती. तेथे वेदांचे वाचन, पठण सदैव सुरु झाले. अनेक प्रकारचे यज्ञ होऊ लागले. त्यामुळें तो परिसर दुसरे ब्रह्मक्षेत्र झाले होते. युधिष्ठीरीच्या भोवती सदैव ब्राह्मणांचा व भेटावयाला येणार्या मुनी, ऋषींचा गराडा पडलेला असें. यजुर्वेदातील यजू, ऋग्वेदातील ऋचा आणि सामवेदातील साम ह्यांचे पठण तेथे नित्य होत होते. त्या ध्वनींमुळें तो परिसर प्रसंन्न झाला होता. त्याचवेळी पांडव त्याच्या शस्त्रांचा नित्य सराव करत होते. अशामुळें तेथे वेदांचे शब्द आणि धनुष्याचे टणत्कार असें दोनही ऐकू येत होते. जणू काय ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांचे सुंदर मिलन झाले आहे. ते विशेष उचित होते कारण बरेच ब्राह्मण सुरुवातीला जन्माने क्षत्रिय होते. अनेक व्रतस्थ साधक त्यात होते. एक प्रकारचे ते एक गुरुकूल झाले होते. सर्वप्रकारचे शास्त्र ज्ञानी तेथे नेहमीच उपस्थित असतं. तेथे विविध विषयावर चर्चा होत असतं. भृगुचे वंशज, अंगिरसाचे वंशज, वसिष्ठ, काश्यप आणि अगस्त्य ह्यांचे वारस त्या द्वैतवनात द्वैत सरोवराच्या किनार्यावर नेहमी येऊ लागले होते. व्रतस्थांची, सत्त्वशिलांची तेथे मांदियाळी होती. वैशंपायन बोलतात, ऐक कुरु कुळाच्या राजा, असें नेहमी समजतात कीं, जेव्हां ब्राह्मण आणि क्षत्रिय सलोख्याने एकत्र येऊन कांही काम करतात तेव्हां जी उर्जा उत्पन्न होते, त्यापुढे कोणतीही शक्ति टिकाव धरू शकत नाही. असा संयोग झाल्यास ते जग जिंकू शकतात. राजाला शत्रूचा नाश करावयाचा असेल तर त्यासाठी ब्राह्मणाची परवानगी घ्यावी लागते तो योग तेथे जुळून आला होता. राजा बळी ह्याचप्रकारे राज्य चालवत होता म्हणून तो मोक्षाप्रत गेला. असुर विरोचनाचा मुलगा वली ह्याच मार्गाने संमृद्ध झाला. परंतु, जेव्हां तो ब्राह्मणाशी छलकपट करू लागला तेव्हां त्याचा नाश झाला. त्यासाठी दोघेही सत्त्वशिल व व्रतस्थ असले पाहिजेत. द्वैतवनात तो योग जुळून आला होता कारण पांडव सत्त्वशिल आणि व्रतस्थ होते.

जो क्षत्रिय सच्च्या (सत्त्वशिल व व्रतस्थ) ब्राह्मणाची साथ ठेवत नाही तो कधीही बरकत करत नाही. ज्या ब्राह्मणाला सच्च्या क्षत्रियाची साथ नाही तो सुद्धा संपन्न होत नाही. जसें क्षत्रियाला जर सच्च्या ब्राह्मणाची साथ नसेल तर तो क्षत्रिय सम्राट होऊ शकत नाही. ब्राह्मणाची प्रज्ञा आणि क्षत्रियाचे शौर्य असें दोनही यशस्वी राज्यासाठी आवश्यक असते. प्रज्ञा आणि शौर्य एकमेकांना पुरक असतात. फक्त एकच असेल तर ते यशस्वी राज्यासाठी पुरेसे नसते. त्यासाठी अरे युधिष्ठीरा, सदैव गुणी प्रज्ञावान ब्राह्मणांची साथ ठेव असें धौम्य पांडवांना सांगतात. अरे युधिष्ठीरा तू न तुझी माता नेहमी ब्राह्मणांचा आदर करता म्हणून तुम्ही तेजस्वी झाला अहात.

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीरा बरोबर जे ब्राह्मण होते ते दल्व्य कुळातील वकाचे स्वागत करतात. कारण तो राजा युधिष्ठीरीची प्रशंसा करतो. त्याशिवाय द्वैपायन, नारद, जमदाग्न्य, पृथुश्रवस, इंद्रद्युम्न, भलाकी, कृतचेत, सहस्त्रपाद, कर्णश्रवस, मुंज, लवनस्व, काश्यप, हरीत, स्थुलकर्ण, अग्नीवेष, शौनक, कृतवक, सुवक, बृहद्वस, विभावसु, उर्धरेत, वृषमित्र, सुहोत्र, होत्रवाहन, असें सगळे ब्राह्मण कुळांतील तेथे जमले होते ते युधिष्ठीराचे सदैव कौतुक करत असतं. जसें स्वर्गात पुरंदराचे होत असे.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा सव्विसावा भाग संपला.

# वनपर्व भाग सत्ताविसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, असेंच एकदा, सगळी कुंतीची मुलं द्रौपदीसह एकत्र बसून आपल्या बदललेल्या भाग्याबद्दल बोलत, गप्पा मारत असतात. त्यावेळी द्रौपदी युधिष्ठीराला बोलते, "तो नीच क्रुरात्मा दुर्योधन आपल्या ह्या परिस्थितीला कारणीभूत असला तरी त्याला त्याचे कांहींच वाईट वाटत नसेल. आम्हाला जंगलात फेकून स्वतः त्याच्या मित्रांसह मजा करत असेल नाही! असें वागण्यासाठी दगडाचे काळींज असले पाहिजे त्याचे. त्याच्या सत्त्वशिल मोठ्या भावाशी त्याचा घोर अपमान करणारी भाषा बोलून त्याला व त्याच्या भावांना आणि पत्नीला असें वनवासात सोडण्यासाठी किती भयंकर दुष्ट हृदय असले पाहिजे त्याचे ह्याची मी साधी कल्पना करू शकत नाही". मला ते सहन होत नाही कीं आम्ही कांहीं दोष नसतांना अशी शिक्षा भोगत आहोत, जे वस्तुतः राज्यभोग घेण्यासाठी जन्मलेले आहेत. जेव्हां आपण वनवासात निघालो तेव्हां सगळे लोक अश्रू ढाळत होते ते मी अनुभवले आहे पण ते पांच दुर्योधन, दुःशसन, कर्ण आणि शकुनी आणि त्यांचे इतर बंधू मिस्किलपणे हसत होते. मला त्या गोष्टी सतत आठवतात व मी त्यामुळें सतत बेचैन असते. आपण वैभवात वाढलात, मला तुमचे हस्तिदंताचे राजासन आठवते. किती रुबाबात आपण सगळे रहात होतो त्याच्या स्मरणाने मी अस्वस्थ होते. आरामशीर गाद्यावर लोळणारी मी आज त्यांच्यामुळें कुस गवतावर झोपत आहे. मला कधी कधी त्यामुळें नीटपणे धड झोपसुद्धा येत नाही. तुम्हाला मी त्या वैभवात राजसभेत बसलेले पाहिले आहे, तुमच्या आजूबाजूला सगळे मुत्सद्दी आहेत व तुमची राज्याकारभाराची खलबतं होत आहेत ते मला सारखे आठवते. आणि येथे त्या वनात वृक्षाखाली तुम्ही त्या ब्राह्मणांसह बिनकामाची तत्त्व चर्चा करत आहेत ज्याला कांहीं वास्तविक अर्थ नसतो. अशा स्थितीत मी कशी स्वस्थ होणार? तुम्हाला दागिन्याने सजलेले व चंदनाच्या गंधाने सुगंधी झालेले पहाण्याची मला सवय आहे त्या ऐवजी आज मी तुम्हाला असें उघडे मातीने मळलेले फक्त हरणाच्या कातड्यात दगडाच्या आसनावर बसलेले पहावे लागत आहे. मला माझ्यापेक्षा तुम्हा पांचांबद्दल जास्त वाईट वाटत आहे. हे असें बारा वर्षे मी कसे सहन करणार? आपण संन्यासी नसतांना असें कां जगावे लागत आहे? मी तुम्हाला विविध

रंगाच्या रेशमी झग्यात पाहिले आहे, ते झगे मींच तुमच्यासाठी शिवून घेत असें, ते सगळे कोठे गेले? आता तुम्ही चिंध्या घालून बसत अहात, आपल्या राज्यात जे जेवण आपले दास, आश्रित खात त्यापेक्षा खराब खाद्य आज आपण खात आहोत. ती विविध पक्वान्ने कोठे गेली"? तुम्ही सगळ्यांना आग्रह करून जेवावयाला घालत असायचे आज आपल्याकडे कोणी बघतसुद्धा नाही. ह्या सगळ्यांमुळें माझी शांती नष्ट झाली आहे. तुमच्या भावांसाठी ते खास स्वयंपाकी चांगले चुंगले सुवासिक चविष्ट विविध खाद्य पदार्थ खायला घालत व मी ते कौतुकांने पहात असे. आज त्यांच्या ताटात कच्चे शिजलेले मांस व शाक मी पहाते कारण शिजवण्याची व्यवस्थासुद्धा येथे नाही. मला विशेष चिंता वाटते ती भिमसेनाची. त्यांचा आहार किती आहे ते तुम्ही जाणता आज ते बिचारे काय खातात"? असें कसें चालेल फार काळ ते मला समजत नाही. माझा भाऊ मला बोलला होता जेव्हां तो आपली मुलं घेऊन पांचालकडे गेला, तो बोलला होता किं, मीसुद्धा त्याच्या बरोबर तेथे यावे कारण मी असें जीवन जगू शकणार नाही. परंतु, मी गेले नाही कारण, मला पहावयाचे आहे किं तुम्ही असे कसे जगत अहात? मला एवढा राग येतो परंतु, तुम्हाला कसें राग येत नाही. त्याने, भिमसेनाने मला सांगितले होते किं, जर तुम्ही परवानगी दिली तर कांहीं क्षणात आम्ही चौघे त्या सगळ्या कौरवांची खाडोळी करून टाकू, पण तुम्ही त्याला परवानगी देत नाही. कां असें तुम्ही वागता"? भिमसेन, अर्जुन, नकुल आणि माझे धाकटे प्रिय सहदेव त्यांच्या वैभवात मी पाहिले आहेत व आता त्याना मी पहाते ते जंगलात मातीत झोपलेले! हे असें मी कसे सहन करावयाचे व कां? असें भिकार्या सारखे रहाण्याने तुम्हाला वाटते कां तुम्ही स्वर्गात जाल? क्षत्रियांसाठी स्वर्गात जाण्यासाठी हा मार्ग सांगितलेला नाही हे मी जाणते! मला सांगा असें कोणते दिव्य तुम्ही साध्य करणार अहात असें लाजिरवाणे जीवन जगून"? हा अर्जुन दोन हात असले तरी अनेक हात असल्यासारखा तिरंदाजी करत असतो. तो त्याच्या शत्रूंसाठी साक्षात यम वाटतो. त्याच्या ह्या सामर्थ्यामुळें पृथ्वीतील सगळे राजे तुझ्या यज्ञात ब्राह्मणांना दानं देत होते. त्यात तुझे कोणते कर्तृत्व होते? त्याच्या सामर्थ्यापुढे सगळी दैवी आणि आसुरी शक्ति नतमस्तक होऊन उभी रहाते एवढे सामर्थ्य तुझ्या हाताशी असतांना त्या फडतूस कौरवांपुढे तू कां नमतोस, तुला संताप कसा होत नाही"? तुझ्या ह्या नकर्तेपणामुळें मला फार त्रास होत

आहे. तू जर त्यांच्यावर संतापलास तर ते कापरासारखे जळून नष्ट होतील पण तुला राग येत नाही, हे काय आहे, तुझा कमकुवतपणा कीं तुझा सात्त्विकपणा हेंच समजत नाही. तू कोणाला भिऊन असें वागत आहेस असें संभवत नाही, मग हे तुझे वागणे माझ्या समजण्याच्या पलिकडले झाले आहे. मख्खासारखा काय असा ह्या वनात बसला आहेस? उठ कांहींतरी कर व कौरवांना तुझी भिती वाटेल असे कर. तुझ्या मूर्खपणामुळे तो माझा सुंदर नवरा कसा गुपचुप ह्या व्यर्थ जंगलात फिरत आहे. त्याच्या सगळ्या शक्ति तुझ्या मूर्खपणामुळें निरुपयोगी झाल्या आहेत. हे मी कसे सहन करू? तुम्ही त्या कौरवांना अशा कोणत्या कारणानी माफ करत अहात, दान व क्षमा नेहमी सत्पात्र करावयाचे असते असें शास्त्र सांगते, ते आणखीन सांगते कीं, जर दान आणि क्षमा अपात्र झाले तर त्यामुळें जगात पाप वाढते, म्हणून तुमचे कौरवांना जे हे क्षमा करण्याचे धोरण आहे ते जगात पाप वाढवण्यास कारणीभूत होईल व त्याचे पाप तुमच्याच माथी लागेल ह्याचा कधी तू विचार केला आहेस कां? तुझ्या ह्या वागण्यामुळें माता माद्रीचा आत्मा काय म्हणत असेल त्याचा एकदा तरी तू विचार कोला आहेस कां? नकुल व सहदेव तुझे सख्खे भाऊ नाहीत म्हणून त्यांच्या बद्दलची तुझी जबाबदारी विशेष आहे, त्या करतां तुझ्या ह्या वागण्यामुळें त्यांच्या मुळ हक्कावर तू गदा आणतोस हे तुझ्या कसें लक्षात येत नाही. त्यांना दुःखात टाकण्याचा अधिकार तुला कोणी दिला? मी द्रुपदाची कन्या, पंडुची स्नुषा म्हणून माझे जे हक्क आहेत त्याची तू पायमल्ली करत आहेस त्याचे काय समर्थन तुझ्याकडे आहे"? मी समजते कीं, तुला क्रोध नाही परंतु, प्रत्येक वेळी कांहीं प्रतिक्रिया देण्यासाठी क्रोध दोष उत्पन्न झाला पाहिजे असें नसते, बर्याच प्रसंगी कांही उद्देश साध्य करण्यासाठी क्रोधाचे सोंग घ्यावयाचे असते जसें दामोदर करतो. तुला तसे क्रोधाचे सोंगसुद्धा घेता येत नाही कीं, खरोखरच तू तामसी आहेस हेंच मला समजत नाही. पुष्कळ वेळा तमोतामसी (तमोगुणा पेक्षा जास्त तामसी) माणसें सात्त्विक भासतात. तुझे तसेंतर नाही कां अशी शंका माझ्या मनात आता येत आहे. कारण असें लोक सात्त्विक म्हणून समजले जातात, आता मला तशी शंका तुझ्या बाबत येत आहे. कारण कोणताही साधारण माणूस इतका मख्ख असूच शकत नाही. तुझे जे समर्थन तुझे बंधू करतात कीं तू धृतराष्ट्राला वचन बद्ध आहेस कीं, द्युतात हरल्यास तू वनवासात जाशिल परंतु तू आणखीन कांहीं वचनं दिली

आहेत जसे मला, तुझ्या आईला, तुझ्या भावांना किं तू त्यांना सुखी व सुरक्षित आयुष्य देशिल. मला सांग तुझ्या कोणत्या वचनाचे जास्त महत्व आहे"?

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा सत्ताविसावा भाग संपला.

# वनपर्व भाग अठ्ठाविसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

द्रौपदी पुढे बोलत असते, युधिष्ठीराला, माझे मुद्दे स्पष्ट करण्यासाठी मी तुम्हाला प्राचीन काळी झालेल्या प्रल्हाद आणि वलीमधील संभाषणाकडे लक्ष वेधू इच्छिते. एक दिवस वली, विरोचनाचा मुलगा त्याच्या आजोबाला, जो असुरांचा व दानवांचा राजा होता, आणि त्याच्या ज्ञानाबद्दल सर्वश्रुत होता, विचारतो, "अहो महाराज, मला सांगा, माफी करणे जास्त चांगले कां योग्य कारणासाठी शासन करणे"? "मला समजत नाही, माझा गोंधळ झाला आहे तरी तुम्ही तुमचे मत काय ते सांगावे. आपण अशा विषयात पारंगत अहात म्हणून मी तुम्हाला हे विचारत आहे. आपण जे सांगाल ते मी आचरणात आणीन". असे वलीचे ऐकल्यावर त्याचे आजोबा, प्रह्लाद त्या प्रश्नाला एक सविस्तर उत्तर देतात,

"मुला, ऐक, ही दोन कशी समजावयाची ते प्रथम लक्षात घे, शिक्षा करणे हे नेहमीच योग्य नसते व माफी करणेसुद्धा तसेंच सदैव योग्य नसते. अपात्र माफी केल्यामुळे फार मोठ्या नुकसानीला तोंड द्यावे लागल्याची उदाहरणे विपुल आहेत. अशा माफीमुळें कर्त्याचे महत्व कमी होत असते. कारण ज्याला माफी केली तो जाणत असतो किं तो त्या योग्य आहे कां नाही! जर तो अपात्र असेल व त्याला माफी मिळाली, तर माफ करणार्याबद्दल त्याच्या (माफ झालेला) मनात तुच्छतेची भावना उत्पन्न होत असते. त्याचा तो मनातल्या मनात अपमान करत असतो. जे माफीचे तेंच शिक्षेबाबतचे असते. म्हणून ह्या दोनही करतांना राजाला विचार करावा लागेल की, तो खरोखरच माफी योग्य अथवा शिक्षा योग्य आहे कां नाही. अपात्र माफीमुळें तो पुन्हा ती चुक करण्यास धजावतो व राज्याचे न्याय व्यवस्था बिघडू शकते. म्हणून सूज्ञ ह्या दोनही करतांना पूर्ण विवेकांने निर्णय घेतात. सत्पात्र माफी केल्याने असें होत नाही. तसे पहाता, कोणीही मग तो अपात्र असो अगर सत्पात्र असों नेहमी माफीची अपेक्षाच करत असतो. म्हणून त्याच्या माफीच्या आर्जवाला शहाणा राजा महत्व देत नाही. अपात्र माफीमुळें समाजात पाप कर्म वाढते. माफी फक्त अनवधानाने होणार्या कृत्याला देण्याचे दंडक आहेत. जो जाणून बुजून असें कृत्य करतो त्याला माफ करणे पाप वाढवण्यासारखे असते व त्याचे पातक त्या अपात्र माफ करणार्या राजाच्या माथी लागते. लहान चुकीला माफ केले जे अपात्र आहे तर तो पुढच्या वेळी आणखीन

मोठी चुक करण्यास धजावतो. अशारितीने अपात्र माफी केल्याने राज्यात अराजक माजू शकते म्हणून अपात्र माफी वर्ज्य आहे. जे माफी बाबत तेंच शिक्षेबाबतसुद्धा लागू होते. म्हणजे असें, अपात्र शिक्षा दिली तर त्यामुळें तो माणूस राजापासून दुरावतो व त्या बरोबर इतर प्रजाजन जे ते अन्याय कारक कृत्य राजाने केल्यामुळें राजापासून दूर होतात. म्हणून अपात्र शिक्षा करणे राजाच्या इभ्रतीला नामुष्कीचे ठरते, राजा अन्याय करणारा आहे असें सगळा समाज मानू लागतो व अशा परिस्थितीत तो राजा यथावकाश नष्ट होतो. ज्या राजाला त्याच्या प्रजेचा विश्वास सांभाळता येत नाही तो राजा जबरदस्तीने राज्य फारकाळ करू शकत नाही. सत्पात्र शिक्षा झाली तर तसें होत नाही. अपात्र माफी होत असेल तर त्या राज्यातून अराजक माजू लागते, लोकांना न्यायाची भिती रहात नाही. अशा परिस्थितीत वाईट माणसे (तमोगुणी) आणखीन वाईट होतात व कांहीं वेळा रजोगुणी माणसें तमोगुणी होण्याची भिती असते. अपात्र माफी करणार्या राजाला कोणीही चांगला राजा म्हणत नाहीत तर त्याला नालायक राजा असें समजतात. म्हणून माफी करण्या आधी राजाने फार विचार केला पाहिजे. तसेंच अपात्र शिक्षा करण्याने सुद्धा राजा अन्यायी ठरतो. तशा घटना होण्याने राज्यात अशांतता व असमाधान वाढते व राजाची किंमत रहात नाही. अशा राजाला कोणीही सन्मानाने पहात नाही. अपात्र माफी करणार्या राजाला कोणी चांगला राजा समजत नाहीत, त्याला मूर्ख राजा समजतात. म्हणून जेथे शिक्षा आवश्यक आहे तेथे शिक्षा झालीच पाहिजे व जेथे माफी होणे सगळ्यांच्या हिताचे आहे तेथे माफी झालीच पाहिजे. दोनही गोष्टी राजाच्या विवेकाची परीक्षा घेत असतात. राजा किती चांगला ते तो किती सुबुद्ध आहे त्यावर अवलंबून असते.

अरे विरोचनाच्या मुला, ऐक जर राजा नेहमीच शिक्षा करत असेल जेथे माफीची आवश्यकता आहे तो राजा अज्ञानी व म्हणून अयोग्य ठरतो. न्याय देणे हे राजाचे एक प्रमुख कार्य असते. त्यात चोख असण्यासाठी माफी व शिक्षा ह्यांचे योग्य मुल्यमापन त्याला करता यावे लागते. चूक अथवा गुन्हा कसा झाला ते महत्वाचे असते. त्याचे प्रमाण सुद्धा महत्वाचे असते. चुकीच्या व गुन्ह्याच्या प्रमाणात माफी अथवा शिक्षा राजा ठरवतो. ते चांगल्या बुद्धीचे काम आहे. म्हणजे चूक मोठी अशी कीं तिला गुन्हा म्हणावे तर त्या प्रमाणे ती जाणून बुजून त्रास देण्यासाठी केली आहे कां अनवधानाने, अज्ञानाने,

हलगर्जीपणामुळे, दुसर्यावर अवलंबून राहिल्यामुळें, प्रयोगशिलतेमुळें, पाप बुद्धीने, बेपर्वाईमुळें हे सगळे पहावे लागते. त्याप्रमाणे दिलेल्या दंडकानुसार माफ अथवा शिक्षा कोणती ते राजा ठरवतो. हे काम बुद्धीचे, दूरदृष्टीचे, संयमाचे, तटस्थ वृत्तीचे असावे लागते. राजा जेव्हां योग्य निर्णय घेतो व माफ करतो जे योग्य आहे तेव्हां न्याय दिला असें प्रजा समजते. अपात्र शिक्षा देण्याने राजा छुपे शत्रू उत्पन्न करत असतो. त्याचे घातक परिणाम तो नंतर भोगतो. त्यात तो नष्ट होतो. ह्यात, विरोचनाच्या मुलां, मर्यादा तत्त्व महत्वाचे असते. दोनही गोष्टी माफी व शिक्षा योग्य त्या प्रमाणात असाव्या लागतात. लहान चुकीसाठी मोठी शिक्षा अथवा मोठ्या चुकीला कमी शिक्षा देण्याने अन्याय होतो म्हणून राजाला माफी व शिक्षा त्या त्या प्रमाणात देणे अगत्याचे असते. योग्य प्रमाणात माफी व योग्य प्रमाणात शिक्षा करणे हे राजाच्या कुशलतेचे द्योतक असते. अन्याय दोनही बाबतीत होत असतो, माफी असो अगर शिक्षा असो. अपात्र माफी व अपात्र शिक्षा दोनही राजाचे नांव बदनाम करू शकतात. त्याच प्रमाणें, सत्पात्र माफी व सत्पात्र शिक्षा करणारा राजा त्याच्या राज्यात व इतरत्रसुद्धा नावाजला जातो. आता मी सांगतो केव्हा माफी करावी. जे शास्त्रात सांगितले आहे ते सांगतो, त्यांचे पालन चांगला राजा करतो. जर एकाद्याने राजाला नेहमीच मदत केली आहे तर अशा माणसाच्या चुकांकडे काणाडोळा करणे (माफ करणे) श्रेयस्कर समजले जाते. म्हणजे नेहमी योग्य करणारा कधी काळी चुक करतो तर ते क्षम्य समजले जाते. जे अनवधानाने, अज्ञानाने, प्रयोगशिलतेमुळें चुका करतात त्यांना माफ करावयाचे असते एकदाच फक्त. जर जाणून बुजून त्रास देण्यासाठी, हलगर्जीपणामुळे, दुसर्यावर अवलंबून राहिल्यामुळें, पाप बुद्धीने, बेपर्वाईमुळें गुन्हा, चूक झाली असेल तर त्या त्या प्रमाणात शिक्षाच करावी लागते. ह्यावरून केव्हा माफ करावयाचे व केव्हां शिक्षा करावयाची ह्यांचे निश्चित नियम आहेत, त्याचे पालन करावयाचे असते. ह्या विपरीत जर राजा न्याय करेल तर तो अन्याय होऊ शकतो. म्हणजे कृती मागील मानसिकता येथे महत्वाची आहे हे, वली लक्षात घे. शहाणा राजा तो, जो ती मानसिकता बरोबर ओळखून न्याय देईल. आता शिक्षेच्या प्रमाणबद्धतेचे पहा, जाणून बुजून त्रास देण्यासाठी, हलगर्जीपणामुळे, पाप बुद्धीने, बेपर्वाईमुळें गुन्हा झाला असेल तर त्याला जबरी शिक्षा करावी कारण, अशा प्रवृत्ती समाजाला घातक असतात व त्यांची वाढ होणे

समाजाला परवडणारे नसते. अशांना जबरी शिक्षा दिल्याने समाजात बेशिस्ती कमी होते व शिस्तबद्धता सुधारते. अशा शिक्षा प्रजेत राजाबद्दल आदर उत्पन्न करतात. कारण प्रत्येक माणसांत जी सद्सद्विवेक बुद्धी स्वाभाविकपणे कार्यरत असते ती काय योग्य व काय अयोग्य ह्यांचे अंदाज दाखवत असते. राजाचे निर्णय त्याशी जुळणे महत्वाचे असते. त्याशिवाय काळ, वेळ, प्रसंग ह्यांचे भान ठेवून कांहीं निर्णय घ्यावे लागतात जेव्हां येथे दिलेले ठोकताळे बाजूला करावे लागतात. अशा घटना जरी कमी असल्यातरी राजकारणात व व्यवहारात असे अपवादात्मक प्रसंग उत्पन्न होतात. तेव्हां ते अपवादात्मक माफीचे अथवा शिक्षेचे निर्णय घ्यावे लागतात.

असें सांगून पुढे द्रौपदी युधिष्ठीराला सांगते, "ह्या नियमांप्रमाणे राजाने न्याय केला पाहिजे. कौरवानी जे कारस्थान केले ते जाणून बुजून त्रास देण्यासाठी, पाप बुद्धीने अशा सदरातील आहे म्हणून जबरी शिक्षेस योग्य आहे व माफीच्या योग्यतेचे अजिबात नाही हे लक्षात घेऊन कांहीं कारवाई करण्यास तयार व्हावे. मी माझे मनचे सांगत नाही तर न्याय शास्त्राचा निवाडा सांगून हे बोलत आहे म्हणून त्याला माझी बाईल बुद्धी असें समजून धूत्कारू नका". त्यात काळ वेळ प्रसंग पहाण्यास सांगितले आहे त्याप्रमाणे, कौरवांवर चाल करणे त्यांना शिक्षा करण्यासाठी हींच वेळ आहे असें मला वाटते.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा अठ्ठाविसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकोणतिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

ते ऐकल्यावर युधिष्ठीर द्रौपदीला सांगतात, "राग माणसाचा मोठा शत्रू आहे. त्याच प्रमाणे, त्यातून समृद्धीसुद्धा प्राप्त होऊ शकते. तुझे ज्ञान पाहून मी संतुष्ट झालो. क्रोधाचे नियमन आणि वितरण कसे करावे ह्यात त्यापासून विनाश होणार कां समृद्धी होणार ते ठरत असते. असें सांगतात, जो त्याच्या रागांवर नियंत्रण ठेवतो त्याला समृद्धी प्राप्त होते. असें दिसून आले आहे किं, क्रोधामुळें सगळ्या प्राणी जगाचा नाश संभवतो. असें माहीत असतांना माझ्या सारखा माणूस रागाला वाढवेल"? क्रोधी माणूस पाप कृत्य करण्यास प्रवृत्त होतो. रागाच्या भरात स्वताच्या पित्याचा खून करणारे आपण पहातो. रागाच्या भरात माणूस त्याच्या वरिष्ठाना अपमानीत करतो. क्रोधी त्याचा विवेक हरवून बसतो. रागात माणूस अनेक प्रकारची दुष्कृत्य करून बसतो. रागात कधी कोणी आत्मघातसुद्धा करत असतो. म्हणून शहाण्याने प्रथम स्वताचा क्रोध आवरावयाचे भान ठेवले पाहिजे. म्हणून योगी रागमुक्त असतात. त्यांना क्रोध होत नाही. म्हणून आपण प्रथम राग आवरून शांत चित्ताने विचार करावयास शिकले पाहिजे. माझ्यावर रागावणार्यावर, सुद्धा मला राग येत नाही. जर कोणी कमजोर माणूस त्याच्यावर अन्याय करणार्यावर चिडला तर प्रसंगी त्याचाच नाश संभवतो. म्हणून द्रौपदी हे लक्षात ठेव की, कमजोरांनी नेहमी त्याच्या रागांवर काबू ठेवावा. शहाणा माणूस ज्याच्यावर अन्याय झाला आहे तरी रागवत नाही तो सद्गतीला जातो मृत्यू नंतर. म्हणून असें समजतात कीं, शहाणा माणूस त्याच्यावर अन्याय करणार्याला माफ करत असेल तर तो अखेरीस जिंकतो. द्रौपदी, मी ह्या जगाचा विचार करत नाही, मी नंतरच्या जगाचा जेथे आपल्याला मृत्यूनंतर जावयाचे आहे त्याचाच जास्त विचार करत असतो. माझे सगळे निर्णय त्या दृष्टीने तू पहा, तुला माझे पटू लागेल. पुण्यवान लोक समजतात, जो प्रामाणिक आहे व क्षमाशिल आहे तो अखेरीस जिंकतो. मला ते यश अभिप्रेत आहे. जरा मला समजून घे. सत्य असत्यापेक्षा जास्त मोलाचे असते. प्रेमळ वागणे कठोर वागण्यापेक्षा जास्त श्रेयस्कर असते. दुर्योधनाला मारण्यासाठी मला क्रोधाची मदत घेणे अयोग्य वाटते. क्रोधात अनेक दोष असतात. त्यासाठी पुण्यवंत त्याचा आधार घेणे अयोग्य समजतात. ज्ञानी नेहमी सांगतात, खरे शहाणे न रागावता

क्रोधाचे नाटक करत आपली कामं करत असतात. ते जरी बाहेरून रागावलेले वाटत असले तरी ते अंतर्यामी शांत असतात जसे आपल्या दामोदराचे असते. रागावलेला इसम घटनांचे व्यवस्थित परिशीलन करू शकत नाही. रागाच्या भरात तो ज्यांना घात करू नये त्यांचासुद्धा नाश करत असतो. म्हणून असें सांगतात किं, जो खरोखर शक्तिमान आहे तो प्रथम त्याच्या क्रोधावर नियंत्रण ठेवेल. कारण. रागावलेला इसम विवेक करू शकत नाही. त्याच्या मनात आणि बुद्धीत अविचार थैमान घालत रहातात. त्याचे निर्णय भावनिक असतात व द्रौपदी तुला मी सांगू इच्छितो कीं, सगळे भावनिक निर्णय अंती अपयशास कारणीभूत असतात. निर्णय योग्य घेण्यासाठी माणसाचे मन व बुद्धी सुस्थितीत असावी लागते. चांगले निर्णय जे चिरकाल आनंद देणारे असतात ते घेण्यासाठी जे गुण असावे लागतात, दयाळूपणा, सन्मान, धैर्य, कसब, दूरदृष्टी, संयम चांगले असावे लागतात. न रागावता शांत चित्ताने काम करण्याने अंती चांगले काम होत असते. अज्ञानी माणसें क्रोधाला सामर्थ्य समजतात. वस्तुतः तसे नसते. क्रोध ही नकारात्मक प्रतिक्रीया असते. चांगले कार्य करण्यासाठी क्रोधाची आवश्यकता नसते. जर मी हे जाणतो तर क्रोधात कसा अडकेन"? जर क्षमाशिल माणसे नसतील तर पृथ्वीत सगळा राग व त्याच्या प्रतिक्रीयांचे साम्राज्य झाले असते. जशास तसे असें धोरण अमलात आणले तर सगळे फक्त नष्टच होणार! एक अपशब्द बोलतो म्हणून प्रतिक्रीया तशीच दिली तर त्या पुढे कांहींच होणार नाही. असेंच करत गेले सगळे तर काय जीवन होईल त्याचा विचार कर, द्रौपदी. म्हणून जेथे क्षमाशिलता आहे तेथे समृद्धी होते. पृथ्वी पहा कशी क्षमाशिल आहे. म्हणून सगळे प्राणी निवांतपणे तिच्यावर जगत आहेत. म्हणून क्षमाशिलतेला मर्यादा नसाव्या असें माझे मत आहे. असें समजतात कारण कीं, माणूस क्षमाशिल आहे पृथ्वीवर प्राणीमात्र जगत आहेत. जो इसम त्याचा उपमर्द झाला, त्याला न्याय नाही मिळाला तरी क्षमाशिल रहातो त्याला इतरत्र खूप सुखाचे क्षण उपलब्ध होत असतात. म्हणून जो चिडतो त्याला मूर्ख समजले जाते. त्याला ह्या आणि नंतरच्या जगात फक्त दुःख अनुभवावे लागते असें समजतात. काश्यपानी सदैव क्षमाशिल असणार्या माणसाबद्दल काय सांगितले आहे ते तुला सांगतो. काश्यप बोलतात,

"क्षमाशिलता हा पुण्याचा मार्ग आहे, क्षमाशिलता हा एक प्रकारचा यज्ञ समजावा, क्षमाशिलतेत ज्ञान आहे, क्षमाशिलता ब्रह्माचे लक्षण आहे. क्षमाशिलतेत सत्य आहे, क्षमाशिलतेत बैराग्याची सुरुवात होते, क्षमाशिलतेत भविष्य आहे, क्षमाशिलतेत पावित्र्य आहे, अशा क्षमाशिलतेमुळेंच ही सृष्टी चालत असते. क्षमा करणार्याला त्याच्या मृत्यूनंतर अनेक यज्ञ केल्यासारखे पुण्य प्राप्त होते. क्षमा करणारे त्यांच्या मृत्यूनंतर ब्रह्माच्या ठिकाणी जातात. दे जग क्षमाशिल लोकांमुळे आहे व त्यांच्यामुळेंच राहील. क्रोधावर मात करण्यासाठी क्षमाशिलता वाढवावी. त्यामुळें ह्या व नंतरच्या जगात तो क्षमाशिल अनंतकाळ सुखात रहातो".

अशी क्षमाशिलतेची ख्याति आहे असें युधिष्ठीर द्रौपदीला सांगतो. म्हणून तू क्रोधीत होऊ नकोस. समाधानी रहा त्यानेंच आपले ह्या आणि नंतरच्या जगात भले होईल. त्यामुळे आपल्या पुर्वजांचे सुद्धा भले होईल. तू पहात रहा लवकरच सगळे शांतीचा पाठ सांगू लागतील. हस्तिनापुरातील सगळे द्रोण, कृप, विदूर, संजय, सोमदत्त, युयुत्सू, अश्वत्थामा, आपले आजोबा व्यास सगळे शांतीच्याच गोष्टी करत असतात, तेथे क्रोधाला वाव नाही. त्यामुळें धृतराष्ट्र आपले राज्य आपल्याला देईल व सगळे चांगले होईल त्यासाठी त्यांच्यावर रागावण्याची आवश्यकता नाही. परंतु जर तसे नाही झाले, तर मात्र त्याला त्याच्या क्रोधाची किंमत त्याच्या नाशाने द्यावी लागेल. आपण न रागावता विवेकांने त्यांच्या क्रोधाला उत्तर देऊ. अहो महाराणी भरत वंशाच्या इतिहासात असें बरेच कष्टाचे प्रसंग उद्भवले होते. मला माहित आहे कीं, दुर्योधनाची तेवढी योग्यता नाही कीं, तो ह्या राज्याचा स्वामी होईल. म्हणून मी त्याला त्याच्या सगळ्या कुकर्मासाठी माफी दिली आहे. स्वानंदात रमलेले माझ्या सारखे लोक क्षमाशिलता व सहनशिलता हे चांगले गुण म्हणून अजमावतात. ते राग, सूड, तिरस्कार अशा तामसी प्रवृत्तीत रमू शकत नाहीत. काळ सगळे व्यवस्थित करेल त्याबद्दल तू माझी राणी, निश्चिंत रहावे असें समजतो.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा एकोणतिसावा भाग संपला.

# वनपर्व भाग तिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

ते युधिष्ठीराचे प्रवचन ऐकल्यावर द्रौपदी त्याला सांगते, "मला एक समजले हे तुमचे प्रवचन ऐकल्यावर की, धात्री आणि विधात्री अशा दोघींनी तुमची बुद्धी भ्रष्ट केली आहे. मी आणखीन एक समजले कीं, तुमचे विचार तुमच्या वडीलांच्या व आजोबांच्या विचारांपेक्षा खूप भिन्न आहेत. निरनिराळ्या परिस्थिती माणूस त्याप्रमाणे, आपले वर्तन ठेवत असतो. त्यामुळें जे घडते ते अनिवार्य असते. त्या अनिवार्य प्रसंगांना सामोरी न जाणे हे केवळ मूर्खपणाचे ठरते. ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, केवळ पुण्यकर्माने हित होईल असें नाही. त्याच प्रमाणे, इतर चांगले समजलेले गुण जसे, दयाळूपणा, क्षमाशिलता, साधेपणा, भिती हे नेहमीच माणसाचा उत्कर्ष करण्यात उपयोगी ठरत नाहीत. कारण जर हे चांगले समजलेले गुण चुकीच्या स्थितीत आचरणात आले तर त्यामुळे पाप आणि दुष्कर्म वृद्धिंगत होत असते. त्यासाठी प्रह्लादाने वलीला मार्गदर्शन करतांना वेळोवेळी अपात्र व सत्पात्र असा उल्लेख आवर्जून केला होता. कारण, कोणताही चांगला गुण अपात्र ठिकाणी अमलात आणला तर तो गुण वाईट परिणाम देऊ शकतो. त्याचप्रमाणे मर्यादा तत्त्वाचे पालन होणे ह्या सगळ्या चांगल्या गुणांच्या आचरण्यात अमलांत आणणे तितकेच महत्वाचे असते. जेव्हां ह्या सगळ्या संबंधित घटकांचा विचार करून त्याप्रमाणे आपण वागतो तेव्हांच ते हितकारक ठरते. आपण ह्या प्रह्लादाच्या सुचनांची दखल न घेता जे ठरवले ते अपात्र दानासारखे दोषपूर्ण होते व म्हणून आज आपण ह्या संकटात सांपडलो आहोत. असें सांगतात, वीष नेहमीच वीष नसते, ते जर योग्य प्रमाणात योग्य वेळी घेतले तर ते अमृतासारखे हितकारक असते. त्या प्रमाणे, ह्या सगळ्या गुणांचे आहे. त्याच प्रमाणे, तत्त्वज्ञानात जे सदोष गुण दाखवले जातात ते सर्वच परिस्थितीत सदोष नसतात, ते योग्य वेळी व योग्य प्रमाणात निर्दोष ठरतात. त्याची दखल घेण्यासाठी जी तारतम्य बुद्धी वापरावयाची ती तुम्ही लक्षात न घेता काल्पनिक गोष्टींत अडकलेले अहात. जसें कोणताही दोष सदैव दोष नसतो तसेंच कोणताही सद्गुण नेहमीच सद्गुण ठरत नाही. म्हणजे गुणांचे स्वरुप दुर्गुण कां सद्गुण हे परिस्थितीवर विसंबून असते. त्याच्या सापेक्षतेची दखल घेऊनच निर्णय घ्यावयाचे असतात. तुम्ही तसे करत नाही म्हणून मी म्हणाले की,

तुमच्यावर अज्ञानाचे सावट पडलेले आहे. तुम्ही सांगता तुमच्या राज्यात केवळ पुण्य असेल, तेथे केवळ ब्राह्मण असतील, आणि दैवी व्यक्ती असतील, मग त्यात तुम्ही भिम, अर्जुन व नकुल आणि सहदेव व मी असें आम्ही तुमचे कुटूंबिय कोठे असतील"? जे सद्‌गुणाचे तेंच पुण्याचे असते कारण पुण्य हा सद्‌गुणाचा परिणाम आहे. तसेंच जे दुर्गुणाचे तेंच पापाचे असते कारण पाप हा दुर्गुणाचा परिणाम असतो. त्यात सापेक्षता, मर्यादा, काळ वेळ परिस्थिती हे सगळे घटक अंतर्भूत असतात त्याचा तुम्ही विचार करत नाही. म्हणून तुम्ही भरकटत अहात व तुमच्यामुळें तुमच्यावर विसंबून असलेला तुमचा परिवार सुद्धा परिणाम स्वरूप भरकटत भरडला जात आहे. तुमचे विचार करणे अतिसामान्य एकांगी असें आहे, कारण ह्या तर्कात जे विविध घटक अंतर्भूत असतात ज्यांच्या परिणामांने गुणांचे स्वरुप बदलत असते त्याची दखल घेण्याची तुमच्यात क्षमता नाही. तुम्ही ज्याला पुण्य कर्म समजता ते वस्तुतः अशा परिस्थितीत पाप ठरते पण त्याची दखल घेण्याची कुवत तुमच्या सामान्य बुद्धीला नाही हे आम्हा सर्वांचे दुर्दैव आहे. असें कोणतेही विचार अथवा कर्म नाही जे सर्व परिस्थितीत पुण्यप्रद असते. कर्माच्या परिणामाने ते कर्म पुण्य होते कां पाप ते ठरत असते. म्हणजे परिणाम जे दृष्य होतात ते अखेरीस ठरवत असतात किं ते कृत्य पाप होते कां पुण्य. असे वस्तुतः असले तरी कांहीं पाप समजले जातात व कांहीं पुण्य समजले जातात. त्यांना ठोकताळें म्हणून धरलेले असतात. तुम्ही त्या ठोकताळ्यांना प्रमाण समजून जर विचार करणार असाल तर ज्या इतर क्लिष्ट (गुंतागुंतीच्या) परिस्थिती उत्पन्न होतात त्यांची साधी दखलसुद्धा तुम्ही घेणार नाही हे अविवेकीपणाचे द्योतक आहे. तुम्ही तुमचा सगळा समय ब्राह्मणांत, देवांच्या अर्चनात, पितरांच्या पिंडदानात, स्वाहा आणि साध्यांच्या सानिध्यात घालवता, त्यामुळें त्या पलिकडे सुद्धा कांहीं त्यापेक्षा वेगळे असते त्याचे भान तुम्हाला राहिलेले नाही. सर्वकडे फक्त चांगलेच असेल असें समजणे हे अज्ञानाचे लक्षण आहे हेसुद्धा तुमच्या ध्यानात येत नाही. सगळ्यात फक्त चांगलेच पहाणे, वाईटात सुद्धा चांगले पहाणे हे सूज्ञपणाचे ठरत नाही. हा केवण भोंगळपणाचे लक्षण आहे. त्यामुळें दुर्गूण वाढत जाताततें तुमच्या लक्षातसुद्धा येत नाही. तुम्ही चांगले म्हणून सगळे विश्व चांगले असें समजणे अदूरदृष्टीचे लक्षण आहे. ते राजाला न शोभणारे असते. तुमच्या सारख्याने राजगादी सोडून

वानप्रस्थाश्रमात गेले पाहिजे. स्वताचे झाले कीं झाले इतरांना काय पाहिजे ह्याचा विचार न करणे स्वार्थीपणाचे आहे व ते तुमच्या वागण्यातून स्पष्ट होते. विस्वदेव, इष्टी, पशुबंध असें यज्ञ तुम्ही करता ते सगळ्या जीवांना सुख मिळावे ह्यासाठी असतात. ते सगळे निष्पाप असतात म्हणून ते ठीक आहे पण जेव्हां पाप पुरुषांशी गांठ पडते तेव्हा हा भोळेपणा घातक ठरतो. त्याचा अनुभव आम्ही सगळे आज घेत आहोत. अशा परिस्थितीत असूनही तुमचा जीवनाकडे पहाण्याची दृष्टिकोन यत्किंचतही बदललेला नाही. हे कशाचे लक्षण आहे? आपल्या भावंडांच्या कृपेने तुम्ही अश्वमेध, राजसूय, पुंडरीक, गोसव असें यज्ञ केलेत. त्यात तुमच्या भावांनी मिळवलेली खंडणी ब्राह्मणांना तुम्ही वाटली, अगदी त्याच निस्वार्थी बुद्धीने तुम्ही तुमचे राज्य जे वस्तुतः तुमच्या भावंडांनी त्यांच्या कष्टाने मिळवले होते ते घालवले. हे सगळे तुम्ही करत होता कारण त्यातील कांहींही तुम्ही तुमच्या मेहनतीने मिळवलेले नव्हते. ह्या वागण्यातून तुमचा नीचपणाच मला दिसतो. जे कधी मिळवले नाही ते तुमचे नव्हतेच तर ते फुकट दिलें त्यात कोणता मोठेपणा दाखवला ते सांगाल कां? आयजीच्या घरावर बायजी उधार, अथवा हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणे असांच तो प्रकार होता. त्यात कोणती बहादूरी केली ते सांगा. तुम्ही तुमच्या हिम्मतीने कधी कांही मिळवले आहे कां? ते दाखवा मला. त्यापुढे जाऊन तुम्ही निर्लज्जपणे तुमच्या भावंडांना व त्या नीचपणाने तुझी हौस भागली नाही म्हणून किं काय माझा लिलाव लावलात! ह्यात कोणती क्षमाशिलता तुम्ही दाखवलीत? जर तुम्हाला कशाचीच वासना नाही तर मग द्युत खेळण्याची इच्छा काय मिळवण्यासाठी झाली? जे निरीच्छेचे सोंग तुम्ही घेतले आहे त्याचा खोटेपणा ह्यातून स्पष्ट होत नाहीं कां? मी सांगत्ये तुम्हाला द्युत खेळून असें दाखवावयाचे होते कीं, जे तुमच्या भावंडांनी स्वकष्टांने मिळवले त्यापेक्षा कितीतरी जास्त तुम्ही त्या द्युताने मिळवून तुमच्या भावांना मान खाली घालावयाला लावायचा उद्देश होता. परंतु, तुमचे नशिब फुटके निघाले व गोष्टी उलट झाल्या व त्यात तुमच्या नीचपणामुळें आम्ही अडकलो आहोत".

एवढे बोलल्यावर द्रौपदी स्वगत बोलू लागते, शेवटी एक गोष्ट मान्य करावा लागते किं, जे सृष्टीत घडते ते सगळे विधात्याच्या नियोजना नुसारच होत असते हे मान्य करावे लागेल. नाहीतर पांडव आंधळ्यासारखे त्यांच्या मोठ्या भावाच्या आज्ञेत कां राहिले असते. असें

सांगतात, जे येथे सृष्टीत घडते त्यावर त्या विधात्याची हुकूमत चालते. जीवनात येणारे प्रसंग मग ते सुखाचे असतील किंवा दुःखाचे, समाधानाचे ते सगळे त्या विधात्याच्या मर्जीनुसारच होत असते. जर परिस्थिती बिघडणे विधात्याला अपेक्षित असेल तर ती बिघडणारच. कठपुतळीच्या बावल्या नांचतात त्या त्यांच्या तारा खेचणार्याच्या मर्चीनुसार. त्यांना स्वताचे मत असत नाही. माणसाचे सुद्धा असेंच असावे नाहीतर माझे पांडव जे कोणालाही ऐकत नाहीत ते गोगल गाईसारखे ह्या मूर्ख मोठ्या भावाच्या आज्ञेत कां राहिले असते. वचनबद्धता ही केवळ सबब होती. त्यांच्या नशिबात वनवास लिहीलेला तो त्यांना भोगावा लागणारच असें जर असेल तर मी ह्या माझ्या नवर्याला बोलणी लावून काय उपयोग? गळ्यात पट्टा बांधलेला कुत्रा कितीही मोठ्यानो भुंकला तरी शेवटी तो त्याच्या मालकाच्या आज्ञेत असतो तसेंच जन्मलेला प्रत्येक जीव त्या विधात्याच्या आज्ञेनुसार त्याचे जीवन जगत असतो, त्याला पर्याय नाही. माझ्या दैवात वनवास म्हणून मी ह्यांच्या बरोबर येथे आले, नाहीतर माझा भाऊ मला पांचालला घेऊन जाण्याचा आग्रह करत होता पण मला माझ्या नवर्यांबरोबर रहाण्याची बुद्धी कां झाली? त्यात माझ्या नवर्यांचा काय दोष? तरीसुद्धा असें सांगतात, हे तितके देवावर निर्भर नसते, आपले गत जन्माचे कर्म त्यात कारणीभूत असते. आपल्या कर्मानुसार आपले सगळे भोग आपल्यासाठी तयार होत असतात. जर ते खरे मानले तर माझे कांहीं असें कर्म झाले ज्याचे परिणाम स्वरुप मी वनवासात रहात आहे. असें सांगतात, देवाच्या राज्यात कधीही अन्याय होत नाही. असे असेल तर माझे भोग मी स्वीकारले पाहिजेत, त्यातच माझे भले आहे. कोण कोणाला मारतो तर कोण कोणाला वाचवतो. त्यात मारणारा व वाचवणारा दोघेही विधात्याच्या आज्ञेनेच ते करत असतात परंतु, ते कृत्य करतांना ज्या भावना, वासना व इच्छा ते करणारा मनात बाळगतो त्या त्याच्या असतात व त्यात देव नसतो. अशा त्या विचारांचे आपणच धनी असतो. त्या आपल्याला पुढील आणि ह्या जीवनातील पुढच्या भागात साथ देत असतात. ते आपले कर्म असते. प्रत्यक्ष करणी आपली नसते ती विधात्याची असते. क्षमा करा, शिक्षा करा त्या मागील भावना, वासना व इच्छा तुमची म्हणून त्या कृत्याचे चांगले वाईट फळ तुम्हाला भविष्यात केव्हां तरी भोगावेच लागणार अशी सृष्टीची तर्हा आहे. हे जाणणारे, सृष्टीतील घडणार्या प्रसंगांकडे त्या निरीच्छ दृष्टीने पहातात. जे जन्मले

ते मरणारच. ते कसे जन्मले व कसे मरणार ते देव ठरवतो व आपण माणसे, इतर प्राणी त्या विधात्याची अवजारे असल्या सारखे ते काम (जन्माला घालावयाचे अथवा मारण्याचे) करत असतो. ते होणारच त्याला कोणीही अडवू शकत नाही हे निश्चित. खाटीक अथवा योद्धा प्राण्याला मारतो त्यात त्याचा कार्यभाग तेवढाच असतो जर तो ते कार्य निरीच्छपणे करत असेल तर. परंतु, जर तो त्यात भावनेने, वासनेने किंवा इच्छेने गुंतला तर ते कृत्य त्याला बाधू शकते. म्हणून ज्ञानी सांगतात, कार्य करा कारण ते तुम्हाला करावेच लागेल परंतु, त्यात भावनेने, वासनेने अथवा इच्छेने गुंतू नका. तसें गुंतणे पापकारक ठरू शकते. सृष्टी चालवण्यासाठी निव्वळ जड सृष्टी उपयोगाची नसते. त्यासाठी जीवसृष्टी आवश्यक असते. विधाता त्या जीवसृष्टीला वापरून हे सृष्टीचे चक्र फिरवत असतो. त्यात विधात्याला सहाय्य करणे हेंच उचित असते. ते करत असतांना बर्याच वेळा पुण्यवान बळी जातात व पापी मजेत रहातात, असे कां विरोधाभासाचे घडते कोणी सांगू शकत नाही. असे विचार मनात येतात, जर असें होणार असेल तर आपण नेहमी पुण्याचाच आधार घेण्याचे कारण काय? जर आपले भोग व आपले पुण्य अथवा पाप ह्यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नसेल तर कशाला पुण्यापाठी माणसांने लागावें? जेव्हां पुण्यवान दुःखात रहातो त्याचा कांही दोष नसतांना तेव्हां त्याचे पाप देवांना लागतें कां? पाप कर्मी जर त्या कृत्यात भावनेने, वासनेने किंवा इच्छेने गुंतला असेल तर तो त्या दुष्कृत्याचा भागिदार ठरतो व तो त्याची फळं भोगतो. पुण्यवंताने त्या दुर्भोगांना नियतीचा खेळ समजणे योग्य होईल कां? द्रौपदी स्वतःला विचारत असते.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा तिसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकतिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

ते द्रौपदीचे स्वगत ऐकून युधिष्ठीर तिला बोलतो, "अहो यज्ञसेनी तुमचे बोलणे अल्हाददायक आहे. तुमचे मुद्दे मांडणे अगदी बिनतोड आहे. मी ते फार काळजीपूर्वक ऐकले आहे. तुझे विचार मात्र मला, प्रथेला धरून नाहीत असें दिसते. तुझ्या म्हणण्याप्रमाणे असं वाटते कीं, तू देव सुद्धा आपल्या जीवनात कार्यरत आहे हे लक्षात घेत नाहीस. किंवा असें म्हणावे लागेल की, तू देव मानत नाहीस. अहो राजकन्या, मी मात्र माझ्या सगळ्या कार्यात परमेश्वराचा हस्तक्षेप असतो असें समजतो. असें मानत असल्याने माझे माझ्या कर्यातून काय अंतिम निष्पन्न होणार ते पहात नाही. फक्त आपले काम करत रहावे असें जे आपल्या पूर्वजाने सांगितले आहे तेव्हढे करत असतो. हा तुझ्या व माझ्या दृष्टीकोनातील फरक आहे. काम करत रहावे ते उत्तम करावे असें जे आपल्या पूर्वजांनी सांगितले आहे ते मी करतो. मी यज्ञ करतो कारण ते माझे कर्तव्य आहे, मग त्यातून किती कसें मिळाले ते पहावयाचे नसते. तुला कदाचित ते पसंत पडणार नाही पण मी असांच विचार व कार्य करत असतो. माझ्या काम करण्यात फलाशा नसते पण त्यामागील कार्य निर्दोष आहे कां नाही ते पहावयाचे असते, असें करण्या मागिल उद्देश तू समजून घे, मघा मी जे बोललो कीं, आपल्या कामात देवाचा हस्तक्षेप असतो ते आहे. आपल्या सगळ्या कामात देव भागीदार असतो ह्या भावनेमुळें कामाच्या फळाची बाजू मी देवावर सोडत असतो. कारण तो त्यात भागीदार आहे. अशी वेदांची शिकवण आहे. देव फक्त पुण्यप्रत कार्याला यश देतो अशी माझी व वेदांची धारणा आहे. म्हणून जे कार्य पुण्यप्रत आहे त्याला देवाची साथ मिळणारच असें मी मानतो. जो स्वताच्या कार्यातून फळाची अपेक्षा करतो त्याला पुण्याचा व्यापारी समजावे लागेल. जो पुण्याचा पर्यायाने देवांचा व्यापार करतो तो कधीही मोक्ष प्राप्त करू शकत नाही. अशा माणसाला त्याच्या कार्याचे फळ सुद्धा प्राप्त होत नाही. पापबुद्धीने जो पुण्य कार्य करतो त्यालासुद्धा त्या पुण्याचे फळ मिळत नाही. म्हणजे माझ्या विचार करण्याच्या पद्धतीने पाहिलेस तर असें समजावयाचे किं, फळ मिळणे अथवा न मिळणे सर्वस्वी विधात्याच्या मर्जीवर विसंबून असते. असें वेद सांगतात. म्हणून ते सगळ्यानी स्वीकारावयास पाहिजे. जो ते मानत नाही व पाप प्रवृत्तीला साथ देतो तो

नीच योनीत जातो व त्या कृत्याची कडु फळ चाखत रहातो. जो हे समजत नाही व आपल्या अज्ञानात रमतो तो मोक्ष कधीही प्राप्त करत नाही. जो हे दुर्लक्षितो तो मोक्षापासून दूर जातो. त्याला शाती मिळत नाही. परंतु, जो हे लक्षात घेऊन आपली कर्तव्ये करतो तो जरी वयांने लहान असला तरी मोठा समजला जातो. तू पाहिले आहेस मार्कंडेय ऋषी आपल्या येथे आले होते, ते ह्यांच मार्गाने त्यांच्या उच्च श्रेणीला पोहोचले आहेत. काम करावे व ते देवाला (विधात्याला) अर्पण करावे असा नियम आहे त्यातून पुण्य प्राप्त होते, अर्थात् कोणीही असें कार्य करणार नाही कीं, ते विधात्याला अर्पण करता येणार नाही कारण ते पापमय आहे. अशा वैचारिकतेतून माणसाची पुण्य प्रवृत्ती प्रगल्भ होत असते. त्याची पापमयतेतून मुक्तता होते. सगळे ऋषी जसें व्यास, वसिष्ठ, मैत्रेय, नारद, लोमस, शुक आणि आणखीन कितीतरी ह्याच मार्गाने त्यांच्या उच्चपदाला गेले आहेत. तू पहातेस ते कसे योगिक सामर्थ्याने प्रभावी झाले आहेत. ते साक्षात देवासारखे आहेत, त्यांच्या वाणीत दुवा आणि शाप असें दोनही देण्याचे सामर्थ्य आहे. म्हणून पुण्यमार्गाचा धिक्कार करून पाप मार्गाने काम करणे अयोग्य ठरते. त्यासाठी मी तुला सांगतो कीं, अशा चुकीच्या मार्गाचा आग्रह धरण्याचा अट्टाहास सोडून दे. अज्ञानी केवळ वर वरच्या फायद्यांचा विचार करतात, त्या मागील इतर संबंधित गोष्टींकडे तो दुर्लक्ष करतो. तो धर्माचा (कर्तव्याचा) धिक्कार करतो तो ब्रह्माकडून शिक्षेस पात्र ठरतो. कारण आपण ब्रह्माला बांधलेले आहोत. जो ब्रह्माच्या इच्छेविरुद्ध वागतो तो पुन्हा पुन्हा अडचणीत व चिंतेत रहातो. वेदाच्या आदेशाचा अपमान करणारा, त्याची कुचेष्टा करणारा नरकात जातो. वासना व लोभीपणाने असें होत असते. जो ह्या नियमांचे पालन करतो तो मरणानंतर सद्‌गतीला जातो. जे असें करत नाहीत त्यांचे फार हाल होतात. ह्या नियमांचे पालन करण्यालाच धर्म असें म्हणतात. त्याचे पालन करावे असें ऋषींनी सांगितले आहे जे सर्वज्ञानी आहेत. जर पुण्य पालनाने हित होणार नसेल तर सगळी सृष्टी अराजकांनी बरबाद होईल. म्हणून एकांने ते नियम मोडले म्हणून दुसर्यानेसुद्धा एक प्रतिक्रीया स्वरुप ते नियम मोडायचे असें होत गेले तरी सृष्टीत अराजक फैलावेल. सत्त्वशिलतेचे व्रत त्यासाठी सूज्ञ लोकांनी आचरावयाचे असते असा आग्रह असतो. म्हणजे साक्षात स्वर्ग पृथ्वीवर उतरेल, ह्या मानव जन्मातच सगळे साध्य होईल. सत्त्वशिलता हांच खर्या समृद्धीचा मार्ग आहे. पुण्य व पाप दोनही त्यांचे

परिणाम सिद्ध करत असतात. सत्त्वशिलतेत पुण्य वाढवण्याची क्षमता असते व ते न आचरल्यांने पाप वाढते. तू तुझ्या व तुझ्या भावाच्या जन्माचे उदाहरण पहा, यज व उपयजांच्या तपस्येतून तुम्ही दोघे यज्ञातून जन्मलात ह्यापेक्षा आणखीन कोणते उदाहरण पाहिजे पुण्याच्या प्रभावाचे? सामान्य माणसें ह्यांच्याबाबत बहुधा अज्ञानी असतात म्हणून ते भावनांच्या आहरी जाऊन बर्याच अशा गोष्टी करतात त्यांमुळें त्याला सुखा ऐवजी दुःखाचा अनुभव जास्त येतो. विधात्याच्या सगळ्या कृती ऋषीनासुद्धा समजत नाहीत. त्यामुळें ज्ञानी सुद्धा गोंधळून जातात मग माझे काय? ज्यांनी त्यांच्या सगळ्या वासनांचा नाश केला आहे व जे केवळ आत्मशुद्धीसाठी जगत आहेत त्यांना कोणतीही घटना मग ती त्याच्या फायद्याची असो अथवा तोट्याची असो, त्याला कांहीं फरक पडत नाही. तो सदैव शांतच असतो. त्यासाठी त्याची सत्त्वशिलता सात्त्विक असावी लागते. रजो व तमो प्रवृत्तीने ग्रासलेला कितीही चांगले दान वगैरे सत्त्वशिलतेची कामं केली तरी त्याचा कांहीं उपयोग होत नाही. म्हणून व्रतस्थता आचरणारा प्रथम सात्त्विक असावा लागतो. हे सगळें ब्रह्माने त्याच्या मुलांस काश्यपाला फार पूर्वी सांगितले आहे. ते मी तुला सांगत आहे. म्हणून मी तुला सांगतो कीं, द्रौपदी तू भावनेच्या आहारी न जाता शुद्ध बुद्धीने विधात्याला काय करावयाचे आहे त्याचा अंदाज घेऊन त्यानंतर जे तुला करावयाचे आहे ते करण्याचा प्रयत्न कर. जर तुला जे हवे ते विधात्याला मंजूर नसेल तर ते होणार नाही. कारण ह्या सृष्टीत जे त्याला हवे तेंच होत असते, ह्याला तू दैववादी समजशील परंतु. हा निव्वळ दैववाद नाही. त्यात विधात्याची दखल घेण्याचा प्रयत्न आहे हे तू लक्षात घे. आपण सगळे जीव त्याच्या मर्जीचे ताब्यात असतो. आपण आपल्या मर्जीचे सुद्धा मालक नसतो हे सत्य विसरू नकोस.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा एकतिसावा भाग संपला.

## वनपर्व भाग बत्तिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

ते युधिष्ठीराचे प्रवचन पूर्णपणे ऐकल्यावर त्याची पत्नी द्रौपदी त्याला बोलते, "मी धर्माचा (कर्तव्याचा) कधीच उपमर्द करायला सांगत नाही. मी विधात्याचा, ज्याने ही चराचर सृष्टी उत्पन्न केली त्याचासुद्धा अव्हेर केलेला नाही. परंतु, मी दुःखाने व्यथित झाले आहे, म्हणून तू मला समजून घे, आणि विनाकरण तत्त्वज्ञान झोडत जाऊ नकोस. त्या मनस्थापामुळें मी माझ्या मनाला शांत करण्यासाठी कांहीं बोलत असते एवढेंच. मला खूप त्रास होतोय रे माझ्या नवर्या, मला समजून घे. माझे दुःख समजून घे आणि त्यासाठी नीट लक्ष देऊन ऐक मी काय सांगत्ये ते. प्रत्येक सावध प्राणी कार्य करत असला पाहिजे. जे चर नाहीत असें जीव कदचित कांहीं न करता जगू शकतात. जसें वासरु जन्मल्या बरोबर ताबडतोब त्याच्या आईच्या आचळाला लागते व दूध पिऊ लागते. सगळे प्राणी त्यांचे त्या जन्माचे स्वभाव गुण त्यांच्या गत जन्मातील गुणांतून मिळवत असतात. सगळ्या प्राण्यात मनुष्य प्राणी थोडा वेगळा असतो. माणसाला भविष्याचा विचार करण्याची प्रेरणा असते. इतर प्राणी फक्त वर्तमानात रहातात. माणूस त्याच्या ह्या जन्मातील कर्मांने त्याचे पुढील जन्म कसे असतील व तो काय उपभोगेल व काय पिडा भोगेल ते ठरत असते. त्यालाच आपण आपले भाग्य, नशिब समजतो. त्या प्रमाणे ते त्यांचे जीवन जगत असतात. त्या गत क्रमानुसार त्याला एक उपजत बुद्धी प्राप्त झालेली असते, त्या बुद्धीच्या मदतीने तो त्याचे जीवन जगत असतो. म्हणून मी सांगत्ये कीं, तू सुद्धा त्याप्रमाणें वागले पाहिजेस, न घाबरता. आपण जेव्हां कांहीं कार्य करतो तेव्हां आपल्याला सुद्धा माहीत नसते त्याचे काय परिणाम होणार आहेत तरीसुद्धा ते कार्य सुरु करतोच नां? माणूस त्याच्या संरक्षणासाठी व संमृद्धीसाठी ते कार्य करत असतोच नां? तसें जर त्याने केले नाही तर तो परिस्थितीनुसार एक तर मरून जाईल किंवा संपत्ती संपल्याने भिकारी होईल. काम नाही केले तर तो प्राणी नष्ट होईल. जगातील सगळे प्राणी काम न केल्यास नष्ट होतील. एका प्रकारे काम केल्याने फळ नाही मिळाले तर तो दुसर्या प्रकारे प्रयत्न करत रहातोंच नां"? फळ मिळो अगर न मिळो तो काम करत रहातोच, कारण तो त्याचा स्वभाव असतो व तो स्वभाव त्याला त्याच्या गत जन्माच्या अनुभवानुसार मिळालेला असतो. कांहीं तुझ्या

सारखे भाग्यावर विसंबून रहातात तर कांहीं त्याच्या प्रयत्नावर. परंतु ते जे नियोजन पूर्वक काम करतात ते शहाणे समजले जातात. जे "असेल माझा हरी," अशा स्वभावाचे असतात, तुझ्या सारखे, ते स्वतः व त्यांच्यावर अवलंबून असणार्यांसह कालोघात संपतात. प्रयत्नवादी फक्त टिकतात. कालचक्र त्याला माफ करत नाही. जे कमजोर असतात त्यांनी ताकदवानांच्या मदतीने काम करावयाचे असते. गप्प बसून चालत नाही. विधात्याला काय मंजूर आहे व काय नाही ते सांगायला ते येत नाही. किंवा त्याचा खात्रीचा अदाज आपण करू शकत नाही. त्यासाठी प्रयत्न करणे हेंच श्रेयस्कर समजले आहे. भविष्यात काय आहे ते कोणालाही समजत नाही म्हणून अशा अनिश्चित दैवावर अवलंबून रहाणे शहाणपणाचे नसते. जेव्हां कोणी नियोजन बद्ध काम करून कांहीं मिळवतो तेव्हां ते त्याने स्वकष्टाने मिळवले असें समजले जाते. ते त्याच्या कर्तृत्वाचे फळ असें समजतात. परंतु, जेव्हां कांहीं लाभ होतो अनपेक्षितपणे तेव्हां त्याला दैव समजले जाते. वेद सांगतात, कसेंही प्राप्त होवो ते गत जन्माच्या कर्मविपाक समजला जातो. चांगल्या कर्माचा चांगला व वाईट कर्माचा वाईट असें ठरते. ह्या कर्मविपाकाचे नियोजन विधाता असे करतो किं, त्याचे न्यायपूर्ण वितरण होईल. कारण, कोणत्याही कर्माचे अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हिस्सेदार असतात, त्या सगळ्यांत ते फळ विभागले जाते. माणसाच्या कार्यात त्याच्या दृष्य व अदृष्य हिस्सेदार असतात त्यांचासुद्धा वाटा असतो. जे तो जाणत नसतो पण विधाता ते जाणत असतो. म्हणून कधी कधी वरकरणी फल विभाजन अयोग्य झाले असें वाटते कारण इतर हिस्सेदारांची आपल्याला कल्पना नसते पण ते कधीही अन्यायकारक नसते. ह्या सृष्टीच्या नियोजनात ज्याचा मोठा भाग असतो त्यालाच आपण विधाता असें समजतो. तो विधाता सृष्टीतील विविध जीवांकडून कांहीं तरी कार्य करून घेत असतो ज्याची कल्पना त्या जीवाला बर्याच वेळा नसते. कांहीं माणसे कांहीं योजना करून कार्य करतात व त्यात त्याला यश मिळते, ते पाहून त्याला वाटते किं, ते त्याच्या कर्तृत्वामुळें यशस्वी झाले किंवा कधी अपयश येते तेव्हां तो समजतो ते अपयश त्याचे आहे. वस्तुतः ते दोनही यश व अपयश त्याचे कांहीं प्रमाणात असले तरी त्याचा कांही हिस्सा विधात्याच्या नियोजनाचा असतो. हे जे समजतात त्यांनाच ह्या सृष्टीच्या काम करण्याचा अंदाज आला असें समजावे. म्हणून कोणतेही कार्य करण्या आधी आपल्या ऋषींनी त्या अज्ञात

हिस्सेदारांची विनवणी करण्याची, त्यांना अनुरुप करण्याची प्रथा रुढ केली आहे. त्या शक्तिंना शांत करणे हा अशा विधींपाठील उद्देश असतो. म्हणजे त्या दृष्य अथवा अदृष्य हिस्सेदारांचा वाटा आपण मान्य करतो असा त्याचा अर्थ असतो. कार्य सुरु करण्या आधी तसें मान्य केल्याने यशाची शक्यता जास्त होते असा ज्ञानी माणसांचा अनुभव आहे. माणसाचे कसब, कर्तृत्व, हिम्मत, धाडस हे सगळे त्याच्या यशाचे मानकरी असतात. त्याशिवाय काळ, वेळ, स्थळ, त्याच्या भोवतीच्या दृष्य आणि अदृष्य गोष्टी ज्यांना कोणी शक्ति असें सांगतात, त्यात पितर, पूर्वज, वास्तुदेव, आराध्य देवता वगैरे असतात. असें सगळे त्या कार्यात हिस्सेदार असतात. ते सगळे त्याचे कर्तृत्व समजले जाते. त्याशिवाय त्याचे गत जन्माच्या कर्माचे फळ ज्याला दैव असें समजतात ते सुद्धा तेथे कार्यरत असते. माणसाला जरी त्या सगळ्या गोष्टींचा अंदाज होत नसला तरी विधाता ते सगळें जाणत असतो व त्यानुसार तो त्याची फलप्राप्ती ठरवत असतो. कर्तृत्व आणि दैव ह्यांच्या योगांने त्या प्राण्याचे जीवन घडत असते. आपण पहातो कांहीं माणसें खूप प्रयत्न करतात म्हणजे त्याचे कसब, कर्तृत्व, हिम्मत, धाडस सार्थ असते, त्याशिवाय काळ, वेळ, स्थळ सुद्धा योग्य साधले तरी त्याला यश मिळत नाही किंवा कमी मिळते. त्याचे कारण त्याचे दैव साथ देत नाही किंवा त्या दृष्य अथवा अदृष्य शक्ती त्याला पुरक नसतात. असें आपले ऋषी सांगतात, कीं, योग्य यज्ञ करून ते पुरक करून घेता येतात. कांहीं फक्त त्यांच्या कर्तृत्वावर भरवसा करतात व इतर त्या गोष्टींचा अव्हेर करतात, जे जोवर पुरक असते तोवर तो माणूस यशस्वी रहातो व त्याच्या विश्वासाला साथ मिळते पण जेव्हां ते पुरक रहात नाही तेव्हां त्याला वेगळा अनुभव येतो. जरी दैव पुरक असले तरी कर्तृत्व असावे लागते म्हणून माणसांने सदैव प्रयत्न करत रहाणेच श्रेयस्कर असते. केवळ दैवावर विसंबून रहाणारे अपयशाने नष्ट होतात. दैवाचा विचार न करता काम करत रहाणे हेंच माणसाचे कर्तव्य असते, परिणामांची पर्वा न करता ते प्रयत्न झाले पाहिजेत. कारण, अरे माझ्या नवर्या, माणूस दैवा बद्दल, दृष्य आणि अदृष्य शक्तींच्या संयोगाबद्दल अनभिज्ञ (आंधळा) असतो. म्हणून त्यावर विचार न करतां काम करत पहाणे हेंच श्रेयस्कर समजले जाते. त्यासाठी ऋषी सांगतात, दैवासाठी विधात्यावर श्रद्धा ठेवणे हांच चांगला पर्याय असतो. सत्त्वशिल व्रतस्थ जीवन जगणार्याला विधाता साथ देण्यास बांधलेला आहे असें वेदांत

दिले आहे. सत्त्वशिल व्रतस्थ जीवन जगण्यामुळे माणसाच्या अनेक चुकांना विधाता क्षमा करतो. त्यांचे भाग्य सुधारते पण जर जीवन सत्त्वशिल व्रतस्थ नसेल तर केवळ यज्ञ करून, प्रार्थना करून, खोट्या व्रतांचे पाखंड रचून तो माणूस विधात्याची मर्जी संपादन करू शकत नाही. तरी जे सत्त्वशिल व्रतस्थ जीवन जगत आहेत व दैववादी नाहीत (देव मानत नाहीत) त्यांना विधाता मदत करण्यास बांधलेला असतो. म्हणून मी तुम्हाला सांगत्ये की, तुम्ही कौरवांशी युद्ध सुरु करावे व जर यश नाही आले तर ते समजेल व जर यश आले तर तेसुद्धा समजेल! तुम्हा सगळ्या पांडवांची सत्त्वशिलता आणि व्रतस्थता निःसंशय आहे म्हणून मी खात्रीने सांगते आपल्याला यशच मिळणार. प्रयत्न केला नाही तर कसे समजणार आपल्या प्राक्तनात काय लिहून ठेवले आहे"? यश केवळ कर्तृत्वाचे असते असें नाही, त्यात दैवाचा मोठा वाटा असतो. ह्या सगळ्या गोष्टी एकमेकांत गुंतलेल्या असतात, दैव नाही तर यश नाही असे होत असते. परंतु दैव नसणारच असें समजून निराशावादी झालेले कांहीं करू शकत नाहीत. तुम्ही असें निराशावादी झाला अहात ते मला रुचत नाही. कार्य करुनही यश न मिळाल्यास दुःख करू नये कारण तू प्रयत्न करत होतास त्याची नोंद विधाता, जो ह्या सृष्टीच्या खेळाचा कर्ता आहे तो, पहात असतो. विधाता सगळे पहात आहे. आपण सगळे ह्या खेळातील खेळाडू आहोत. प्रयत्न करणार्यांना विधाता कोणत्या ना कोणत्या कारणांनी यशाकडे नेतोच अंतिम. जे प्रयत्नच करत नाहीत ते मात्र विधाता बाजूला करतो कारण ते त्याच्या खेळात भाग घेण्यासाठी अयोग्य ठरतात. ह्या खेळात चांगल्या आणि वाईट अशा दोनही शक्ती (अदृष्य) कार्यरत असतात. कारण त्या ब्रह्मदेवाच्या मुली आहेत (दिती, दानु), त्यांची लेकरे (दैत्य व दानव आणि त्यांचे उपभेद राक्षस, असुर इत्यादी. ह्या सगळ्या नकारात्मक प्रवृत्ती) देवांप्रमाणे सगळ्या कामात असतात. कारण ते सगळे सृष्टीच्या चालवण्यात आवश्यक असतात. असे समजतात कीं, देव सकारात्मक प्रवृत्तीचे द्योतक आहेत व हे दुसरे नकारात्मक प्रवृत्तीचे द्योतक असतात. सृष्टी चालवण्यासाठी दोनही प्रवृत्ती आवश्यक असतात. त्या प्रवृत्तींचे स्वाभाविक परिणाम उत्पन्न होत असतात. ते माणसाला भोगावे लागत असतात. जे त्या दानवी शक्तींचा आधार घेतात त्याना त्या मदत करतात. त्यामुळें जे यश मिळते ते सुद्धा लक्षात घेतले पाहिजे कारण, सांप्रत कौरवांना जे यश मिळत आहे त्यात त्या दानवी

शक्तींचा मोठा हिस्सा आहे हे तुमच्या लक्षात आले असेल. यश कसेही मिळवून आपण ह्या परिस्थितीतून बाहेर आले पाहिजे. यश कसे मिळाले ते महत्वाचे नसते, ते मिळणे महत्वाचे असते. युद्धात शेवटी बहुधा ह्या दानवी शक्तींच्याच मदतीने यश क्षत्रियांना मिळत असते मग त्यात दोष पहाण्यात कांहीं अर्थ नाही असें माझे मत झाले आहे. व्यवहारातील यश दानवी शक्तिंच्या मदतीने घेण्यात कांहींच गैर नाही. क्षत्रियांना ह्या नकारात्मक प्रवृत्तींचा कुशलपणे उपयोग करावा लागतो म्हणून त्यांचे जीवन कार्य ब्राह्मणांसारखे सोपे नसते. ते जास्त क्लिष्ट असते. ब्राह्मण फक्त सकारात्मक (दैवी) प्रवृत्ती वाढवून रहातात तसें क्षत्रियांना करता येत नाही. कारण त्या दोन पिंडांची ह्या सृष्टीतील कार्य पद्धती भिन्न असते म्हणून क्षत्रियांनी ब्राह्मणांची नक्कल करावयाची नसते, जी चूक आपण करत अहात. क्षत्रियांना दैवी आणि दानवी अशा दोनही प्रवृत्तींचे योग्य नियोजन करावे लागते ते क्लिष्ट काम ब्राह्मणांना करावे लागत नाही. तुम्ही दामोदराचे कार्य पहा त्यात हे मिश्रण तुम्हाला चांगलेच दिसेल. आपल्या कर्मात विचार करणे हेसुद्धा येते म्हणजे आपण प्रथम विचारांनेच आपल्या कर्माला सुरु करत असतो. म्हणून वेद सांगतात, शुद्धतेची सुरुवात विचारांतून होत असते. माणूस पाप अथवा पुण्य प्रथम त्याच्या विचारांने करत असतो. सगळ्या आपल्या प्रवृत्ती आपल्या विचारांत सुप्तपणे हजर असतात. विचार करणे हेसुद्धा कर्म आहे. माणूस ते कर्म सतत जाणून अथवा अजाणता करत असतो, म्हणजे तो सतत कांहींना कांहीं विचार करत असतो. ते कर्म आपण लक्षात घेत नाही पण विधाता त्याची सुद्धा नोंद घेत असतो. असे समजतात कीं, त्याकामात सृष्टीचे सहा कार्यकर्ते इंद्र, अग्नी, वायू, वरूण, यम आणि वैश्रावण त्याला मदत करत असतात. म्हणून आपण कसे विचार करतो तेसुद्धा सावधपणे नियंत्रित करावयाचे असते. माझ्या पित्याने एक विद्वान ब्राह्मण सल्ला देण्यासाठी ठेवला होता तो हेंच सांगत असें. जीवनातील व्यवहारात आणि मोक्ष साधनेत कृपया गल्लत करू नकोस. माझ्या भावालासुद्धा तोंच शिक्षण देत असे तेथेच मी हे सगळे शिकले त्यात दैव, कर्तृत्व व त्याच्या संदर्भातील इतर घटकांचा विचार होता, जो मी तुला सांगितला. माझ्या बाबांच्या मांडीवर बसून मी हे शिकले आहे. क्षत्रियांसाठी हे शाश्वत ज्ञान आहे. त्याचा अव्हेर करू नकोस.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा बत्तिसावा भाग संपला.

# वनपर्व भाग तेहतिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, यज्ञसेनेचे असें विवेचन ऐकल्यावर त्यांने प्रभावित झालेला भिम रागावून युधिष्ठीरा कडे पहात त्याला बोलतो, "अहो आमचे राजे पहाता काय? शहाण्या लोकांनी आखून दिलेल्या मार्गांने जाऊन ह्या परिस्थितीवर मात करू या. आपण संन्याशी नाही आपण क्षत्रिय आहोत त्या प्रमाणे आपला मार्ग आपण घेतला पाहिजे. येथे राहून आपले हित, आनंद, पुण्य सगळे व्यर्थ जात आहे. विशेष दुःख होण्याचे कारण आपण येथे शौर्य कमी पडले म्हणून अथवा पुण्य कमी झाले म्हणून अथवा प्रामाणिकपणा कमी झाला म्हणून आले नसून, खोट्या द्युताच्या कारस्थानामुळे आलो म्हणून ते स्वीकारण्याचे आपल्याला कारण नाही. तो आपल्यावर आपल्या काकानी अन्याय केला आहे म्हणून कृष्णा सांगते त्या प्रमाणे त्या विरुद्ध उठणे हेंच खर्या क्षत्रियाला शोभते. त्यात कोणत्याही नैतिकतेचा अव्हेर होत नाही. जर वचन पालनाचा मुद्दा पाहिला तर आपण वनवास स्वीकारून ते पूर्ण केले आहे. त्यात आपण प्रतिहल्ला न करण्याचे वचन दिलेले नाही, म्हणून तो करू शकतो. त्यामुळें कोणतीही प्रतारणा होत नाही. तुमच्या निर्बुद्धपणामुळें एकदा झाले आता त्या निर्बुद्धपणाची पुनरावृत्ती करू नये. तुम्ही म्हणालात कमजोरानी सामर्थ्यवानाला आव्हान द्यावयाचे नसते म्हणून तुम्ही कौरवांपुढे शरणागती स्वीकारली ह्याचा अर्थ काय? काय आम्ही कौरवांच्या पेक्षा कमी आहोत कां तू ते तुझ्याबद्दल फक्त बोलत होतास ते सांग. जे राज्य तू सम्राट म्हणून उपभोगत आहेस ते तू थोडेच मिळवले होतेस? ते तुझ्या चार तेजस्वी शूर योद्ध्यानी मिळवले होते मग तू कमजोर कोणाबद्दल बोलत होतास ते सांग. तुझ्या एकट्याच्या नामर्दपणासाठी आम्ही सगळे कां वनवास भोगावा? आम्ही आईला शब्द दिला कीं, आम्ही तुझ्या आज्ञेत राहू त्याची एवढी मोठी सजा आम्हाला तू देणार आहेस कां? तुझ्या आज्ञेत रहाण्यामुळें आम्हालाच नव्हे तर कित्येक मित्रांचासुद्धा विरस झाला आहे. तू गप्प बसला असतांस तर एव्हाना ते सगळे कौरव जे उघडपणे आम्हाला शत्रू समजतात त्यांचा खत्मा झाला असता. जे कृष्ण म्हणाला तेंच मी त्याच्या ऐवजी उरकले असते. तो खरा क्षत्रिय धर्म (क्षत्रियांचे कर्तव्य) होता जो जनार्दन आपल्याला सांगत होता. क्षमाशिलता ब्राह्मणाची व क्षत्रियांची ह्यातील

भेद कृष्णा आत्ताच सांगत होती ते लक्षात घे. तुझे हे नेभळटपणाचे वागणे कदाचित ब्राह्मणांत खरे असेल परंतु, क्षत्रियांना अशोभनीय आहे. तू कमजोर असशील नव्हे आहेसच, पण त्याची सजा आम्ही कां भोगावी"? मोठा बंधू म्हणून तुला मान दिला त्याची ही किंमत आम्ही देत आहोत. तुझ्या ह्या वागण्याचा असा अर्थ लावला जात आहे किं, आम्ही सगळेच तुझ्या सारखे नेभळट आहोत तर ते मला चालणार नाही. क्षत्रियांचा मृत्यू रणभूमीत अपेक्षित आहे, नाही घरात आजारी पडून एकाद्या ब्राह्मणासारखा. शूरांनी लढत मरावे पण असें वनवासात नाही रहावयाचे. रणभूमीत मरणार्याला वीरगति मिळते तशी वनात एकाद्या श्वापदाने खाण्याने मिळणार नाही. त्या कौरवानी आपल्याला त्यांचे वैरी म्हणून सांगितले आहे मग आपल्याला कशाला समझौता करण्याची गरज पडावी. तू पाहिजे तर एकटा संन्यास घेऊन रहा वनवासात जे तुझ्या तामसी प्रवृत्तीप्रमाणें योग्य होईल पण आम्हाला आता अडवू नकोस. सामर्थ्य असूनही असें वनवासात रहाणे हा पुण्याचा मार्ग निश्चितच नाही. क्षमाशिलता हा सद्गुण आहे पण अयोग्य जागी तो वापरला तर जो दुर्गुण ठरत असतो. म्हणजे कोणताही गुण चांगला कां वाईट हे त्याच्या सापेक्ष परिस्थितीवर विसंबून असते. जी वागणूक ब्राह्मणांना योग्य समजली जाते ती क्षत्रियाला व वैश्याना योग्य नसू शकते. कारण त्यांचे प्रारब्ध व संचित वेगवेगळ्या निती नियमांने ठरवले जाते. तुला जर ब्राह्मण वर्णाच्या वागण्याची नक्कल करावयाची होती तर तू संन्यास घ्यायला पाहिजे होतास. परंतु, तुला सम्राट होण्याची सुद्धा इच्छा आहे व क्षत्रिय बाणा नको असें कसे मान्य करत येईल"? जगण्यासाठी केवळ पुण्यकारी असून चालत नाही कारण पाप व पुण्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. कधी व्यवहारासाठी नकारात्मक प्रवृत्तींना स्वीकारावे लागते. त्यालाच क्षत्रियांचा व्यवहार असें समजतात. ते मर्यादेत असले कीं, त्यामुळें कांहीं बिघडत नाही. पुण्य व संपत्ती एकत्र असले कीं, त्यातून चिरानंद प्राप्त होतो पण तेवढेंच करून व्यवहार साधला जात नाही. राजाला व्यवहाराची जाण असावी लागते. जेव्हां प्रतिस्पर्धी पाप कारक असेल जसे येथे दुर्योधन व त्याची चांडाळचौकडी आहे, तेथे जर तू पुण्य मार्ग आचरलास तर तुझे नुकसान होणारच. कारण म्हणतात नां, काट्याने काटा निघतो त्या प्रमाणें पाप प्रवृत्तीचा निवाडा तशाच नकारात्मक मार्गाने काढावा लागतो. म्हणतात नां, जशास तसे. पाप मार्गाने काम करतांना त्यात न

गुंतणे म्हणजे त्या पाप मार्गाचे पुण्य कर्मात रुपांतर करणे असें असते. मनाने पाप व पुण्य होत असते, कृतीत सकृत्दर्शनी ते पाप कृत्य वाटले तरी ते करणारा त्यात विचारांने व भावनांने गुतला नसेल तर ते त्याला पाप म्हणून बाधत नाही. जसें, खाटीक प्राणी मारतो म्हणजे ते एक प्रकारचे पाप कृत्य त्याच्या हातून घडत असते परंतु, जर तो त्या मारण्याचा असुरी आनंद घेत नसेल तर ते कृत्य पाप ठरत नाही. त्याच प्रमाणे, योद्धा शत्रूच्या सैनिकाला मारतो ते त्याचे कार्य असते पण त्या मारण्यात तो खूनशी आनंद घेत नसेल व केवळ एक शत्रूचा नाश करण्याचे कर्तव्य म्हणून करत असेल तर त्या हत्येचे त्याला पातक लागत नाही. प्रसंगी असे मारणे पुण्य कर्म ठरते, जसें, जरासंधाचा वध दामोदराने केला त्यात त्याचा उद्देश एक नकारात्मक प्रवृत्ती नष्ट करण्याचा होता म्हणून त्या मृत्यूचे पातक कृष्णाला लागले नाही. ह्या सृष्टीच्या रचनेनुसार नकारात्मक प्रवृत्ती सहसा जास्त वेगांने वाढतात. त्यामुळें त्यांचे नियमन करावे लागते. जसें शेतात तण फार वाढते, त्याचे नियमन जर केले नाही तर ते तण पिकाला मारून टाकते. तसेंच कांहींसे हे क्षत्रियांचे कर्तव्य असते. त्यात वरकरणी विरोधाभास वाटतो परंतु, योग्य अभ्यास केल्यानंतर त्यातील बारकावे समजतात. वैभव उपभोगण्याने आनंद मिळतो तो आज आमचा हरवला आहे. त्यामुळें आम्ही सगळे असंतुष्ट झालो आहोत. त्याच्या प्रभावाखाली आम्ही आज आहोत. गृहस्थाश्रमीसाठी केवळ पुण्य असून भागत नाही. त्या बरोबर वैभव आणि सुख असावे लागते. आम्ही तूर्त गृहस्थाश्रमी आहोत म्हणून त्याचा विचार करावा लागतो. तू कदाचित वानप्रस्थाश्रमात मनाने जाऊ इच्छित असशील तर तुझे व आमचे जमणार नाही हे लक्षात घे. म्हणून केवळ पुण्याचाच विचार करणे आमच्यासाठी अप्रस्तुत आहे. पुण्य, वैभव आणि सुख असे सगळे मिळवणे क्षत्रियाचे कर्तव्य असते त्यात ह्या वनवासाला जागा नाही. शास्त्र सांगते, त्या तिघांत प्रथम पुण्य, त्यानंतर वैभव व नंतर सुख असें प्राप्त करण्याचे क्रम असावेत. त्याच प्रमाणे सुख (आनंद) मिळवतांना पुण्याचा क्षय होणार नाही असें लक्ष द्यावयाचे असते. त्याच प्रमाणे शास्त्र असें सुद्धा सांगते कीं, जीवनात माणसांने (गृहस्थाश्रमी) पहिल्या तारुण्याच्या काळात सुख मिळवण्यावर लक्ष (प्राधान्य) द्यावे, प्रौढपणी वैभवा वर लक्ष द्यावे आणि त्या नंतरच्या (उत्तर) प्रौढपणी पुण्यावर लक्ष ठेवावे. सुख व वैभव मिळवतांना पुण्यक्षय होणार नाही असेसुद्धा पहावयास सांगितले आहे. तसे

पहाता आम्ही आज तरुण आहोत म्हणून आम्ही सुखासाठी प्रयत्न केले पाहिजेत असें स्पष्ट होते. आत्म्याची सत्त्वशिलता आणि शरीराची व्रतस्थता ह्यांचा मेळ सुद्धा घालावयाचा असतो. म्हणून त्या सगळ्यांचा सूज्ञपणे विवेक करून तू आपले पुढचे कार्य काय ते ठरव. आत्म्याच्या सत्त्वशिलतेने पुण्य प्राप्त होत असते म्हणून ते आवश्यक असते. त्यात दान, सचोटी, खरे बोलणे (ह्यात हितकारकता अपेक्षित असते) वेदांचा अभ्यास वगैरे येतात. त्यातील कांही प्राप्त करण्यासाठी वैभव (दान, भेटी देणे, ब्राह्मण भोजनं अशांसाठी) असावे लागते. त्यासाठी जितके वैभव जास्त समृद्ध तेवढे जास्त पुण्य मिळते. म्हणून आपल्याला वैभव प्राप्त करणे अत्यावश्यक आहे जे ह्या वनात शक्य नाही. हल्ली विदूर काका आपल्याला तो पुरवठा करत आहेत म्हणून तू रुबाबात ब्राह्मणांना दानं करत आहेस. पण ते आपल्या सारख्या कर्तबगार क्षत्रियांना शोभत नाही. क्षत्रियांना भिक्षा मागण्यास परवनगी नाही. आपल्याला जिंकणे अथवा मरणे हे दोनच मार्ग दिलेले आहेत. म्हणून तुला असें कांहीं करावे लागेल ज्यामुळें आपण पुन्हा श्रीमंत होऊ. क्षत्रियांना श्रीमंत होण्यासाठी शत्रूचा नाश करणे, त्याला जिंकणे असें मार्ग दिले आहेत त्याप्रमाणे आपल्याला पुढचे नियोजन करावे लागेल. शास्त्र सांगते राज्याधिकार हा क्षत्रियांचा पुण्य मिळवण्याचा मार्ग आहे व त्या मार्गानेच तो पुण्य मिळवेल. मी व माझे इतर तीन भाऊ ते करण्यास तयार आहोत, त्यात तू तुझ्या अक्षत्रिय विचारांने अडचण करू नकोस. आम्ही कांहीं करू त्याची तुला फिकर करावयाची गरज नाही. त्यातून जी समृद्धी येईल ती आमची असेल म्हणजे तू ती पुनः मूर्खपणा करून घालवणार नाहीस. तू असांच वनवासात रहा त्यांने कांहीं आम्हाला फरक पडत नाही. आपल्या घराण्याची परंपरा आपण वनवास घेतला म्हणून सोडू शकत नाही व ते कोणीही मान्य करेल आणि जरी कोणी नाही मान्य केले तरी कांहीं आम्हाला बिघडत नाही. तुला बैरागीपणाची हौस आहे ती तू पुरी कर व आम्हाला आमची हौस करु दे. आपले पूर्वज तुझी पद्धत कधीच स्वीकारणार नाहीत. तुझा पुण्याचा मार्गसुद्धा श्रीमंतीशिवाय शक्य नाही हे समजून घे. तू असुरांचे व देवांचे पहा. असुरांच्या भावांचा नाश देवांनी त्यांत फूट पाडून केला, त्यासाठी लांच देवांनी दिली होती. त्यामुळें त्यांच्यात (असुरांत) फूट पडली व देवांनी त्यांना हरवले तसे आपण करू शकू जर तू परवानगी दिलीस तर. नाहीतर मी व माझे तीन बंधू कोठेही दुसर्या राजा करता

जसें पांचालसाठी लढून त्यात दृष्टद्युम्न आम्हाला सदैव मदत करण्यास तयार असेल हे तू जाणतोस. भरपूर श्रीमंती मिळवू शकतो. म्हणून तू कांहीं निर्णय घे कारण, हे असें फार काळ द्रौपदी चालू देणार नाही व जर तिला हे पसंत नसेल तर तुला तिच्या सांगण्या प्रमाणें वागावे लागेलच नाहीतर तू कांहीं वेगळेच झालेले पहाशिल. तुझी सत्ता आमच्यावरील पहिल्या सारखी रहाणार नाही. त्यासाठी ह्या बदललेल्या परिस्थितीचा तुला गांभिर्याने विचार करावा लागेल. आणि जर आपल्यात तुझ्या ह्या अशा भिकारड्या वर्तनामुळे फूट पडली तर त्याला तू जबाबदार असशिल. तूला आपल्या आईला त्याचा जाब द्यावा लागेल व मला खात्री आहे किं, ती तुलाच दोषी ठरवेल कारण ती तिच्या सुनेचेच ऐकेल. आपल्या पूर्वाजाने जसे लोकांचा विश्वास संपादन करून सत्ता स्थीर केली तसे आपण कमी सैन्य असले तरी करू शकू. आपली प्रतिष्ठा सगळ्या जगात आहे त्यामुळें पुनः राज्य स्शापन करणे आपल्याला अवघड नाही. तुला वैराग्याचे भूत जडले आहे पण वेदांत सुद्धा असा कोणी राजा सांगितलेला नाही जो वैराग्याच्या मदतीने राज्य करत होता. सगळे राजे वैभवसंपन्न होते व त्यांच्या दानांने, यज्ञाने ते सगळ्यांत ख्यातनाम झाले होते. म्हणून तुझे हे वेड तू सोडून दे व द्रौपदी सांगते त्या प्रमाणे कांहीं पुरुषार्थ गाजवण्याचा विचार कर. त्या कामात तुझी ब्राह्मणांतील प्रतिष्ठा आपल्याला कामी येईल. सत्ता प्राप्त झाल्यावर जर तू त्या ब्राह्मणांना मोठी दानं करण्याचे वचन दिलेस तर सगळे ब्राह्मण तुझ्याशी एकनिष्ठ होऊन येतील. कोणालाही कौरवाची सत्ता मान्य नाही, अगदी बायाबापड्या, पुरुष, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, सुत असें सगळे तुलाच राजा मानतात. कोणीही तुला कांहीं विचारणार नाहीत कीं तू वनवास सोडून कौरवांचा निःपात करण्यासाठी कां आलास. तू तुझ्या काकाला, धृतराष्ट्राला कां जिकलेस. वस्तुतः सगळ्याना तू असेंच करावे असे मला समजले आहे, अशा परिस्थितीत वनवासात रहाणे केवळ मूर्खपणाचेच होईल. अरे माझ्या भावा, चल रथात बस व ब्राह्मणांना शुभेच्छा देण्यास सांग व निघ कौरवांचा नाश करण्यासाठी. तुझ्या अर्जुनाच्या गांडीवापुढे कोणता योद्धा टिकाव धरेल? माझ्या गदेपुढे कोण लढू शकेल कां, आपल्याला श्रींजय व कैकेय मदतीला येणार कारण आपण त्यांना सदैव मदत केली आहे. त्याशिवाय कितीतरी राजे आपल्यासाठी लढण्यासाठी येतील ज्याना कौरव खंडणीच्या नांवांने छळत आहेत. ज्याची खंडणी आपण माफ केली होती

कारण ते चांगले राजे शाबित झाले होते. त्याशिवाय वृश्नी, भोज, अंधक, पांचाल आपलेच आहेत फक्त सांगावा धाडला किं झाले! आज त्यांच्या हातात सत्ता असली तरी त्यातील प्रजा त्यांच्या बरोबर नाही, ती आपल्या बरोबर आहे त्या परिस्थितीचा विचार कर. फक्त तू निर्णय घे.

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा तेहतिसावा भाग संपला.

# वनपर्व भाग चौतिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, ते भिमाचे बोलणे ऐकल्यावर तो उच्च दर्जाचा राजा युधिष्ठीर थोडावेळ विचार करतो व नंतर कांहीं ठरवून बोलू लागतो, तो तेथे जमलेल्या पांडवांना सांगतो, "तुम्ही दोघे जे आता पर्यंत बोललात ते निःसंशय पटण्यासारखे आहे. तुम्ही जी भाषा वापरलीत व माझ्या मनाला ज्या डांगण्या दिल्यात त्याबद्दल मी तक्रार करणार नाही. माझ्या चुकीमुळें तुम्हाला आज समृद्धी, सत्ता, श्रीमंती उपभोग ह्यांपासून वंचित व्हावे लागले हे मी मान्य करतो. मी मान्य करतो कीं, त्या द्युतात जिंकून त्यांची राजसत्ता केवळ फांसे टाकून जिंकू शकेन असा मोह मला झाला होता. परंतु, त्या शकुनीचे फाशांचे ज्ञान माझ्यापेक्षा जास्त होते व ते माहीत असूनही मी त्याच्याशी द्युत खेळावयास तयार झालो अशा अनेक चूकां मी त्या लोभा पोटी करत गेलो. त्यांत तुम्हाला पणाला लावण्याची चूक मी केली हेसुद्धा मान्य करतो. मी तो द्युत न खेळण्याचे जर सांगितले असते तर हे सगळे झालेच नसते पण मी सत्तालोभात अडकलो होतो. आणि त्यामुळें आपण सगळे असें वनवासात येऊन पडलो आहोत. मी माझ्या अहंकारामुळें त्या द्युतात आणखीन आणखीन गोष्टी पणाला लावत गेलो त्यात माझा खोटा अहंकार, माझा खोटा आत्मविश्वास, जिद्द, असें सगळे दोष काम करत होते व त्या वेळी ते माझ्या संयमी मनाला कां व कसें लक्षात आले नाही ते समजत नाही. स्वताला मोठा संयमी, व्रतस्थ समजणारा मी त्यावेळी कां व कसा वहावत गेलो ते समजत नाही. अशी कोणती गोष्ट त्यावेळी माझ्यावर व आपल्या सगळ्यांवर हावी झाली होती ते समजत नाही. त्या काकाची संपत्ति मिळवण्याच्या हव्यासात मी आपण मिळवलेली संपत्ति घालवून बसलो कधी ते माझ्या लक्षात सुद्धा आले नाही. अशा कोणत्या गोष्टीच्या प्रभावात मी व आपण सगळे सांपडलो होतो ते समजत नाही. एरवी विवेकांने व शांत राहून निर्णय घेणारा मी, त्यावेळी अंगात आल्या सारखा कां वागत होतो? लोभ, मोह माणसाला कसे फसवतात ते आता माझ्या लक्षात येत आहे. एकदा त्या दोषांनी माणसाचा ताबा घेतला किं, तो इसम त्याचा विवेक हरवून कसा बसतो ते मी अतिशय वाईट प्रकारे शिकलो आहे. मी पुन्हा पुन्हा मान्य करतो कीं, मी संयमाच्या, विवेकाच्या, तारतम्याच्या गोष्टी करणारा, त्यावेळी कां हे सगळे शहाणपण विसरलो

होतो"? जेव्हां आपले भाग्य बिघडलेले असते तेव्हांच असें होते. बिघडलेले भाग्य आपले विवेक, तारतम्य, संयम असें सगळे योग्य दिशेने नेण्यास प्रवृत्त करणारे घटक बधीर करू शकते. असें समजावयाचे कां, कीं, आपले शहाणपण सुद्धा भाग्याच्या सामर्थ्या पुढे कमी होतात? ह्या संदर्भात आणखीन कांहीं गोष्टींचा आपल्याला विचार करावा लागेल, त्यात तुमच्या वागण्याचा मी उल्लेख करतो परंतु, ते माझे समर्थन करण्यासाठी नाही, तर भाग्य कसे सगळ्यांना वळवते ते शिकण्यासाठी सांगतो, त्याने माझा दोष कमी झाला असें मला यत्किंचितही सुचवावयाचे नाही. पहिल्या द्युताच्या वेळी आपली भार्या कृष्णा तिच्या चतुराईने आपल्याला वाचवले परंतु, मला असें वाटते कीं, त्यामुळें आपले बिघडलेले भाग्य पुनः आपल्यावर उलटले व मला पुन्हा दुसरा द्युत खेळण्याची दुर्बुद्धी झाली व आपण पुन्हा हस्तिनापुराला आलो. असें म्हणावे लागेल कीं, दुर्योधनाचे भाग्य बलवत्तर होते. पहिल्या द्युताच्या वेळी तुमच्या पैकी कोणीही मला विरोध केला असता तर मी तो द्युत खेळलो नसतो परंतु, आपले दुर्भाग्य त्यावेळी इतके बलवत्तर होते कीं, तुमच्यापैकीं कोणीही मला थांबावयाला सांगितले नाही. त्यामुळें ते नष्टचर्य पुढे चालूच राहिले. मला सांगा, तुमच्या पैकी एकांनीही तो द्युत थांबावयाला मला सांगितले कां नाही"? मी भिमाला पणाला लावले त्याला त्यांने विरोध कां नाही केला? त्यानतर मी अर्जुनाला लावले तोसुद्धा निमूटपणे कां तयार झाला"? त्या नंतर नकुल व सहदेव ह्यांनी सुद्धा तुमची गती स्वीकारली, असे कां झाले, तुम्ही मला कां नाही अडवले? फक्त कृष्णेने विरोघ केला तेव्हां तू भिम तिला मदत करायला गेला त्याला मी माझ्या भ्रष्ट अहंकारामुळें थांबवले ते भिमांने कां चालू दिले? जेव्हां दुर्योधनाने आपल्याला आपले वस्त्र काढावयास सांगितले तेव्हां मी एकाद्या आज्ञाधारक गुलामासारखे माझे कपडे काढून फेकले जमिनीवर तेव्हां तुम्ही सुद्धा तसेंच करून आपली सम्मति दाखवली! त्या ऐवजी जर तुमच्यापैकीं कोणी विरोध दर्शवला असता तर कदाचित कृष्णाचे कपडे फेडण्याची हिम्मत दुःशासनाला झाली नसती. आपण एकाद्या मंत्राने भारावल्यासारखे आपली विवेक बुद्धी वापरावयाचे थांबवले होते. असें का झाले"? हे सगळे सांगण्याचा उद्देश तुम्हाला खोट्यात टाकण्याचा नाही तर मला असें सुचवावयाचे कीं, आपले भाग्य बिघडले होते. म्हणतात नां, "विनाश काले विपरीत बुद्धी", तसेंच होत होते. एवढेच नाही तर आपले वडीलधारे भिष्म, द्रोण, कृप तेथे

ते सगळे मख्खपणे कां बघत राहिले? त्यांच्या पैकीं कोणी आक्षेप घेतला असतां तर ते कांहींही झाले नसते. त्यानंतर आपण कृष्णेच्या चतुराईने सुटलो परंतु, धृतराष्ट्राने मला पुन्हा द्युत खेळण्यासाठी बोलावले तेव्हां तुमच्यापैकीं कोणीही न जाण्याचे सुचवले नाही. जर तुम्ही मला विरोध केला असतां तर कदाचित आपण परत हस्तिनापुरी गेलोच नसतो. पण तसे झाले नाही. म्हणून मी असें समजतो कीं, आता त्यावर मला एकट्याला दोष देऊन कांहीं साध्य होणार नाही. आपल्या सगळ्याचे भाग्य बिघडलेले आहे अथवा ह्या सगळ्यामागे कांहीं विधी संकेत असावा जो आपल्याला समजून घेतला पाहिजे. शेवटी दुर्योधनाने वनवासाच्या अटी घातल्या त्यात माझ्या बरोबर तुम्हा चौघानासुद्धा घेतले, त्यावेळी तुमच्या पैकी कोणी एक तरी त्या अटींना विरोध केला नाही. आता बोलून काय उपयोग, जेव्हां एकादा करार होतो तेव्हां मान्यता अमान्यता व्यक्त करावयाची असते परंतु, तुम्ही फक्त बघ्याची भूमिका घेऊन राहिलात. कां तसे तुम्ही वागलात? तुम्ही सांगू शकला असता, कीं, द्युत युधिष्ठीर हरला आहे तेव्हां फक्त तोंच जाईल. पण तुम्ही असें केले नाही व मुकाटपणे सगळ्या अटी मान्य करत गेलात असें कां झाले"? माझे दुर्भाग्य असें कीं, माझी मति पुन्हा त्या मोहात अडकली होती, मला वाटत होते कीं, वनवासाच्या काळात ब्राह्मणांसारखे जीवन जगेन जे माझे स्वप्न आहे, म्हणून मी ती अट मान्य केली परंतु, तुमची ती इच्छा नसतांना तुम्ही कां त्यात सामील झालात"? मी मात्र त्या मोहात अडकून खोट्या अभिलाषेने ते सगळे मान्य केले. त्यावेळी तू माझे हात जाळून टाकण्याची गोष्ट केली होतीस कीं, ज्या हाताने मी द्युत खेळतो ते नष्ट करावे. परंतु, त्याला अर्जुनाने विरोध केला व तो दुसरा द्युत खेळला गेला. तू फक्त तुझे हात चोळत बसलास. विचार अर्जुनाला, त्याने तुला कां हात जाळण्यापासून परावृत्त केले"? ह्या सगळ्या घटनांच्या मांगे आपले दुर्भाग्यच कारणीभूत आहे असें मला वाटते. त्या प्रसंगात जे कांहीं घडत होते ते कां झाले त्याचे दुसरे कोणतेही पटण्यासारखे उत्तर मला मिळत नाही. एक कृष्णा सोडून बाकी आपण सगळे मतिमंद झालो होतो जणूकाय कांहीं मंत्राने आपण भारावलेलो होतो. असें तेव्हांच होते शहाण्या लोकांच्या बाबत जेव्हां, त्यांचे भाग्य बिघडलेले असते. द्रौपदीला तो छळत असतांना आपण असें कसें बधीर झाल्यासारखे तेथे तो अन्याय पहात बसलो होतो? मी मान्य करतो कीं जे कांहीं मी आपल्या सर्वांच्या वतीने तेथे मान्य केले ते सगळे

अयोग्य होते पण मी त्यातून आता बाहेर येऊ शकणार नाही कारण तो एका राजाचा शब्द होता व तो मला पाळावाच लागेल. सर्व दोष माझ्यावर घेऊन मी हे सांगत आहे. जर तुम्हाला मला सोडून जावयाचे असेल तर त्याला माझी हरकत नाही कारण मी माझी चूक मान्य करतो. ह्याउपर मला कांहीं सांगावयाचे नाही. तुम्ही मला जी सजा करावयाची असेल ती करू शकता पण मी हे वनवासाचे व नंतरचे अज्ञातवासाचे वचन मोडू शकणार नाही, त्याउपर तुम्हाला जे योग्य वाटेल ते तुमच्या वतीने तुम्हाला करण्यास माझा विरोध नसेल. वचन मोडणार्याला स्वर्गात जागा मिळत नाही. त्याच्यावर विधाता विश्वास करत नाही. मी चुकीचे वचन दिले तरी ते माला बंधनकारक रहाणार आहे, जरी तुम्ही ते मोडलेत तरी चालेल कारण तुम्ही तुमच्या तोंडाने ते वचन दिलेले नाही. तुम्ही त्याचा सन्मान करता कारण तुमच्या ज्येष्ठ भावाने ते दिले आहे, त्यामुळें ते वचन तुम्हाला बंधनकारक ठरत नाही. पुढे हात जोडून तो पंडुपुत्र त्याच्या चार भावाना सांगतो, "आज पासून ह्यापुढे तुमच्यावर माझा ज्येष्ठ बंधू म्हणून अधिकार नसेल". नंतर द्रौपदीकडे पहात तो अजातशत्रू तिला बोलतो, "माझे आई, आजपासून तू सुद्धा माझ्या आज्ञेत रहाण्याची आवश्यकता नाही, मी तुम्हा सगळ्यांना तुमच्या माझ्याशी असलेल्या नात्याच्या बंधनातून मुक्त करत आहे. तुमच्यांवर मी अन्याय केला आहे असें जर तुम्हाला वाटत असेल तर मला शिक्षा द्या, मी ती स्वीकारेन. एवढे बोलून युधिष्ठीर गप्प झाला. ते ऐकून पांडव व कृष्णा अचंबित होतात.

अशारितीने वनवास पर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा चौतिसावा भाग संपला.

# वनवास पर्व भाग पस्तिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

ते ऐकल्यावर भिम बोलतो, "अरे भावा, हे तू काय वेड लागल्यासारखे बरळत आहेस. तू तुझ्या मनाचा तोल घालवून बसला आहेस काय"? तू जे वचन दिले आहेस त्यात तू मोठा काळ अडकवला आहेस ह्याचे तुला भान आहे कां? गेलेला काळ परत येत नाही. तो अखेरीस मृत्यूच दाखवतो. आपले आयुष्य क्षणा क्षणानी कमी होत आहे. त्यातील प्रत्येक क्षण वापरण्यासाठी आपण तयार असले पाहिजे. कोणाला माहीत आहे आपले आयुष्य किती आहे. ज्याला त्याचा अंदाज असेल तोंच आपला समय व्यर्थ घालवू शकतो. शरीराला मरण आहेच. त्या आधी आपल्याला सगळ्या आपल्या आकांक्षा पूर्ण करावयाच्या असतात. म्हणून आपण आपले राज्य लवकरात लवकर पुन्हा मिळवले पाहिजे. वचन वगैरे शाब्दिक गोष्टींचे महत्व आपण वाढवतो, त्याला काळाचा विचार नसतो. एक दिवस आपला मृत्यू निश्चित आहे त्या आधी ते राज्य आपण मिळवले पाहिजे. नाहीतर असें निरर्थक जिणे व्यर्थ आहे. आपण पृथ्वीवर केवळ भार बनून रहाणे मला मंजूर नाही. ज्यांच्या कडे हिम्मत नाही त्यांना माझे म्हणणे कदाचित समजणार नाही पण ज्यांच्या कडे हिम्मत, शौर्य, धाडस, धमक आहे असा मनुष्य कधीच असा लाचारपणे केवळ वचनाचा बाऊ करून जगू शकणार नाही. आपल्या सामर्थ्याचा उपयोग करून तो शत्रूचा नाश करून संपत्ति, वैभव संपादन करतो. आपल्या हातांने ती श्रीमंती तो मिळवतो. आपल्याला त्रास देणार्याला यमाकडे धाडणे हा खर्या क्षत्रियाचा धर्म (स्वभाव) असतो. शत्रूला मारणारा नरकात जात असेल पण तो नरक त्याला स्वर्गासारखा वाटतो कारण, त्यांने त्याच्या पिडा देणार्याला यमाकडे धाडल्याचा आनंद स्वर्गाचे सुख देत असतो. शेवटी स्वर्ग नरक हे सगळे माणसाच्या मनाच्या विविध अवस्थांचे स्वरुप असते. शत्रूला मारल्यानंतर त्याला चांगली झोप लागते त्यालाच स्वर्ग असें मी समजतो. हा विभत्सू पहा, पृथाचा पुत्र, महान तिरंदाज, त्याच्या आत्म्याला किती पिडा होत आहेत त्याची तुला कल्पना येणार नाही कारण तू बेहिम्मत आहेस. हिम्मतवानाची पिडा तुला कशी कळणार? कैदेत अडकलेल्या सिंहासारखी त्याची गत झाली आहे. त्याच प्रमाणे, तो नकुल पहा, सहदेव पहा, दोघे संकोचाने गप्प झाले आहेत. कांहीं कारण नसतां ते तुझ्या मूर्खपणाचे

बळी झाले आहेत. ते त्यांचे विचार कधी सांगतांना आपण पाहिले आहे कां? त्यांना काय वाटते त्याचा कधी तू विचार केला आहेस कां? सगळ्या लहान असणे हा काय त्यांचा गुन्हा आणि सगळ्यात मोठा झाला हा काय तुझा गुण समजावयाचे कां? तुझी मनमानी आम्ही सदैव चालू दिली ह्याचा अर्थ आम्हाला कांहीं मत, विचार नाही असा तू समज करून घेतला ही तुझी मोठी चूक आहे. कांहींही निर्णय घेतांना आपल्या भावांना काय वाटते त्याचा विचार करावा असे तुझ्या मनात कधीतरी आले कां"?

"मी आणि प्रतिविंध्याची माता एवढेंच तुला समज देत असतो आणि आमच्या भावना व्यक्त करत असतो. तरी मला माहीत आहे, मी जे बोलतो आहे त्याशी हे सगळे एकमत आहेत. जेव्हां आम्ही लढण्यास तयार आहोत तेव्हां तू वचन बद्धतेच्या फालतू गोष्टी करत आहेस, तुला अक्कल आहे कां? तू काय बोलत आहेस त्याची तुला कल्पना आहे कां? तू आमचा पुढारी आहेस म्हणजे तुला आमचेसुद्धा ऐकून घ्यावे लागेल. तू आम्हाला तुझी मालमत्ता ठरवण्या इतपत नीच झाला होतास त्याचा तुला विसर पडता आहे कां? आमच्या प्रेमाचा इतका मोठा अपमान दुसरा कोणता असू शकतो. ह्यापुढे तुझी मनमानी चालणार नाही. मला विशेष त्रास ह्याचा होतो किं, आमचे राज्य एका फालतु जुगारड्याने बिनपैशाने आमच्या कडून काढून घ्यावे व आम्हाला वनवासात पाठवावे. कां तर आम्ही आमच्या ज्येष्ठ भावावर प्रेम करतो. तू आमचा विश्वासघात करून त्या उलट आम्हालाच विचारतोस कीं, आम्ही त्यावेळी तुला कां अडवले नाही? तुझे वागणे अक्षम्य होते. पुढार्यावर सैन्य अवलंबून असते, त्यात त्या सैन्याचा दोष असतो कां? जर पुढारी सैनिकांना बोलू लागला कीं, तुम्ही मला कां नाही अडवले तर ते किती बेशरमपणाचे होते त्याची तुला कल्पना आहे कां"? आधी सगळी मनमानी करावयाची व नंतर अंगाशी आले किं असें फालतु मुद्दे उपस्थित करावे ह्यात कोणते शहाणपण आहे. पुढार्याने नेहमी जबाबदारीने विचार करून सगळे ठरवावयाचे असते ते तुला सांगावे लागते कां? आणि त्यावर करघोडी तू अशी करतोस कीं, आम्हालाच दोष देतोस कीं, आम्ही कां नाही त्यावेळी आक्षेप घेतला व आता आम्ही बोलतो ते व्यर्थ आहे असें सारवा सरवीचे सांगतोस, तुला तुझ्या जबाबदारीची जाणीव नाही असें आम्ही समजावे कां"? तुझे तत्त्वज्ञान असें आहे किं, वेदाचा पढतमूर्ख असावास. वेद न समजता तू त्यातील तत्त्वांचे

पालन करण्याच्या गोष्टी करत असतोस. त्यामुळें जे सावध नाहीत ते जरूर फसतील पण जे तत्त्व जाणतात, ते तुझ्या बोलण्याने फसणार नाहीत. तुला जर ब्राह्मणांची नक्कल करावयाची आहे तर तू राज्यगादीवर कां बसलास? जो खर्या अर्थाने ब्राह्मण प्रवृत्तीचा असतो तो राज्यगादीचा त्याग करतो, अशी कित्येक उदाहरणे आहेत. तुला राज्यगादी पाहिजे, सम्राट म्हणवून घ्यायला पाहिजे, ब्राह्मणांत बसून मिरवायला पाहिजे, भावांच्या कमाईवर मजा करावयास पाहिजे, मग तू नेमका कोण आहेस ते तरी तुला माहित आहे कां? तू मनूने राजा करता दिलेले नियम जाणतोस, त्याप्रमाणें राजा देव आणि दानव अशा दोघांना घेऊन त्याचे राज्य चालवत असतो. तो ब्राह्मणांसारखा असू शकत नाही. तो पाताळयंत्री असावा लागतो. तुझे खरे रुप तुला लपवता येत नाही. ते उघड झाले आहे. अरे युधिष्ठीरा, तू एक अव्वल दर्जाचा पाखंडी आहेस. तू आता लपू शकत नाहीस. आपण कोणीही आता लपू शकत नाही. त्यामुळे अज्ञातवासाच्या नियमांचे पालन आपल्याला कधीच करता येणार नाही. म्हणजे आपण सांपडणार म्हणजे पुन्हा बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास! मला सांग ह्यातच आपले सगळे आयुष्य वाया घालवावयाचे कां, तेसुद्धा तुझ्या त्या मोहामुळे व लोभामुळें. ह्या अटींचा अर्थ तुला समजतो कां? आणि तू म्हणतोस तो काळ संपला किं, ते आपल्याला आपले राज्य सुखासुखी परत करतील"? युधिष्ठीरा, तू भोळसट नाहीस तर पराकोटीचा मूर्ख आणि पाखंडी आहेस. राजा बनण्याच्या लायकीचा नाहीस. दुसरे असे किं, आपण जेव्हां राजसूय यज्ञ केला तेव्हां आम्ही म्हणजे मी, अर्जुन, नकुल आणि सहदेव अशा सर्वांनी बर्याच राजांचा पाडाव केला आहे त्याची तुला कल्पना नाही कारण तू कोठे गेलासच नव्हतास, तुला सगळे आयते मिळत होते, म्हणून जे सांगतो ते ऐक, ते सगळे राजे आज कौरवांना मिळाले आहेत. त्यांचे गुप्तहेर आपल्यावर पाळत ठेवणार त्यामुळें अज्ञातवासात रहाणे वाटते तितके सोपे नाही. म्हणून मी एक योजना सांगतो ती आपण अमलात आणू".

"आपण आज तेरा महिने वनवासात काढले आहेत. त्यांना तेरा वर्षे समज. शहाणे सांगतात, एक महिना एका वर्षासारखा समजता येतो. जसें एकादे रोप त्या झाडाच्या वृक्षासारखे समजता येते. त्यानंतर आपण युद्ध करून कौरवांचा नाश करून राज्य मिळवल्यावर ब्राह्मणांना दांन करून वचन भंगाचे प्रायश्चित्त करू शकतो, आपल्या येथे

असें बरेच इलाज आहेत त्या मार्गाने आपण तू समजतोस त्या पापातून मुक्त होऊ शकतो. म्हणून तू आमचा राजा म्हणून युद्धाचा निर्णय घेऊन, ज्या चुका आमच्या बद्दल केल्या आहेत त्याचे सुद्धा निवारण होऊन तू त्या ऋणातूनही मुक्त होऊ शकतोस. असें समज, हींच तुला शिक्षा.

अशारितीने वनवास पर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा पस्तिसावा भाग संपला.

# वनवास पर्व भाग छत्तिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाचे ते वक्तव्य ऐकल्यावर युधिष्ठीर एक मोठा श्वास घेतो व उसासा टाकतो. थोडावेळ तो कांहींच बोलत नाही. त्यानंतर आपले अवसान सांभाळत तो स्वगत बोलतो, मी मनुची राजासाठीच्या आज्ञा ऐकल्या आहेत. त्याच प्रमाणे इतर वर्णाच्या लोकांची कर्तव्येसुद्धा समजलो आहे. प्रत्येकांनी त्या समजून त्या प्रमाणे आपापली कामं करावयाची असतात हे मी ऐकले आहे. त्यामुळें त्यांचे ह्या व नंतरच्या जीवनात त्याला संतोष मिळतो हे सुद्धा मी ऐकले आहे. मलासुद्धा त्याच मार्गाने जावयाला पाहिजे पण ते सोपे नाही. मी ते सगळे कसे साध्य करणार, माझ्यात ते करण्याची हिम्मत नाही. असा विचार करून नंतर कांहीं ठरवून तो भिमाला सांगतो, "अरे वृकोदरा, तू म्हणतोस ते योग्य आहे. परंतु, माझे हे ऐक मध्ये न बोलता, क्षत्रियांना बरीच नकारात्मक कामे करावी लागतात, त्यांच्या कामाच्या काळात, त्यामुळें दुःख उत्पन्न होत असते. तरीसुद्धा जे नियोजित आहे व ज्यासाठी सगळी तयारी पूर्ण आहे ते खात्रीने यशस्वी होते. देवसुद्धा अशा नियोजनाला साथ देतात. आता ऐक, तुझ्या हट्टामुळें जे आपण करणार त्याचे परिणाम काय होणार आहेत ते, भुरिश्रव, साल, जलसंध, भिष्म, द्रोण, कर्ण, द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा, धृतराष्ट्राची सगळी मुलं, हे सगळे एकत्र आहेत त्यांना हरवणे फार अवघड दिसते. ते सगळे शस्त्राच्या वापरात निष्णात आहेत. त्याशिवाय तुम्ही ज्या राजांना तुमच्या आघाड्यात दुखवले आहे ते सगळे त्यांना मिळाले असणार, ते आपल्या विरुद्ध दुर्योधनालाच मदत करणार. ते सगळे आपल्या विरुद्ध लढणार हे लक्षात घे. त्यांचा खजिना पूर्णपणे भरलेला आहे. ते त्यांची पूर्ण ताकद वापरून लढणार आहेत, कौरवांच्या व इंद्रप्रस्थाच्या सगळ्या उच्च अधिकार्यांना उत्तम बक्षिसं देऊन दुर्योधनाने त्याच्या बाजूला केलेले आहे, त्यामुळें सच्च्या क्षत्रियाप्रमाणे ते सगळे लढाईत दुर्योधनासाठी त्यांचे प्राण देण्यास तयार होतील. जरी भिष्म, द्रोण आणि कृपाचार्य ह्यांना आपण व कौरव समसमान असले तरी राजाच्या आज्ञेने त्यांना लढाईत धृतराष्ट्राच्या बाजूने उतरावे लागणार हे निश्चित. एकदा युद्धात उतरले कीं, मग ते आपल्यावर हल्ला करण्यात मागे रहाणार नाहीत कारण ते सच्चे क्षत्रिय आहेत. त्यांना हरवणे देवांनासुद्धा शक्य नाही हे तू

जाणतोसच. त्यांच्या जोडीला तो शक्तिमान योद्धा कर्ण आहे. त्याचा तुझ्यावरील राग तू जाणतोसच. त्याच्या चिलखतामुळें तो सदैव अजिंक्य रहाणार आहे. त्या सगळ्यांना हरवल्यानंतरच तू दुर्योधनापर्यंत पोहोचशिल. ह्या वास्तविक परिस्थितीचा अंदाज घेतला तर असें युद्ध किती भारी आहे आपल्याला ते लक्षात घे. उगाचच उताविळ होऊ नकोस.

वैशंपायन पुढे सांगतात, ते युधिष्ठीराचे ऐकून भिम सावध झाला, त्यांने इतक्या खोलात जाऊन विचार केला नव्हता, तो स्वताच्या सामर्थ्यावर जरा जास्तच भरवसा करत होता ते समजतो. तो थोडावेळ गप्प झाला. ते पांडव अशारितीने ह्या विषयावर बोलत असतांना तेथे त्यांचे आजोबा कृष्ण द्वैपायन व्यास मुनी, सत्यवतीचा पुत्र उपस्थित झाले. त्यांच्या आगमनाने ते पंडुपुत्र दोघे उभे रहातात व त्यांचे रिवाजानुसार स्वागत करतात. व्यास बोलण्यात चतूर असें, युधिष्ठीराला बोलतात, "अरे युधिष्ठीरा, माझ्या दिव्य दृष्टीने तुझ्या मनात काय शिजत आहे ते पाहिले म्हणून आलो आहे. तुझ्या मनात जी भिती तुझ्या कमकुवत प्रवृत्तीमुळें उत्पन्न झाला आहे, त्या योद्ध्यांबद्दल ती व्यर्थ आहे. कारण, मी शास्त्रात दिलेल्या तरतुदीनुसार ती भिती काढून टाकत आहे. ते संपन्न झाल्यानंतर अरे राजा, तू निश्चित हो. त्यानंतर तो पराशराचा मुलगा, सर्वश्रेष्ठ वक्ता, युधिष्ठीराला एका बाजूस घेऊन जातो, तेथे तो युधिष्ठीराला कांहीं महत्वपूर्ण गोष्टी सांगू लागतो. "अरें पंडुच्या पुत्रा, तुझा उत्कर्षाचा काळ लवकरच सुरु होत आहे. तेव्हां तो धनंजय सगळ्या शत्रूंचा नाश लढाईत करील. मी उच्चारलेले हे यशाचे गान स्वीकार ज्याला प्रतिस्मृति असें नांव आहे. तू ती ऐकण्यास सक्षम आहेस असे मी मानतो. तुझ्याकडून ती अर्जुनाला ऐकायला मिळाली किं, तो त्याच्या सर्व इच्छा पूर्ण करू शकेल. त्याला महेंद्र, इंद्र, वरुण, कुबेर आणि यम ह्यांच्या कडे जाण्यास सांग. तेथे त्याला ते विविध शस्त्रे अस्त्रे देतील. अर्जुनाच्या तपस्येमुळें व व्रतस्थते मुळें तो त्या देवांना भेटण्यास लायक आहे. तो स्वतः एक प्राचीन ऋषी आहेच. तो नारायणाचा मित्र आहे, जो एक प्राचीन काळातील (आधील युगातील) दैवत आहे. तो नेहमीच अजिंक्य व कधीही न हरणारा आहे. त्यानी ती विलक्षण अस्त्र आणि शस्त्र त्या देवतांकडून प्राप्त केली कीं, मग तुम्ही येथून दुसर्या वनात जावे. अशा वनात जा, जेथे तुम्ही अधिक सुखरुप राहू शकाल. एकाद्या प्रसन्न ठिकाणी रहाणे आनंददायक असते. तू पुष्कळ ब्राह्मण आणि संन्याशी सांभाळून रहात आहेस, त्यामुळें ह्या

वनातील हरणं, सांबरं मारली गेल्यामुळें त्यांची संख्या कमी होईल, तसेंच कंदमुळं, फळं कमी होतील त्यामुळे, आणखीन भक्ष्य शोधण्यासाठी तुम्हाला एरवीसुद्धा दुसर्या वनात जावेंच लागेल".

वैशंपायन बोलतात, असं बोलून तो महाऋषी प्रतिस्मृति सांगण्यास तयार होतो. तेथे युधिष्ठीर स्वताला स्वच्छ करून शुद्धीकरण विधी उरकतो, त्यानंतर व्यास मुनी त्याला तो गुप्त मंत्र शिकवतो. ते झाल्यावर व्यासमुनी परत त्यांच्या ठिकाणी निघण्यासाठी अदृष्य होतात. तो पुण्यवान आणि बुद्धीमान असा पंडुपुत्र युधिष्ठीर तो मंत्र चांगला पाठ करतो. त्यासाठी तो त्याचे पठण करत रहातो. व्यासांनी अशारितीने येऊन आधार दिल्यामुळें तो पांडव समाधानी दिसतो. ते सगळे द्वैतवन सोडून सरस्वती नदीच्या किनार्यावर असलेल्या कम्यक वनात पुन्हा येतात. कारण तेथे भरपूर वन्य प्राणी शिकार करण्यासाठी असतात. त्यांच्या बरोबर अनेक ऋषी, ब्राह्मण, हाडवैद्य सुद्धा त्या वनात रहाण्यासाठी येतात. त्या वनात ते योग्य जागा पाहून चांगले निवासस्थान त्यांच्यासाठी व त्यांच्या बरोबर आलेल्या लोकांसाठी तयार करतात. तेथे ते कांहीं काळ रहातात. तेथे ते त्यांची हत्यारे पाजळून तयार करतात व शस्त्रांचा सराव सुरु करतात. तेथे वेदांचा अभ्यास सुरू होतो. यज्ञ करू लागतात. पूर्वीची बेचैनी त्या कुंतीपुत्रांतून नाहीशी झालेली दिसते . जणूकाय त्यांना कांहीं ठोस मार्ग सापडला असावा. त्यांच्या म्हणजे मोठ्या भावात व भिमात आणि कृष्णेत होणारे वाद बंद झालेले असतात. ते गुण्या गोविंदाने तेथे रहातांना आढळतात. ते नित्य नेमांने शिकारीला जाऊ लागतात. ब्राह्मण फळें व कंदमुळं जमा करत असतात. त्यांच्या कडून पितरांची, देवांची आणि ब्राह्मणांच्या पुजा नित्यनेमांने होऊ लागतात.

अशारीतीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा छत्तिसावा भाग संपला.

# वनपर्व भाग सदोतिसावा

(अर्जुनाभिगमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, कांही काळानंतर, युधिष्ठीर व्यासमुनीनी सांगितल्या प्रमाणे, अर्जुनाला बोलावतो, त्याचा हात प्रेमांने स्वताच्या हातात घेऊन त्याला एकांतात सांगतो, "अरे धनंजया, भिष्म सगळे शस्त्राचे ज्ञान जाणतात, त्याच प्रमाणें इतर योद्धे जे दुर्योधनाचे मिंधे झाले आहेत त्यात द्रोण, कृप, अश्वत्थामा, कर्ण आहेत त्यांना सगळी विनाशक साधने अवगत आहेत. त्यांना मानवी व मायवी अस्त्रे अवगत आहेत. ते त्या विनाशकारी आयुधांचा उपयोग कसा करावा व त्यांना कसे परतवायचे तेसुद्धा जाणतात, असें सगळे दुर्योधनाचे मिंधे झाले आहेत, आणि दुर्योधनसुद्धा त्यांना मोठ्या चतुराईने सांभाळत आहे. त्यांना तो मोठ मोठ्या भेटी देतो व विशेष कृपासुद्धा दाखवतो, त्यामुळें जेव्हां आपल्याला त्यांच्याशी दोन हात करावे लागतील तेव्हां ते सर्व त्या कौरवालाच मिळतील. त्याशिवाय सगळी पृथ्वीसुद्धा तूर्त दुर्योधनाच्या ताब्यात आहे, अशा परिस्थितीत तू एक असा आहेस ज्याच्या सामर्थ्यावर मी विसंबून राहू शकतो. त्यासाठी तू काय करावे ते तुला सांगतो ते नीट ऐक. मला आपले आजोबा भेटले होते, द्वैतवनात जेव्हां मी व भिम प्राप्त परिस्थितीवर काय करावे त्याबद्दल बोलत होतो. त्यांनी मला एक मंत्र दिला आहे त्याचे नांव आहे प्रतिस्मृति. ते बोलले तो मंत्र मला दिल्यावर किं, तो मंत्र मी तुला द्यावयाचा आहे. तो वापरून तू आयुधांचे सगळे विज्ञान समजू शकशिल. ती प्रतिस्मृति तू माझ्याकडून शिकावी असें सांगितले व म्हणून त्यांनी ती प्रथम मला शिकवली आहे व ती आता मी तुला शिकवणार आहे. ते शिकल्याने तू स्वर्गीय घोर तपस्या करण्यासाठी योग्य होशिल. हातात तुझी शस्त्रं, घेऊन व अंगात चिलखतं घालून तू ते शिकण्यासाठी सज्ज हो. त्यानंतर तुला कठोर व्रतस्थता आचरावी लागेल हे लक्षात ठेव. तसा तू उत्तर दिशेकडे जाशिल. तू तो प्रवास गुप्तपणे करशिल. एक लक्षात ठेव सगळी जी आयुध आहेत ती इंद्राच्या ताब्यात आहेत. सगळ्या देवांनी वृत्राला भिऊन ती आयुध शक्ती इंद्राला दिली जेणे करून तो (इंद्र) वृत्रशी लढू शकेल. ती आता तुला त्याच्या कडून मिळवावयाची आहेत, म्हणजे कौरवांशी तुम्ही यशस्वीपणे लढू शकाल. ह्या प्रतिस्मृतिच्या प्रभावामुळें शक्र (इंद्र) तुला ती सगळी विद्या प्रदान करील. आताच तुझी आयुध घेऊन इंद्राला भेटण्यास निघ".

वैशंपायन पुढे सांगतात, असें सांगितल्यावर अर्जुनाला ती प्रतिस्मृति शिकवतो. त्यानंतर नव्याने व्रतस्थ झालेला धनंजय त्याचे आवडते गांडीव हातात घेऊन व ते न संपणारे भाते मागे बांधून, चिलखतं नेसून तयार झालेला योद्धा ब्राह्मणांकडून शुभेच्छा आशिर्वाद घेऊन त्या कम्यक वनातून उत्तर दिशेने हिमालयात जाण्यासाठी निघतो. त्याचा आता एकच उद्देश असतो, इंद्राला भेटावयाचे. अर्जुन मोठा श्वास घेऊन धृतराष्ट्राच्या मुलांचा नाश करण्याची प्रतिक्षा घेतो. त्याला अशा तयारीने जातांना पाहून तेथे उपस्थित असलेले ब्राह्मण, सिद्ध, अदृष्य शक्ती, त्याला बोलतात, "अरे कुंतीच्या मुला , तुले जे पाहिजे ते लवकर मिळेल तुझा उद्देश सफळ होईल, मोठा विजय तुझी वाट पहात आहे". त्या उमद्या शूर वीराला जातांना त्याची पत्नी त्याला बोलते, "तुझ्या आईच्या सगळ्या इच्छा ज्या तिने तुझ्या जन्माच्या वेळी मनात धरल्या, त्या सगळ्या पूर्ण होवोत". पुढे ती बोलते, माझा त्या सभेत जो अपमान झाला त्याचे उट्टे तू काढशिल ह्यात मला शंका नाही. परंतु, तुझे जाणे आम्हा सगळ्यांना फारच असहय्य होणार आहे. तुमच्या गैरहजेरीत आम्ही सगळे तुमच्या वीरगाथा गांत असू. माझा अपमान झाल्याने जे दुःख मला झाले त्यापेक्षा जास्त दुःख मला तुमच्या जाण्याने होत आहे. तुम्ही दूर असतांना मला कोणतीही गोष्ट आनंद देऊ शकणार नाही. माझ्या जीवनात कांहीं अर्थ उरणार नाही. आमचे सुख, आमचे वैभव, आमचे आनंद सगळे तुमच्या बरोबरच असू शकतात. कृष्णा पुढे प्रार्थना करते.
"तुम्हाला यश मिळो, कितीही मोठा शत्रू आला तरी त्याला तू मारू शकशिल. तुझ्या कामात कोणतेही विघ्न येऊ नये. धात्री व विधात्री दोघीही तुमच्यावर प्रसन्न हो. र्ह्रीं, किर्ती, धृती, पुश्ती, उमा, लक्ष्मी, सरस्वती सगळ्या तुमचे संरक्षण करोत. मी वसुंना पुजते, रुद्रांना पुजते, आदित्यांना पुजते, मरुतांना पुजते, विस्वदेवाला पुजते, साध्यांना पुजते ज्यानें समृद्धी आम्हाला मिळो. आकाशातील सगळ्या अदृष्य नकारात्मक शक्ती तुझे संरक्षण करोत व तुला मदत करोत (कोणी जवळचा माणूस जेव्हां कांहीं कामानिमित्त फार दूर जातो तेव्हां त्याच्या भल्यासाठी अशी प्रार्थना करण्याचा प्रघात होता. त्यातील ज्या दैवतांचा उल्लेख आहे त्या माणसाचे भाग्य ठरवत असतात असा समज आहे.)
अशी प्रार्थना मी करते", अशी प्रार्थना द्रौपदी करते.

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने कृष्णा आपल्या पतिसाठी विधात्याकडे प्रार्थना केल्यावर गप्प होते, तिला त्याचे जाणे असहय्य झालेले असते. त्यानंतर तो महायोद्धा आपल्या सगळ्या भावांना एक प्रदक्षिणा घालतो, त्यानंतर तो राजगुरू धौम्य ऋषींना एक प्रदक्षिणा करतो. त्यानंतर आपली आयुध घेऊन तो प्रवासास निघतो. सगळे प्राणी त्याच्या वाटेतून बाजूला झाले कारण तो आता इंद्राला भेटण्यास जात असतो. त्या नंतर तो शत्रूघ्न अनेक डोंगर पार करून अखेरीस हिमालयाला पोहोचतो. जेथे देव रहातात. त्यानंतर तो उच्चात्मा त्या पवित्र पर्वतावर पोहोचतो. तो मनाच्या वेगांने प्रवास करत असतो केवळ त्याच्या वैराग्यपूर्ण व्रतस्थ जीवनामुळें ते त्याला शक्य होत होते. त्यानंतर हिमालय (हिमावत) ओलांडून गंधमदनातून पुढे तो अनेक उंचसखल पर्वतराशी ओलांडून रात्रंदिवस पर्वास पायी करत न थकता, इंद्रकीला येथे पोहोचतो. तेथे तो थोडा समय विश्रांति घेतो. तेथे तो पडला असतांना त्याला एक आवाज ऐकू येतो. ती आकाशवाणी होती. "थांब", ते ऐकल्यावर तो कुंतीपुत्र चमकून आजुबाजूस पहातो. अर्जुन सव्यसाची (दोनही हाताने काम करू शकणारा) तयारीने पहातो. त्याला दूर एका वृक्षाच्या सावलीत एक बैरागी उभा असलेला दिसतो. त्याचे तेज विलक्षण होते. सावळ्या वर्णाचा, जटा वाढलेला, कृश तब्यतीचा त्याच्या कडे पहात असतो. अर्जुन तेथे थांबलेला आहे असें पाहून त्याला बोलतो, "तू कोण आहेस, मुला"? "येथे धनुष्य व बाण घेऊन कां आला आहेस"? "तुझ्या अंगावर युद्धाच्या तयारीचे वस्त्र आहे, तू क्षत्रिय वाटतोस, ह्या ठिकाणी अशा शस्त्रांची गरज नाही. हे शांतपणे रहाणार्या वैराग्यपूर्ण आणि व्रतस्थ अशा ब्राह्मणांचे स्थान आहे. येथे क्रोध व आनंद दोनही नसतात. म्हणून येथे ह्या आयुधांचा उपयोग नसतो. येथे वाद होत नाहीत, म्हणून अरे मुला, ती शस्त्रे तू फेकून दे. येथे आल्यामुळें तुला शुद्ध सात्त्विक शांतता प्राप्त होत आहे. अरें मर्दा, तुझ्यासारखा धाडशी व हिम्मतवान पुरुष नसेल. तो ब्रह्मज्ञानी अर्जुनाला पुनः पुन्हा तसे सुहास्यपूर्ण चेहर्याने सांगत होता. त्याचे उद्‌गार ऐकूनही अर्जुन त्याची आयुध टाकून देत नाही. ते पाहून तो अवतारी पुरुष स्मित करत अर्जुनाला बोलतो, "अरे शत्रूघ्ना, तुझे कल्याण हो. तुला कोणता वर पाहिजे ते सांग. मी शक्र, तुला जो पाहिजे तो वर द्यायला मी तयार आहे". त्या सहस्त्र नेत्री इंद्राला लवून धनंजय वंदन करतो व सांगतो, "मला जे पाहिजे ते द्या, कीं, मी तुमच्या कडील

सगळी शस्त्र विद्या शिकू इच्छितो. मी त्या एकाच उद्देशाने येथवर तुमच्यापाशी आलो आहे. मला तो वर द्या". ते ऐकल्यावर तो शक्र सुहास्यवदनाने बोलतो, "अरे, धनंजया, आता तू येथे पोहोचला आहेस तेव्हां तुला त्या विद्येची गरजच उरत नाही. तू आधीच शुद्ध अवस्थेत गेला आहेस, ते ऐकल्यावर अर्जुन शक्रला सांगतो, "मला ती शुद्ध अवस्था तूर्त नको आहे, मला स्वर्गीय सुख नको, मला आनंदमय अवस्था नको, ह्या आनंदमय अवस्थेच्या गोष्टीत कांहीं तथ्य नसते. मला सगळ्या देवांचे वैभव सुद्धा नको. मी माझ्या भावांना जंगलात सोडून आलो आहे, आम्हाला आमच्या वैर्याचा बंदोबस्त करावयाचा आहे. जर आम्ही ते केले नाही तर आमची सगळ्या जगात नाचक्की होणार आहे, त्यासाठी मला तुमची विद्या पाहिजे". ते ऐकल्यावर वृत्राचा वध करणारा इंद्र अर्जुनाचे सांत्वन करतो, त्याला शांत करण्याचा प्रयत्न करतो. त्यानंतर तो शक्र त्याला उद्देशून बोलतो, "जेव्हां तू तो त्रिनेत्रधारी त्रिशूळ धारी शीव पहाशिल, जो ह्या जगाचा स्वामी आहे, तेव्हां मी तुला ती विद्या देऊ शकतो. त्यासाठी तुला प्रथम शीवाचे दर्शन घ्यावे लागेल. त्यानंतर तुझ्या सगळ्या कामना पूर्ण होतील". असें अर्जुनाला बोलून तो शक्र अंतर्धान पावतो. ते ऐकल्यावर तो कुंतीपुत्र तेथेच तपस्येला बसतो .

अशारितीने वनपर्वातील अर्जुनाभिगमन पर्वाचा सदोतिसावा भाग संपला.

## – महाभारतातील वनपर्वाचा पहिला खंड संपला –

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षांपूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद